वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हशील ०।३
सहामाही " " ३ " " ०।६
साल अखेर " " ७ " " १।८
किरकोळ अंकास ..................०।४

Per annum in advance 5 Postage 18as
Perannum in arrears 7 " 1 R8as
Six monthly........ ... 3 " 8as
Single copy .............................. 4as

नोटिशीबद्दल.
१० ओळींचें आंत १
पुढें दर ओळीस ०।१।६
दुसरे खेपेस ..... ०।१

Advertissments
Below 10 lines...... Rs
Per line over 10 ... 4as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XIX AKOLA MONDAY MAY 4 1885 NO 17
पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख ४ माहे मे सन १८८५ इ० अंक १७

## पक्षकार लोकांसफार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दानी नगरकर बी. ए., एल एल. बी., मुंबई हायकोर्डताचे वकील हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हापीस "वऱ्हाडसमाचार" छापखान्याशेजारी काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे

ता. ९ दिसेंबर १८८४ } पत्रकर्ते.

## डाक्तर गोविंदराव खोत यांनीं विशेष काळजीनें तयार केलेलीं सरबतें.

१ गुलाबाचें सरबत. २ लिंबांचें सरबत. ३ डाळिंबांचें सरबत. ४ नारिंगांचें सरबत. ५ द्राक्षांचें सरबत.

हीं सर्व सरबतें फक्त फुलांच्या व फळांच्या अर्कांचीं केलेलीं असून उत्तम प्रकारचीं आहेत; आणि उष्ण देशांत थंडाई आणण्याचे जे गुण सरबतांत असावे ते वरील सरबतांत आहेत. बाजारांत मिळणाऱ्या या प्रकारच्या हलक्या जातीच्या सरबतांस वाईट रुचि व गंध असतो, त्या मुळें पुष्कळ लोकांस तीं घेणें आवडत नाहीं, म्हणून आमचीं सरबतें चांगलीं रुचकर व सुगंधी करण्याची पुष्कळ काळजी व श्रम आम्ही घेतले आहेत असें खात्रीनें कळवितों. हीं सरबतें पाचक, रुचकर, थंडाई आणणारीं, व मधुर आहेत. यास्तव उन्हाळ्यांत हीं फार हितकर आहेत. आणि इतर सरबतांच्या अंगीं दाह उत्पन्न करण्याचा जो दोष आढळतो तो यांच्या अंगीं बिलकूल नसल्यामुळें हीं सर्वांनीं घेण्यास विशेष योग्य आहेत.

घेण्याची कृती २ पासून ३ मोठे चमचे कोणताही स० चे पेलाभर पाण्यांत घेणें.

ह्या सरबतांचा मोठा कारखाना उमरावतीस मालकानें घातला आहे. ज्यांस हीं सरबतें हवी असतील अशा व्यापाऱ्यांनीं तीं मागवून घेण्याबद्दल त्यांस विनंती आहे.

## किंमत.

गुलाबाचेंसरबत ९ रु० एक ड० मोठ्या बाटल्यांस

| | | |
|---|---|---|
| लिंबांचे " " | ९ | " " " " |
| डाळिंब( अनार ) | ९।१२ | " " " " |
| संत्र्याचें | १०।८ | " " " " |
| द्राक्षाचें | १२ | " " " " |

दर डझनच्या पेटीला व प्याकिंगला चार आणे शिवाय पडतील.

एकदम घेणारांस शंभर रुपयांस ८ रु० कमिशन दिलें जाईल.

सरबतें उमरावती व अकोला येथें वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत मिळतील.

पत्ता डा० जी० व्ही. खोत उमरावती.

## Dr. G. V. KHOT'S SPECIALITIES.

1. Syrup of Roses 2. Syrup of Lemons Syrup of Pomegrates 4. Syrup of Oranges 5. Syrup of Grapes

All the above Syrups, being of the finest quality, and containing only the extracts of the juice of the respective flowers, and fruits may be confidently relied on as possessing all the cooling properties for which these syrups are so justly appreciated in tropical climate. The proprietor, aware of the many objections persons have to inferior specimens of these syrups sold in the market consequent on their bad smell and taste, begs to state that every pain and precaution is taken to make the above syrups as palatable and agreeable as syrups ought to be. These syrups form a light, agreeable, highly cooling, as well as delicious drinks in warm weather whilst the entire absence of any heating or stimulating properties so much complained of in other kinds of drinks renders them for general use very preferable.

Dose—2 to 3 table-spoonfuls of any kind of syrups in a cup full of water makes a delicious cooling draught.

The Proprietor also states that he has opened in this town a manufactory on a large scale for the preparation of these syrups and traders are requested to send in their orders.

Prices.

Syrup of Roses...*Rs.* 9 per Dozen Quarts.

| | | |
|---|---|---|
| " Lemons ......... | *Rs.* 9 | " |
| " Pomegranates | *Rs.* 9 12 | " |
| " Oranges ...... | *Rs.* 10-8 | " |
| " Grapes......... | Rs. 12 | " |

Commission *Rs.* 8 per cent for cash remitted with order.

Annas four for box and packing per dozen extra.

*Amraoti, March 1st, 1885*

Address

To

G. V. Khote, Amraoti

## स्त्री पुरुष तुलना

सहासी कोण? पुरुष किंवा स्त्रिया?

हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदे यांनीं रचिला आहे. पुस्तक पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलढाणें येथील रा. रा. बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क, मी० डे० कमिशनर यांजकडेस, व आकोलें येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे. पुस्तक घेणारांस टपाल हशिल पडणार नाहीं. पैसे पाठवणारांनीं वर्गणी सुद्धां पाठवाव.

मित्ती वैशाख वद्य ५ शके १८०७

## जंगल खात्याची सक्ती.

अलीकडेस जंगल खात्याच्या सक्तिसंबंधीं सर्व वर्तमानपत्रांतून बरीच चर्चा होत आहे. त्यासंबंधीं दोन शब्द लिहून सरकारास सुचना करणें फार इष्ट आहे. चार वर्षांपासून जंगलखात्याच्या व्यवस्थे संबंधानें लोकांच्या असंतुष्टपणाची चिन्हें दिसूं लागले आहेत. त्याचा परिणाम प्रथमारंभीं पुणें जिल्ह्यांत दरोड्याच्या रूपानें होऊन नंतर सातारा, व ठाणा ह्याही जिल्ह्यांत लोकांचा असंतुष्टपणा दिसूं लागला आहे. ह्या गोष्टीस जंगलखात्याचे कामगारांचा अतिशय कडकपणा कारणीभूत झाला असावा. शेंकडों लोकांवर माजिस्त्रेटापुढें फौजदारी खटले झाले व मुलकी कामदाराकडेस लोकांच्या अन्यायानें घेतलेल्या जमिनी परत मिळण्याविषयीं अर्ज आले. सर रिचर्ड टेंपल याचे कारकीर्दींत जंगल राखण्याकरितां लोकांपासून घेतलेल्या जमिनी मागाहून परत दिल्या; आणि मुंबईचे माजी गव्हरनर सर जेम्स फर्ग्यूसन यांचे कारकीर्दींत पुष्कळ जंगल तोडून टाकलें.

जरी जंगल राखून ठेवल्या पासून पाऊस नियमितपणानें पडून देशांत पाण्याची सुबकता राहते, आणि त्यापासून सर्व देशास फायदा होतो. तरी हल्लीं चाललेल्या असंतुष्टतेच्या प्रकारा कडेस सरकारास बिलकुल दुर्लक्ष करितां येत नाहीं. या संबंधानें लोकांच्या मुख्य दोन तकरारी आहेत. प्रथमारंभीं दुष्काळाच्या वेळेस थोडे दिवस लोकांनीं सोडलेल्या जमिनी सरकारानें फॉरेस्टांत दाखल केल्या व जे नंबर शेतीच्या विस्तारास जरूरीचे असून जंगल राखून ठेवण्याकरितां अयोग्य तेही राखून ठेवलेल्या जंगलांत दाखल केले. यामुळें पुष्कळ प्रामाणिक रयतेचे वाडवडिलांपासून त्यांजकडे शेतें चालत आलेलीं जाऊन त्यांचें निर्वाहाचें साधन नाहींसें झालें. या घेतलेल्या शेतांपैकीं बरीच शेतें मागाहून त्यांची त्यांस दिलीं गेलीं. दुसरे ... जुवारांचे कारण असे दिसतें कीं; वाळलेला झाडपाला, लाकुडफाटा, यावर लोकांचा निर्वाह असून त्याचा सरकार विकून पैसा उत्पन्न करीत आहेत. येणें करून शेतकरी लोकांची शेती जाऊन त्याचें निर्वाहाचें साधन त्यांजपासून हिसकून घेतल्या सारखें झालें आहे. याच प्रमाणें जंगलखात्याचे नियमाचा ओढून ताढून अर्थ करण्याची शैली व लोकांशीं कामगाऱ्यांचे कडकपणाचें वर्तन ह्या सर्व गोष्टींनें हा सर्व असंतुष्टपणा उत्पन्न झाला असावा असें आम्हांस वाटतें. हल्लीं पर राष्ट्राशीं लढाई करण्याचा प्रसंग असून अशावेळीं देशांतील लोक असंतुष्ट ठेवावें हें सरकारास बिलकूल इष्ट नाहीं. एवढेंच नव्हे तर ह्या असंतुष्टतेचें बीज नाहींसें करून लोकांस खूष ठेविलें असतां आमच्या सरकारचें राज्यास विशेष मजबुती आहे. ह्या लोकांच्या दंग्याचा बंदोबस्त करण्यास सरकारास बिलकुल वेळ लागणार नाहीं, ही गोष्ट जरी खरी आहे, तथापि लोकांच्या अंतःकरणांत धुमसत असलेला अग्नी केव्हां तरी प्रज्वलीत होऊन सरकारचे हल्लीं होत असलेल्या फायद्याच्या लाखपट नुकसानीस कारण होणार आहेत. म्हणून हल्लींचे आमचे मुंबईचे लोकप्रिय व कनवाळू गव्हरनर लार्ड री साहेब ह्यांस अशी विनंती आहे कीं त्यांनीं दुसऱ्या गोष्टी एकीकडेस ठेऊन जंगल खात्यासंबंधीं चाललेल्या प्रकाराची बारकाईनें चौकशी करावी. आणि लोकांवर होत असलेला जुलूम नाहींसा करून लोकांत समाधान व शांतता राहील अशी तजवीज करावी.

## ब्रह्मदेशाशीं इंग्लिशांचा संबंध.

ब्रिटिश ब्रह्माचा व्यापार चांगलें रितीनें चालावा ह्मणून ब्रह्मी राजाशीं आपला ज्यास्त खात्री लायक सलोखा रहाण्याबद्दल सरकारानें कांहीं उपाय योजावे असें सुचविण्या करितां गेले मार्च महिन्याचे १५ वे तारखेस इंडिया आफिसांत, लंडन येथील व्यापारी मंडळीकडून गेलेल्या डेप्युटेशननें अरल ऑफ किंबर्ले इंडियाचे स्टेट सेक्रेटरी यांची भेट घेतली. डेप्युटेशन बरोबर पांच चार पार्लमेंटचे सभासदही होते. डेप्युटेशननें मेमोरियल वाचतांना असें दर्शविलें कीं, मांडले व भामो येथील ब्रिटिश रेसिडेंट कमी केल्यामुळें व युरोपियन आणि नेटिव यांचे मधील कज्ये तोडणारे मिक्सड कोर्ट नाहींसें केल्यापासून ब्रह्मदेशांतील व्यापार अगदीं बुडत चालला आहे. असें होण्याचें आणखी येक कारण असें आहे कीं थिबा राजानें अघाशि... दष्ट करें केलीं ...

ज्यांत सर्व गैरकायद्याचे प्रकार होऊं लागले यामुळें ताब्यांतील संस्थानें स्वतंत्र ह्मणवूं लागलीं व त्यांनीं आपली सरहद ओलांडून इकडे येऊन गांवचेगांव लुटून प्रजेला त्रास दिला व त्यांच्यांत भिती उत्पन्न केली. दुसरे व्यापाऱ्यांना वाटेल ते हक्क दिले व मिक्सड कोर्ट न ठेविल्यामुळें थीबा राजानें इंग्लंडाशीं असलेला तह मोडला. फ्रेंचांचीं टांकीन मधील कृत्यें व फ्रान्सचा सयाम व शान संस्थानबद्दल बेत, ह्या सर्व गोष्टी मनांत आणल्या म्हणजे ब्रह्मदेशांत आपलें वर्चस्व ठेवणें फार जरूर आहे असें आम्हांस वाटतें. आणखीं असें ही दर्शविलें कीं, मांडले व भामो या दोन ठिकाणीं संरक्षणा करितां जरूर लागणाऱ्या फौजेसहित एक रेसिडेंट व एक अ. रेसिडेंट ठेवावेत. मेनामियन व इरावती नदी काठच्या व्यापाराच्या मोठमोठ्या ठिकाणीं आपलीं ठाणीं बसवावीं. आंत येणारे मालावरील कर उठवावा व जेणेंकरून व्यापार नीट सुरळीत रितीनें चालेल अशी व्यवस्था करावी. ह्या वेळेस पुष्कळ वक्त्यानीं मेमोरियलला अनुसरून चांगलीं भाषणें केलीं परंतु ब्रम्हदेश खालसा करून आपलें राज्याशीं सामील करणें हाच एक ह्या संकटांतून पार पाडण्यास उत्तम उपाय आहे असेंच सर्वांचे बोलण्यांत होतें.

अरलआफकिंबर्ले साहेबांनीं डेप्युटेशनला उत्तर दिलें तें:—आपला जो ब्रम्हदेशाशीं संबंध आहे त्याबद्दलच्या गैरव्यवस्थेच्या गोष्टी डेप्युटेशननें सरकारपुढें आणणें ह्यांत मला कांहीं मोठें नवल वाटत नाहीं, परंतु ह्यावेळेस अशा महत्वाच्या विषयाबद्दल मोठमोठ्या वजनदार गृहस्थांचीं मतें ऐकण्यास मला फार आनंद होत आहे. ब्रम्हदेश आपल्या राज्याशीं जोडावयाचा नाहीं असा ठराव झाला आहे व हा ठराव बहुत करून लार्ड डफरीन ह्यांनीं ब्रम्हदेशांतील कमिशनर मी. बर्नार्ड ह्यांचे मार्फत आलेल्या कांहीं अर्जदारांस कळविलाही असेल. व्यापारास ज्या कारणांनीं धक्का बसला आहे त्या कारणाची माहिती डेप्युटेशनांतील गृहस्थांस माझे पेक्षां जास्त असल्यामुळें त्याबद्दल मी वादविवाद करीत नाहीं. परंतु इतके खचित आहे कीं ब्रम्हदेशांतील घोटाळाच केवळ व्यापारास धक्का बसण्यास कारण नाहीं. हल्लीं जो खरोखर व्यापारास धक्का बसला आहे त्यांस सन १८८२।८३ सालीं तांदुळाचें पिकावर झालेला कमी फायदा १८८४ सालांत धान्याचें कमी पीक व चाहाचा कमोदर हीं कांहीं अंशीं कारणीभूत आहेत तथापि मेमोरियल मध्यें लिहिलेल्या सर्वच गोष्टी खऱ्या अगर खोट्या आहेत ह्याबद्दल माझें कांहींच म्हणणें नाहीं. बाहेरून ब्रम्हदेशांत येणारा माल मात्र कमी येऊं लागण्यास तेथील अव्यवस्थाच कारण आहे. हल्लीं चालूं असलल्या व्यवस्थेची त्या देशाशीं आमच्या निकट संबंधाची असमाधान कारक स्थिती आमच्या व्यापारास अपायकारक असणें ही दुःखाची गोष्ट आहे. अशा वेळीं हिंदुस्थान सरकारानें आपल्या सरहदी पलीकडे ही एखादें चांगले शाहणपणाचें कृत्य करण्यांत गुंतणें फार महत्वाचें होईल. ब्रम्हदेशाशीं आमचा संबंध किती अस्वस्थतेचा आहे ह्याची लार्ड डफरीन साहेबांस पूर्ण माहिती आहे व ह्याकारितां, ते कोणच्या उत्तम व सोयकर उपायांनीं (तो देश आमच्या राज्याशीं जोडणें ही गोष्ट शिवाय करून,) आमचा योग्य सुरक्षित व समाधान कारक संबंध राहील, असे उपाय योजण्याचा विचार करतील ह्यांत बिलकुल संशय नाहीं. परंतु अशा वेळेस सदर्हु गोष्टी कशा व केव्हां होणार हा जो प्रश्न आहे याचा निकाल करणें त्यांचे कडेच सोंपविलें पाहिजे. सरकारचे मनांत ह्या कामाची कांहीं एकदम व्यवस्था करण्याचें असल्यास ते यावेळेस सांगण्यास मला प्रशस्त दिसत नाहीं. इंडो- चायनिज पेनिनशुलांत काय काय प्रकार चालले आहेत, थिबाराजाशीं आमचा संबंध व त्यांची गैरशिस्त वर्तणूक व राज्यांतील दुष्टकृत्यें ह्या सर्व गोष्टींची जर नीट व समाधान कारक व्यवस्था लागेल तर सर्वांपेक्षां मला ज्यास्त आनंद होणार आहे. पुष्कळ कारणांनीं अशावेळीं हें एक मोठें संकटच आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. मेमोरियल मध्यें ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या व्हाइसराय साहेबांचे नजरेसमोर ठेवितों व मग ते त्याचा योग्यविचार करतील ह्यांत संशय नाहीं असें मी खात्रीनें अभिवचन देतों, कारितां डेप्युटेशननें स्वस्थ असावें अशी त्यांस माझी विनंती आहे.

अखेरीस, सर उइलियम, एम आरथर पार्लमेंटचे सभासद, यांनीं लार्ड किंबरले ह्यांचें आभार मानाल्यावर सभा विसर्जित झाली.

---

सर पिटर लम्सडेन हे पेंजडेह येथील कत्तलीच्या संबंधानें लिहितांना असें स्पष्ट लिहितात कीं वरील गोष्टींत रशियन सरकारची चूक आहे, त्यांत रशियन सैन्याची च आगळीक आहे, आणि आफगाण लोकांत कांहीं एक हाल चाल नसून अखेर पर्यंत ते निमूट होते. विरूद्ध पक्षीं रशियन सरकारचे जनरल कोमाराफ हे त्याच संबंधानें असें कळवितात कीं पेंजडेह येथील नदी वलांडून प्रथमतः आफगाण लोकांनीं रशियन छावणी नजिक आपल्या सैन्याचा तळ दिला, आणि इंग्लिशांच्या सल्लामसलतीवरून, न तळ उठाविण्याचें नाकारिलें; तेव्हा रशियन फौज पुढें सरसावली, तरी होईल तितकेकरून सामोपचारानें तंटा मिटवावा व शांतता राखावी अशाच बदल रशियनफौजेची बोलणीं चाललीं होतीं; इतक्यांत आफगाण सैन्यांतून तोफांची सरबत्ती सुरूं झाली आणि त्यांच्या घोडे स्वारांनीं पुढें चाल केली. अर्थांतच निर्वाणीचा युद्धप्रसंग येऊन ठेपला. हे दोन्ही लेख एकमेका पासून अगदीं विरुद्ध असल्यामुळें सर्व संशयात्मक झालें आहे, आणि खात्रीलायक असें अद्याप कांहीं समजत नाहीं. इंग्लंड व रशिया या दोन देशामध्यें तह लांबणिवर पडण्यास हा विरोध कारणभूत झाला आहे असें मि. ग्लाडस्टन साहेब यांनीं ही एकदां बोलून दाखविलें. परंतु अलिकडील आलेल्या तारेतील बातम्या व आलेले पत्रव्यवहार पाहतां असें दिसतें कीं पुष्कळ गोष्टी कांहीं कांहीं अंशीं रशियन जनरल कोमाराफ यांच्या लिव्हाशीं जुळतात. रशियन पत्रकर्ते असें म्हणतात कीं त्या प्रसंगीं जनरल कोमाराफ यांस आफगाण लोकांवर हल्ला करणें अत्यावश्यक होतें, आणि तसें त्यांनीं केलें नसतें तर कर्तव्य न बजावल्याबद्दल दोषीं ठरले असते; तरी त्यांनीं कत्तलीच्या मजलेपर्यंत काम आणिलें हें चांगलें केलें नाहीं. या पेंजडेहच्या बाबतींत रशियन सरकार अधिक चौकशी व विचारपूर्वक करण्यास इच्छित नाहीं असें अनेक वेळां तारांतून जाहीर झालें आहे पण रशियन सरकारचा हेतु तसा नाहीं असेंही 'रूटरचे' टाइम्सला आलेल्या तारे वरून कळतें. मी. ग्लाडस्टन साहेब सुद्धां थोड्या दिवसा पूर्वीं पार्लमेंट मध्यें बोलले कीं हल्लीं रशियांशी निक्षून असा पत्रव्यवहार चालूं आहे आणि त्याचा निकाल लागेपर्यंत कांहीं एक खात्री लायक सांगतां येत नाहीं. पेंजडेह येथील आफगाण लोकांची कत्तल तेवढ्या वेळे पूर्ती होऊन संपली नाहीं तर त्या मुळें सर्व गोष्टी भलत्याच थरावर गेल्या आणि तुर्कस्थानभर गडबड व चळवळ उडाली आहे आफगाण सरहदीचा तंटा मिटेपर्यंत हे युद्ध असेंच जास्त जास्त धुमसणार असें दिसतें. रशियन सरकार तर नवीन सरहदीच्या बाबदींत उडवाउडवीचीं उत्तरें सांगत आहे, आणि या ढळमळीतपणामुळें तह फिसकटला व लढाई बळावत आहे हें उघड आहे.

---

ता. २३ एप्रील रोजीं दुपारी हैद्राबाद येथें सार्वजनिक बागेंत. मुसलमान लोकांसाठीं कॉलेज स्थापन करण्यासंबंधानें विचार करण्याकरितां एक टोलेजंग सभा भरली होती.

अध्यक्ष स्थानी खुद्द निजाम सरकार असून, दिवाण व रेसिडेंट साहेब वगैरे बडी बडी मंडळी आली होती. बागेच्यांत मोठा शामियाना दिला होता. आंत बाहेर मिळून सुमारें ९०० जागा बसण्यांकरितां ठेविल्या होत्या. मध्यभागीं उंच सिंहासनावर निजाम सरकार, दिवाण साहेब व रेसिडेंट साहेब मी. कारढरी ह्या तिघांकारितां तीन जागा सुशोभित तयार केल्या होत्या

सर्व मंडळी जमल्यानंतर सभेच्या कामाची सुरवात खुद्द निजाम साहेबांनीं केली. हिंदुस्थानीं भाषेंत त्यांनीं आपलें भाषण लिहून आणलेलें वांचून दाखविलें. त्यांत त्यांनीं असें म्हणून दाखविलें कीं "आपले राज्यांतील लोकांस मुख्यत्वें विद्या दान देण्या सारख्या कामासंबंधानें विचार करण्याकरितां भरलेल्या सार्वजनिक सभेला निजामसरकार हजर राहिले ही गोष्ट, हैद्राबादचे इतिहासांत लिहून ठेवण्याची पहिलीच वेळ आहे. अशा वेळीं मी अध्यक्षाचें काम करण्यास फार खुष आहे कारण मला स्वतोला ही विद्येपासून बऱ्याच अंशानें फायदे झाले आहेत. मी जास्त शिकून उत्तम विद्वान झालों नाहीं ह्या बदल मला वाईट वाटत आहे." नंतर त्यांनीं मुख्यत्वें करून हैद्राबादेंतील मुसलमान लोकांच्या निस्कृष्ट स्थितिचे हुबहुबे चित्र काढून दाखविलें. व शिकून विद्या संपादान करण्याकरितां श्रम करणें किती जरूरीचें आहे ह्या बदल ही लोकांचे मनावर उत्कृष्ट तऱ्हेनें ठसा उठविला. त्यांनीं आणखी असेंही म्हणून दाखविलें कीं "ह्या पुढें मी आपले राज्यांत जो चांगला शिकलेला नाहीं, त्यांस कधींही नौकरी देणार नाहीं" त्यांनीं आपलें भाषण असें उत्तम रितीनें वाचून दाखविलें कीं ते सर्व जमलेल्या लोकांस ऐकूं जाऊन त्यांचे मनावर उत्तम ठसा उमटला.

ह्या नंतर दिवाण साहेबांनीं आपल्या नेहमिच्या वाहिवाटी प्रमाणें सुमारें वीस मिनिटें उत्तम भाषण केलें. पूर्वींचा मुसलमान लोकांचा मोठेपणा, त्यांची विद्वत्ता व हल्लींची त्यांची झालेली निकृष्ट स्थिती व ती चांगली होण्याचें उपाय ह्या सर्व गोष्टीचें थोडक्यांत पण उत्कृष्ट दिग्दर्शन केलें. त्यांनीं पर्शियन कवीपैकीं कांहीं कांहीं निवडक उत्तारेही दाखल्याकारितां मधून मधून ह्मणून दाखविल्यामुळें त्यांचे भाषणास ज्यास्तच गोडी आली होती.

आखेरीस पोलिटिकल खात्याचे सेक्रेटरी मि. मेहदीअली ह्यांनीं आपल्या वक्तृत्वशक्तिचा सुमार पाउणतास पर्यंत उत्तम उपयोगकरून चालूं विषय लोकांचे मनांत चांगला भरवून दिला. त्यांचें भाषण चाललें असतां मधून मधून लोक टाळ्यांचा गजर करीत होते.

सदर्हू कालेज निवळ वर्गणी जमाकरूनच स्थापित करावें अशा विषयीं सूचना होऊन ठरावही झाले ह्या कामाकारितां एक कमेटी नेमिली गेली. वर्गणीचे यादीवर निजामसरकारनीं ३ लाख रुपये वर्गणीचा आकडा घालून ५०० रुपये महिनाही देण्याचें कबूल केलें. त्याचप्रमाणें दिवाण साहेबांनीं ५०००० वर्गणी व १०० रुपये महिना वर्गणी देण्याचें कबूल केलें.

सरकारही कालेजाला चांगली मदत करील असें ज्या वेळेस निजामानीं बोलून दाखविलें त्या वेळेस लोकांनीं आनंद प्रदर्शित टाळ्याचागजर केला. रात्रौ आठवाजण्याचे सुमारास सभेचें काम आटोपलें. सभेस सुमारें सातशें लोक जमले असून यांत थोडे युरोपियन गृहस्थ मडमा व पार्शी ही दृष्टीस पडत होते

---

# The Berar Samachar

MONDAY, May 4, 1885

---

## THE RUSSIAN DESIRE FOR PEACE

Latest telegrams say that the prospects of peace are increasing and that the Russians are desirous of peace. So far the news is pacific; but it is doubtful if Russia has any the least sincerity of purpose when she is making declarations one way and taking action quite the other way. The questions involved in the Russian conquest of Afghanistan and her dangerous proximity to India in the event of that conquest are so directly concerned with the immediate and prospective interests of India as a nation, that we need ask no apology in bringing this subject so often before the public and try to give our interpretation of the Russian policy.

The theory that Russia in extending her dominion in central Asia, was legitimately taking possession of territory over which no European Power claimed suzerainty, has long

been exploded. The eyes of those that have asserted that there was no cause for alarm have long since been opened, and it is now established beyond doubt that Russia's progress in central Asia has not been without an aim. Having taken so much trouble in quelling disaffected tribes with so much loss to herself and no apparent gain, it would be absurd to say that Russia's, intentions are no more than pacific. It is said that the position of Russian finance is embarrassing and also that Russia is not prepared to meet a combination of European Powers. We do not possess an accurate knowledge of Russian finance; but it can be safely said that money is more plentiful in England than in Russia. However if Russia means war, she will not stop, because her financial condition is not sound. And as to the combination of European Power, Russia will not be very apprehensive of any such combination, as none of the principal Powers in Europe has the likelihood of her interests being injuriously affected; and even if some Power should side with England, some other would side with Russia. One reason more to influence the probabilities of peace is that the Ameer is indisposed to resent the Russian occupation of Penjdeh and the massacre of about 900 Afghans, the subjects of the Ameer, if only Russia should make peace on certain conditions. The very occupation of Penjdeh and that too at a time when General Komaroff knew perfectly well(as Sir Peter Lumsden tells us) that negotiations were being actually carrid on between the Russian and British government, was such a very aggressive and unjustifiable step taken by Russia that a declaration of war by England against Russia would have been amply justified. The British Government pocketed that insult and asked for an explanation; no satisfactory answer has been given and at this stage the British Government should advise the Amir (so says the Times of India) to forget the insult if only Russia should make peace. There is a limit to the good understanding between nations and we suppose Russia has already gone beyond that limit by her occupation of Penjdeh; and unless the most satisfactory explanation is given of General Komaroff's conduct and an apology and the damage sustained by the Afghans be offered England should at once declare war against Russia. Perhaps this is too much to expect from the Russian Government; but really we do not see how Russia will be entirely free from blame if she does not offer to do what we have stated she ought to. Under ordinary circumstances, the occupation of adjoining territory would not be of any consequence; but we suppose that in the present case England's prestige is concerned and if that is once injured as is surely to be the case if England quietly allows Russia to retain possession of Penjdeh, a more serious injury will have been done to the British raj in India than an actual defeat.

The best course therefore for England to follow would be to send an ultimatum requiring certain conditions to be fulfilled; which not being done, to declare and begin war both by sea and by land at once. We have been persistently of opinion that Russia is simply gaining time by diplomatic manœuvres for the due preparation of her forces on land and the equipment of her navy at sea; it would therefore be only wise on England's part to anticipate Russia's intentions; but if even now time is allowed to pass, the Russians will have every opportunity of making their forces ready for the strife and when the tide once comes on rushing, there will be no stopping it with a thumb.

---

The Civil Service question has been answered at last, in the negative, of course, by the Secretary of State for India. So the combined wishes of the *Native* inhabitants of India count for nothing and the host of numerously signed petitions have no value. Evidently, the Civil Service is to be for all *practical* purposes a closed door to the natives of India. The India Council so wills it and there the matter must end. Why go so far to the higher service; we might say that in Berar, an Assistant Commissionership is a rarity for a native and a Deputy Commissionership an absolute impossibility. The inferences that can be drawn from these facts with regard to the comparative position of the natives in the machinery of the Government of their own country, will be as plain as anything.

---

We give below the following from the Bombay daily of the 30th ultimo "Mr. A. J. Dunlop of the Berar Commission and at present in the employ of Nawab Ekbal-ood-Dowla, has been appointed by the Hyderabad Government, as Inspector-General in the Revenue Department. This is the first time that such a high appointment has been conferred on a European. Mr. Dunlop is an officer of considerable revenue experience and has made his mark in the Berars His appointment will therefore be very popular with all classes."

---

CORRESPONDENCE

To

The Editor of the Berar Samachar

Sir,

I am a co-tourist with your tourist; only my journeys commence from Bombay. In Bombay itself we saw a lot of things and we went twice to the High Court there. Tourist told me that the High Court Judges would require us to salaam them; I assured him no such thing was necessary. Tourist insisted that in Berar that was a necessity unless you are very fond of being fined and of losing your Sabs mehrbani. It took me a deal of trouble to convince him that whatever was the case in Berar, here in Bombay we had no such thing

We next went to see the Victoria Gardens; along with us was a servant of Tourist; before we reached the Garden the servant was sure that the Victoria Gardens could not possibly be better than Rambilas' Bagicha at Amraoti or your Temple Garden at Akola. Just as we stepped in, the fellow began to bow-down to every curious water-fountain for he thought he was in Paradise and saw a troop of Houris moving round him, so amazed he was at the scene, I really thought he would have to be sent to the Insane Hospital at Colaba; but Tourist at last succeeded in dispelling all those ideas of a Paradise and the Houris.

On our way back we got into a Tram-car and at Pydhonie we got down when the car was in slow motion; we beckoned the man to stop until the car stopped moving; but seeing his masters off, he would not mind us and got down exatcly as he ought not to have done and tumbled twice over to the great fun of the spectators. The fellow slowly got up swearing never to have, anything more to do with the tumbling train.

I could write many more incidents to you at Bombay; but I will refrain at present and give you an account of our journey to Poona.

Our servant who was sitting in a third class compartment close to our 2nd class one, was mighty proud when I told him that one of Sir Salar Jung's sons was travelling by the same train. 'I am going with a Minister's son, then said he and aired himself a little; but when he was told that for his impudence in sitting in the same train as the minister's son, he would be left in one of the dark bores in the ghauts, he seemd excited and would have jumped out of the carriage, if we had not undeceived him in time.

The ghauts did not of course look so beautiful as under the rains; but still the climate in the ghauts was cool enough; and as we neared Poona, it was delightfully cool.

Next time I shall give you a picture of a Parbhoo High Court Pleader we met in the train and a story of 2 Mahomedans, servants of Sir Salar's sons, who had the honor of having accompanied the Nawabsab to Rawal Pindi.

yours sincerely

" Co-Tourist. "

---

## पुस्तकांची वगैरे पोंच

'विदुषक' या नांवाचें वर्तमानपत्र कऱ्हाड येथें शाळेवर नवीन निघूं लागलें आहे. याच प्रमाणें लाहोर 'येथें मित्र विलास' या नांवाचें हिंदुस्थानी भाषेंत निघूं लागलें आहे. त्यांच्या कर्त्यां कडून नुकतेच कांहीं अंक आम्हां कडे आले आहेत त्यांचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों. आलिकडे नवीन नवीन वर्तमान पत्रें बरीच निघूं लागलीं आहेत. हें देश सुधारण्याचे कामास मोठें भूषण आहे.

इलिचपूर– "विद्यार्थी" पत्र पावलें. ते आपले पत्रांत म्हणतात कीं "तारीख १।५।८५ पासून येथील शाळेचे लोअर क्लास स्कुल व मिड्ल क्लास स्कूल असे दोन भाग झाले. वगैरे"

---

## वऱ्हाड

हवामान—उष्णता अतिशय होऊं लागली आहे. आकाश नेहमी आभ्राच्छादित असतें. गावांत ताप वगैरे आजारांची साथ बरीच आली आहे. फक्त पाण्याची मात्र विपुलता आहे.

नवाब इकबाल उद्दवला यांचे कडे नोकरीस असलेले व वऱ्हाड कामिशन मध्यें नावाजलेले मि. डन्लाप साहेब ह्यांची नेमणूक निजामसरकारचे राज्यांत रेव्हेन्युखात्यांत इन्स्पेक्टर जनरलचे जागेवर झाली असें मुंबईचे डेली वरून कळतें. सदर्हू प्रकारची मोठ्या हुद्याची व जबाबदारीची जागा युरोपियनास दिल्याचें हें निजामाचे राज्यांत पहिलेच उदाहरण आहे. ह्यांच्या नेमणुकीपासून सर्वांस आनंद होणार आहे.

हैद्राबादेस पटकीचा आजार सुरूं झाला असून त्यापासून बऱ्याच जिवांची हानी झाली.

गेले आठवड्यांत येथें राहत असलेले सारजंट व त्याचे दोन ख्रिस्त मित्र असे चौघे जण बरोबर बंदुका घेऊन येळवणचे जंगलांत गार्डीत बसून शिकारी करितां गेले होते त्या पैकीं येथील व्हालंटीयर लोकांस शिकविण्याकरितां ठेवलेले सारजंट मर्डॉक यांची बंदूक भरलेली होती ती गाडीचे धक्यानें उडाल्यामुळें गोळी चौघांपैकीं एका ख्रिस्तमित्राला लागून त्याचा तत्काळ प्राण गेला. मला कोणी बुध्या मारले नसून मी केवळ आपघातानें मेलों असें त्यानें प्राण सोडण्याचे आधीं लिहून दिलें होतें. सदर्हू गुन्ह्याची चौकशी डि. मा. मि. हेअर साहेब यांचे पुढें होऊन आरोपी सारजंट मर्डॉक यांची या कामांत हयगय होती असें ठरवून त्यास एक दिवसाची साधी कैद व शंभर रुपये दंड अशी शिक्षा केली. सदर्हू अपराधास ही शिक्षा फार थोडी झाली असें आम्हास वाटतें. सदर्हू प्रकारचे अपघात नेहमी शिकारीचे वेळीं होतात त्याकरितां बंदूक वापरणारांनीं ज्यास्त काळजी घ्यावी म्हणजे फार अपघात होणार नाहींत अशी आमची त्यांस सूचना आहे.

दहिहांडा येथील तत्रपोष्टमास्तर यांस मनीआर्डर वगैरे पैशाचा खानगीकडे उपयोग केल्याबद्दल मि. डेवीस साहेब यांनीं दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली व ती शिक्षा फार कडक व अयोग्य झाली अशा बद्दल आम्ही आपले पत्रांत दोन वेळ लिहिलें होते.

सदर्हू ठरावावर कैदीनें अपील केलें होतें त्याचा निकाल गेल्या आठवड्यांत झाला. ह्यांत मे. ज्युडिशिल कमिशनर साहेब यांनीं सदर्हू आपिलाचा योग्य विचार करून दिलेली शिक्षा कमी करून फक्त तीन महिन्याची कायम ठेविली.

वरील प्रकर्णांत आमचें लिहिण्याचा बराच उपयोग झाला हे पाहून आम्हास आनंद वाटतों.

येथें खालीं असलेल्या ए. अ. क. च्या जागेवर कोणा एका मि. बोवीन नावाच्या तरुण गृहस्थाची नेमणूक झाल्या प्रमाणें ते येथें येऊन हजर झाले. ह्यांस खजीन्याचें काम द्यावें असें वरिष्टांचें ह्मणणें आहे. एवढ्या जबाबदारीचें काम केवळ नवाशिक्या व तरुण गृहस्थास देणें वाजवी नाहीं असें आह्मास वाटतें. सदर्हू नेमणूकी मुळें बऱ्याच लोकांचें हक्क मारले गेले ह्या बाबतींत आह्मास आणखी लिहिणें आहे तें पुढें सवडीनुसार लिहूं

हैद्राबाद येथें व्हालंटियर लोकांचा रिसाला तयार करण्याची खटपट चालून त्यांत नेटिवास घेणार अशा बद्दल एकसभाही झाली. अध्यक्षस्थानीं नबाब मुनिर उल मुल्क होते. सुमारें साठ नेटिवांची नावें दाखल केलीं. सदर्हू पलटणीच्या आ. कर्नलचें काम खुदानिजाम सरकार पतकरणार असून कंप्याडरचे काम क. लडलो आगर मेमरगफ यांजकडे देणार असें समजतें.

निजाम सरकारची स्वारी, दिवाण व दुसरे अधिकारी यांसह या महिन्याचे प्रारंभी उटी येथें जाणार असून सर्व महत्वाचे काम तेथेंच चालणार. नेहमीचे वहिवाटीचे काम नवाब मुनिर उलमुल्क हे चालविणार.

---

## वर्तमानसार.

नेपाळांत वायकांना सोडचिठ्ठी देतांना त्यांचे केस काढून टाकतात.

एडिटरचें काम—पारिस शहरांत एके दिवशीं भाऊ भाऊ असलेले दोन पोलिस अमलदार बंदुका, तलवारी घेऊन एका वर्तमानपत्राच्या आफिसांत निंदास्पद मजकुराबद्दल सूड घेण्यास शिरले; पण त्यांतील एकास गोळी लागून व घायाळ होऊन दोघांसही निमूटपणें घरचा रस्ता धरावा लागला. तेव्हां पारिसांत एडिटरचें काम करणें म्हणजे मुठींत प्राण घेऊन केलें पाहिजे. अमेरिकेंतही हें काम मोठें जोखमीचें आहे; पण तेथें त्या लोकांनीं एक युक्ति काढिली आहे. तेथें एक शस्त्र चालविणारा व दुसरा पेन चालविणारा असे दोन एडिटर असतात. तेणेंकरून पत्राचें काम अव्याहत चालतें. एडिटरचें काम कांहीं स्वर्ग सुखाचें नव्हे. सु० प०

रशियन सैन्यसमुद्र—अनेक गोष्टीवरून रशियन व इंग्लिश याचें मध्यएशियासंबंधानें युद्ध होईलसे दिसत नाहीं. परंतु युद्ध सुरूं झालेंच तर त्यांत कोणास यशाचा वांटा मिळेल हें कांहीं सांगता येत नाहीं. रशियनांची सैन्यव्यवस्था कशी आहे ती जर बघितली तर छाती दडपून जाते! आतां रशियनांचें राष्ट्रही तसेंच विस्तृत असल्यामुळें इतकें सैन्य म्हणजे कांहीं फारसें नाहीं असें कोणासही वाटेल. परंतु इतकें सैन्य आमच्या इकडे त्यांच्याशीं सामना करण्यास नाहीं ह्याबद्दल आम्हास भीति वाटते. आम्ही जे पुढें आंकडे देत आहोंत तें सर्व सैन्य, आजच्या घटकेस जर लढाईचा हुकुम झाला तर तावडतोब तयार आहे! यावरून रशियाची किती सिद्धता आहे हें दिसेल:—७,१८,००० पायदळ, ९३,००० रायफलमेन, ९६,००० घोडेस्वार, ( या घोडेस्वारांत जरूर लागली तर त्याचक्षणीं ४८,००० कासाक्स जातीचे घोडेस्वार अगदीं तयार आहेत), ३८,००० तोफखान्याकडील लोक, ३,९९६ तोफा, आणि ३९,०००इंजीनिअर. एकंदर समरांगणावर जाण्यास अगदीं सिद्ध असलेलें लष्कर १०,३८,००० आणि ३,६०० तोफा इतकें आहे. या शिवाय वेळ पडल्यास तावडतोबह्या लोकांस मदत मिळण्याकरितां पाहल्या वर्गांतील पहिल्या प्रतीचे राखून ठेविलेले असे ४,००,००० लोक आहेत; त्यांतून १,४३,१०० लोक तर त्याचक्षणीं सर्व प्रकारच्या युद्धसामग्रीनिशीं रणांगणीं अगदीं ठेविल्यासारखे सज्ज आहेत. आणि पहिल्या प्रतिराखून ठेविलेले असे २०,००,००० लोक आपल्या आपल्या सरमजामानिशीं तयार आहेत. याशिवाय दुसऱ्या वर्गांतील किती लोक आहेत याची गणती कळलीच नाहीं! हा रशियन सेनासमुद्र व त्यांतील संख्या ऐकूनच जीव दडपून जातो! यावरून रशियन प्रकरण कांहीं सामान्य नाहीं असें दिसतें. हें युद्ध माजलें तर प्राचीन भारती युद्धाचें पुनश्चित्र पाहिल्यासारखेंच व्हावयाचें! ईश्वर तो रणसंग्रामाचा प्रसंग न आणो.

मुद्रणत्वरा—लंडन टाइम्स पत्रकर्त्यानें वाल्टरप्रेस म्हणून अति शीघ्रगतिचें एक यंत्र आपल्या छापखान्यांत तयार केलें आहे व त्यावर प्रत्येक तासाला १५००० प्रती छापल्या जातात असें प्रसिद्ध झालें आहे. परंतु अमेरिकेंतील त्या कामांतलें कसब विलक्षणच आहे. अमृतबझार पत्रिकाकर्ते लिहितात कीं, आम्ही न्यूयार्क स्टार नांवाच्या एका छापखान्यांत गेलों होतों; तेथें तें पत्र छापण्याचा कारखाना चालला होता तेव्हां ती छापण्याची त्वरा बघून आम्ही अगदीं थक्क झालों! त्या छापखान्यांतील यंत्रावर ३५००० प्रती एका तासामध्यें छापून तयार होते व त्या बरोबरच त्याच्या दुसऱ्या बाजूस घड्या पडत. म्हणजे, प्रत्येक मिनिटास सुमारें ५०० वर प्रति छापून निघत व तितक्याच घड्या पडून वर्गणीदारास देण्यास तयार होऊन दुसऱ्या बाजूस त्यांचा ढीग पडे! हा कारखाना चालू असलेला बघितला म्हणजे मनाची स्थिति कांहीं चमत्कारीक होऊन जाते, असें अमृत बझारपत्रिकाकर्ते म्हणतात. बरें, ह्या कारखान्यांतील हा येवढाच मुद्रणत्वरा आहे असें नाहीं वर्तमानपत्राची फार्मच्याफार्म मोडून यांत्रिक साधनानेंच त्याचे खिळे वेग वेगळे होऊन आपल्या आपल्या घरांत जाऊन पडूं लागलेले दिसतात! यावरून अशा प्रकारची मुद्रणत्वरा जगावर कोठेंही नाहीं. सर्व कामांत अमेरिकन लोक पुढें आहेत ते असे. हें यंत्र बघितलें तर फारसें मोठें आहे असें नाहीं. तें १५ फूट लांब ९ फूट रुंद आणि ४॥ फूट उंच असें असून त्याची रचनाही अगदीं साधी अशी केली आहे. याच यंत्रांत दुसरी अशी सोय केली आहे कीं, कागद छापणें व त्यांच्या घड्या होणें ही कामें वर लिहिल्या शीघ्रगतीनें होऊन त्या, त्याबरोबरच किती कागद छापून घड्या घातले गेले हें मोजले जाते व त्याची नोंद टिपली जाते! सचित्रपत्रें छापलीं जातात, त्यांमध्यें चित्रांचे तक्ते खोदण्याचें काम कांहीं यंत्रानें निघेल तर पाहिजे होते तेंही यंत्र पण नुकतेंच अमेरिकेमध्यें कोणी मि. जे ह्यूईट नांवाच्या एका छापखानेवाल्यानें काढिलें असून, त्याच योगानें अति शीघ्रगतीनें चित्र चित्रपट खोदले जातात व हातच्यापेक्षां तें काम फार सुबक होतें असें ह्मणतात. जगावर ईश्वर मानवी बुद्धीच्या योगानें किती प्रकारच्या सुधारणा दाखवील हें कोणासही कळत नाहीं.

युवराज प्रिन्स ऑफ वेल्स आयर्लंडांत गेल्याचे पूर्वीं कळविलेंच आहे. त्यांचा ता० १४ रोजीं तेथील कित्येक चटोर लोकांनीं अपमान केला. परंतु पुढें पोलिसाचें बंदोबस्तानें जास्त प्रकरण वाढून चिरडीवर गेलें नाहीं. ज्ञा० च०

नोटीचे भावांत गडबड--हल्लीं चालू असलेल्या धामधुमीमुळें प्रामिसरी नोटींचे भावांत बरीच गडबड उडाली आहे. चार टक्याचा भाव ९३ व साडेचार टक्याच्या नोटीचा भाव ९७ याप्रमाणें आहे. विकत घेणारापेक्षां विकणारांची संख्या फार असते.

नौसरी येथील विधवा स्त्रिया ह्या आपले दुःखदायक स्थितीविषयीं श्रीमंत गायकवाड सरकारास अर्ज करणार असल्याचें कळतें

एक तरुण चैनी पारशी--पूर्वी ब्रुइलेय व वाटसन कंपनींत नोकरीस असलेला पारशी फेकोबाद कर्शेटजी राव यानें त्याचा चुलता जमशेटजी एरचजी राव याच्या कपाटांतून ६,२०० रुपयांच्या नोटी चोरून त्यांजवर येथेच्छ चैनबाजी उडविली. एके रात्रीं एका विलायती ऐषआरामालयांत जाऊन एथील गौरकाय दासीला भुलून ९०० रुपये बक्षीस दिलें पुनः अशाच दुसऱ्या एका ठिकाणीं जाऊन तेथील गौरकाय दासीला ६,०० रुपये बक्षीस दिले. आणि एक दिवस एका आईस्क्रीमच्या दुकानांत जाऊन तेथें २४० रुपये खाण्यापिण्यांतच उडविले. या स्वारीनें केवळ तुर्तातुर्त विषयास भुलून न जातां अडीअडचणी करितां दूरदृष्टीनें या रकमेपैकीं २५ रुपये सेव्हिंग व्यांकेंत ठेविलें आहेत. याच्या औदार्याचा उपभोग घेणारे एक यांचे तरुण मित्र गोंव्याकडे झुकलें आहेत. पण ते लौकरच चतुर्भुज होऊन इकडे येतील असें म्हणतात. माजिस्ट्रेटानें या वर्तनाचें कारण विचारतांच तावड तोब जबाब मिळाला कीं, "प्रेम अंधळें आहे" आणि "पैसा कृपणासारखा सांचवून ठेवणें मुर्खपण आहे"! ! ! इं० प्र०

नाशीक येथें कांहीं बदमाष लोकांनीं रात्रीं रस्त्यांतील कंदीलफोडण्याचा व त्यांतील चिमण्या चोरून नेण्याचा उद्योग चालविला आहे. तसेंच शहरांत रात्रीं कोठें कोठें घरावर मोठ मोठाले धोंडे येतात. स्टेशनावर जाण्याच्या रस्त्यावर रात्रीं एकटा दुकटा तांगा असल्यास त्यावर दगड येतात, असें बदमाषीचे अनेक प्रकार सुरूं झाले आहेत, ह्यामुळें लोकांस फार त्रास होत आहे. तरी पोलिसांनीं तावड तोब ह्याचा बंदोबस्त करावा

कलकत्यांतील एका नेटिव्ह गृहस्थास प्रो. म्याक्समुलर यांनीं नुक्तेंच एक पत्र लिहिलें आहे त्यांत खालील मजकूर आहे:-- तुम्हांस रिपन साहेबांसारखा शहाणा व्हैसराय नसता तर इल्बर्ट बिलास अननुकूळ लोकांचा व अविचारी राज्यपद्धतीचा भयंकर परिणाम लौकर दृष्टे प्रत्तीस आला असता. प्रस्तुत सर्व हिंदुस्थानभर जी राज्यनिष्ठा दृष्टोत्पत्तीस येते ती लार्ड रिपनच्या राज्य व्यवस्थेमुळें होय. ही राजनिष्ठा पाहून आपल्या राजनीतिचें पुर्ण फल आपल्यास आलें असें रिपन साहेबांस वाटेल व वाटावें. आपले राणी साहेबांचें राज्य संरक्षणार्थ कांहीं राजे रजवाड्यांनीं आपलीं सैन्यें इंग्लिश सरकारच्या स्वाधीन करण्याचें बोलणें लाविलें लें पाहून मला फार संतोष झाला आहे. हिंदुस्थानांतील इंग्लिश लोकांच्या अपलपोटी ओरडीकडे लक्ष देऊन प्रत्येकीं मर्जी सरकारानें बिघडविली असतीं तर काय स्थिति झाली असती बरें! परकीय राजाचें राज्य तुम्हांवर असणार ही गोष्ट जर कबूल असेल तर इंग्लंड देशाचे राणी सरकारापेक्षां इतर कोणत्याही परकीय राष्ट्राची राज्यसत्ता तुह्मांस जास्त चांगली व सुखावह होणार नाहीं. इंग्लंड देशांत कितीही दुर्गुण असेल तरी त्या देशा सारखा देश क्वचित सांपडेल व तो देश परराष्ट्रानें जिंकला तर या जगांत राहण्याची मला नाहीं. प्रस्तुतचा प्रसंग भयंकर आहे हें निर्विवाद आहे व जरी इंग्लंडच्या हांतून चुका झाल्या आहेत तरी आपलें संरक्षण करण्याची इंग्लंडाच्या आंगीं शक्ति आहे, व रशियाची हिंदुस्थानांत हात लावण्याची छाती नाहीं हें तुमच्या लोकांच्या राज्यनिष्ठेवर अवलंबून आहे परंतु राजनिष्ठेबद्दल मला कधींच शंका नव्हती.

रशिया व इंग्लंड यांचेमध्यें लढाई सुरूं झाल्यास टर्की त्रयस्थ राहील असें तेथील एका वजनदार पत्रांत लिहिलें आहे.

काश्मीर शिवायकरून हिंदुस्थानांतील अम्मलदारांस रजा घेणें झाल्यास आपण नोटीस पोंचल्यापासून तीन दिवसांचे आंत कामावर हजर होऊं अशी खात्री दिली पाहिजे.

पैशाची ओढ—एप्रील आणि मेच्या खर्चा पुरती रकम शिलक राखून बाकीचा पैसा तालूक्यांतून हुजूर खजिन्यांत आणून ठेवा, इकडे पैशाची गरज लागेल ह्मणून सरकारचा हुकूम सुटल्याचें समजतें. ने० ओ०

मेजर जनरल जार्ज पोत या नांवाचे एक सद्गृहस्थ नुकतेच वारले. यांनीं आपल्या मृत्युपत्रांत मुंबई युनिव्हर्सिटीस १०००० रु० देण्याविषयीं लिहून ठेविलें आहे.

तंजावर येथील कृष्णस्वामी मुदलियार यांनीं दक्षिण हिंदुस्थानांतील शेतींत सुधारणा करण्याविषयीं पुष्कळ श्रम घेतल्यावरून मद्रास सरकारानें त्यास एक सोन्याचें पदक इनाम दिलें.

थोडे दिवसांपूर्वी अमृतसर येथें खतरांनी विधवेचा पुनर्विवाह झाला. या बाईस लाहोर येथील विधवाविवाहसंपादक सभेनें तिच्या ह्या सत्कृत्याबद्दल एक अंगठी नजर केली आहे.

कलकत्ता येथील इंडियन एंपायर नांवाचें पत्र आतां रोज निघूं लागलें. तसेंच न्युज आफ विडे या नांवानें दुसरें एक नित्यनिक पत्र तेथें चालू महिन्यापासून निघूं लागलें आहे. न्या० सु०

वतनदार आक्टांत कांहीं नियमित गुन्हे वतनदारांनीं केल्यास त्यांचें वतन खालसा करावें असें एक कलम आहे- सद्यां त्या आक्टाची दुरस्ती चालली असून दुरस्तीच्या वेळेला असें एक नवीन कलम त्या आक्टांत घुसडून देण्याचा विचार आहे म्हणतातकीं— खुद्द वतनदार अगर त्यांनीं नेमून दिलेले मुतालीक यांणीं जरी गुन्हा केला, तरी त्याबद्दल वतनदारच जबाबदार धरले जाऊन त्यांच्यावतणावर नांगर ओढणार! खरोखर त्या आक्टाची अशी दुरस्ती व्हावयाची असेलतर वतनदारांस सरकार निवळ जुलुम चालवितें असें म्हणणें भाग येतें. सरकारच्या मनांतून होईल तितकी डाल हौशी चालवावयाची तर भरली नसेल ना! आपल्या मुतालिकाबद्दल आपण एवढी हमी कोण घेईल बरें! सरकारानें वतनदारांवर थोडी दयादृष्टी ठेवून असला भलता सलता नियम करण्याचें भरीस पडूनये. आणि या बाबदींत वर्तमान पत्र कर्त्यांची ओरड फारशी पुरी पडावयाची नाहीं, तेव्हां पूर्ण सार्व जनीक सभेनें थोडी उचल घेतल्यास वतनदार लोक त्याचे आभार मानतील धा० सू०

कोल्हापूर—नऊ मैल कोणी विमान उडविणार आहे अशी वंडी पिटल्यामुळें दहा बारा हजार लोक माळावर जाऊन सायंकाळ पर्यंत उन्हांत तळमळत बसले आणि शेवटीं खोटी वंडी पिटविणारावर लाखोली वाहत परत आले! ही एक मौजच.

☞ हें पत्र आकोला येथें कै. वा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डाक हाशील ०१२
साहामाही ,, ३ ,, ,, ०८
साल अखेर ,, ७ ,, ,, १०८
कीरकोळ अंकास ........................०४

Per annum in advance 5 Postage 12as
Perannum in arrears 7 " 1 R8as
Six monthly ......... 3 " 8as
Single opy .............................. 4as

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत
पुढे दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..... ०१

Advertisements
Below 10 lines......2as
Per line over 10 ...4as
Repetition per line 8as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XIX AKOLA MONDAY MAY 11 1885 NO 18

पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख ११ माहे मे सन १८८५ इ० अंक १८

## पक्षकार लोकांसफार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी. ए., एल एल. बी., मुंबई हायकोर्टाचे वकील हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हापीस "वऱ्हाडसमाचार" छापखान्याशेजारी काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

ता. ९ दिसेंबर १८८४ } पत्रकर्ते.

## डाक्तर गोविंदराव खोत यांनीं विशेष काळजीनें तयार केलेलीं सरबतें.

१ गुलाबाचें सरबत. २ लिंबांचें सरबत. ३ डाळिंबांचें सरबत. ४ नारिंगाचें सरबत. ५ द्राक्षांचें सरबत.

हीं सर्व सरबतें फक्त फुलांच्या व फळांच्या अर्कांचीं केलेलीं असून उत्तम प्रकारचीं आहेत; आणि उष्ण देशांत थंडाई आणण्याचे जे गुण सरबतांत असावे ते वरील सरबतांत आहेत. बाजारांत मिळणाऱ्या या प्रकारच्या हलक्या जातीच्या सरबतांस वाईट दाचे व गंध असतो, त्या मुळें पुष्कळ लोकांस तीं घेणें आवडत नाहीं, म्हणून आमचीं सरबतें चांगलीं रुचकर व सुगंधी करण्याची पुष्कळ काळजी व श्रम आम्ही घेतले आहेत असें खात्रीनें कळवितों. हीं सरबतें पाचक, रुचकर, थंडाई आणणारीं, व मधुर आहेत. यास्तव उन्हाळ्यांत हीं फार हितकर आहेत. आणि इतर सरबतांच्या अंगीं दाह उत्पन्न करण्याचा जो दोष आढळतो तो यांच्या अंगीं बिलकूल नसल्यामुळें हीं सर्वांनीं घेण्यास विशेष योग्य आहेत.

घेण्याची कृती २ पासून ३ मोठे चमचे कोणत्याही स० चे पेलाभर पाण्यांत घेणें.

ह्या सरबतांचा मोठा कारखाना उमरावतीस मालकानें घातला आहे. ज्यांस हीं सरबतें हवी असतील अशा व्यापाऱ्यांनीं तीं मागवून घेण्याबद्दल त्यांस विनंती आहे.

### किंमत.

गुलाबाचें सरबत ९ रु० एक डझन मोठ्या बाटल्यांस
लिंबांचे " " ९ " " " "
डाळिंब (अनार) ९।१२ " " " "
संत्र्याचें १०।८ " " " "
द्राक्षाचें १२ " " " "

दर डझनच्या पेटीला व प्याकिंगला चार आणे शिवाय पडतील.

एकदम घेणारास शेंभर रुपयांस ८ रु० कमिशन दिलें जाईल.

सरबतें उमरावती व अकोलें येथें 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत मिळतील.

पत्ता डा० गो० व्ही. खोत उमरावती.

DR. G. V. KHOT'S SPECIALITIES.

1. SYRUP of ROSES 2. SYRUP of LEMONS SYRUP of POMEGRATES 4. SYRUP of ORANGES 5. SYRUP of GRAPES

All the above Syrups, being of the finest quality, and containing only the extracts of the juice of the respective flowers, and fruits may be confidently relied on as possessing all the cooling properties for which these syrups are so justly appreciated in tropical climate. The proprietor, aware of the many objections persons have to inferior specimens of these syrups sold in the market consequent on their bad smell and taste, begs to state that every pain and precaution is taken to make the above syrups as palatable and agreeable as syrups ought to be. These syrups form a light, agreeable, highly cooling, as well as delicious drinks in warm weather whilst the entire absence of any heating or stimulating properties so much complained of in other kinds of drinks renders them for general use very preferable.

Dose—2 to 3 table-spoonfuls of any kind of syrups in a cup full of water makes a delicious cooling draught.

The Proprietor also states that he has opened in this town a manufactory on a large scale for the preparation of these syrups and traders are requested to send in their orders.

Prices.

Syrup of Roses...*Rs.* 9 per Dozen Quarts.
" Lemons .........*Rs.* 9 "
" Pomegranates *Rs.* 9-12 "
" Oranges ...... *Rs.* 10-8 "
" Grapes......... Rs. 12 "

Commission *Rs.* 8 per cent for cash remitted with order.

Annas four for box and packing per dozen extra.

Amraoti, March 1st, 1885

Address

To

G. V. Khote, Amraoti

### नोटीस.

चिरंजीव राजश्री मारुतीलाल वल्लद कणीराम जात ब्राह्मण रहाणार कसबे शेगांव तालुके खामगांव जिल्हा अकोला यांस. कन्हयालालजी मिसर रहाणार पेठ उमरावती तालुका व जिल्हा मजकूर याचे अनेक आशीर्वाद उपरी लिहिणें विशेष तुम्हास या पत्रद्वारें नोटीस देण्यांत येते कीं आमची जेष्ट कन्या सौभाग्यवती चुनी हिचें तुह्मासी लग्न झालें त्यास अजमासे दहा अकरा वर्षे झालीं असून आलीकडे सहासात वर्षांपासून तुम्ही तिचा प्रतिपाळ करीत नाहीं. सुमारें सहासात वर्षांपूर्वीं आमच्या तुह्मी घरचें जेव्हा मुलीच्या आंगावर दागिनें होते ते काढून घेऊन तिला तुह्मी उमरावतीस आणून आमच्या घरीं पोचते केलेत. त्या दिवसांपासून ह्मणजे अजमासे सहासात वर्षांपासून आमची सदर्हू मुलगी चुनी ही आमचे घरींच आहे. मुलगी शहाणीसुती असतांही तिला तुम्ही आपल्या घरीं नेऊन तिच्याशीं जनरूढीप्रमाणें प्रपंच करीत नाहीं. हा प्रकार सदोदीत न चालावा यासाठीं मी तुह्मास दोन चार वेळा पत्रानें कळविलें असून सुमारें चार महिन्यापूर्वीं एकवार रजिस्टर करून नोटीस ही पाठविली होती. परंतु तुह्मी पत्राचा किंवा नोटीशीचा जबाब पाठविला नाहीं आणि मुलीला ही घेऊन गेलां नाहीं. यासाठीं निरुपाय होऊन या वर्तमानपत्रांतील नोटीशीनें तुम्हास एकवार असें कळवितों कीं अशा प्रकारचे अपशांतील तंटे कोर्टांत येणें आपल्या सारख्यांस उचित नाहीं. करितां ह्या नोटीशीच्या द्वारें तुह्मास शेवटचे हें सांगणें आहे कीं तारीख १० (दहा) माहे जून सन १८८५ इसवीचे आंत तुम्ही जातीनें येथें येऊन अगर आप्तवर्गांपैकीं कोणाला पाठवून चिरंजीव सौभाग्यवती चुनि हिला आपले येथें घेऊन जावें. आणि जनरूढी प्रमाणें आणि आपण दिलेल्या आणभाके प्रमाणें तिच्याशी संसार करावा. सदर्हू ता० १० जून १८८५ पूर्वीं तुम्ही तिला घेऊन गेल्यास आमच्या मालकीचे तिच्या आंगावर असलेले दागिनें तुम्ही काढून घेतले त्याची किंमत अजमासे रुपये २०० अक्षरीं दोनशें, आणि इतक्या वर्षें तिला आमच्या घरीं तुम्ही ठेविलेत त्या मुळें तिच्या अन्नवस्त्राकरितां जो खर्च आम्हाला करावा लागला त्या बद्दल आम्हाला कोर्ट मार्फत कायदेशीर व्यवस्था करावी लागेल. कळावें हे आशीर्वाद. ता. ३।५।८५ इ.

(सही) कन्हयालाल वल्लद लालजी मिसर दस्तूर खुद.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

उमरावती ता. ५ मे १८८५ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. महाराज मी आपल्या ओळखीचा तर नाहीं पण आपल्या किर्तीची दुंदुभि जगांत वाजत असल्यामुळें एक वेळ आपली भेट घ्यावीसें वाटलें आणि ह्या चार ओळी घेऊन मुद्दाम आलों आहे तर किंचित जागा मिळेल अशी आशा आहे.

महाराज मी व माझा मित्र नियमप्रमाणें पूर्वे कडील एका महान जिन्यांतील पक्षांस दाणा पोंचविण्या करितां गेलों असतां वाटेंत दोन नवीन विद्वानांची आपसांत भाषणें चाललीं होतीं तीं सहज माझ्या कानीं पडलीं तीं अशीं.

पहिला— (दुसऱ्यास) तहासिलदार साहेबांचे घराकडून गढीचे मारुती कडेस जो दगडी भयंकर खोल, इतकेंच नाहीं तर दिवसा सुद्धा जाण्या येण्यास दुःसह असा रस्ता आहे. व त्यामुळें कइकांना दुखापती होतात. त्या बद्दल लोकांनीं अर्ज कां केला नाहीं?

दुसरा — (पहिल्यास) मी तो केल्याचे ऐकून मुनासिपाल कमेटीचे प्रेसिडेंटानें तावडतोब सेक्रेटरीकडे पाठविल्याचे ही ऐकले आहे.

पं.—: तर मग मजकूर तरी पाहिला अगर ऐकला जर असेल तर सांग पाहूं निकाल?

दु.—मला वाटते तू ज्या बद्दल विचारलें तेंच असावें आणि ह्या शिवाय त्या सडकेवर तीन कंदील, कचऱ्याची पेटी आणि सरळ पक्का रस्ता व्हावा वगैरे होते. आणि निकाला विषयीं तर कांहींच समजलें नाहीं व ह्याला बरेच महिने लोटल्या मुळें एका गृहस्थानें दाद ही मागितली होती.

प.— त्या हद्दींत दुर्लक्ष कां?

दुसरा — तिकडे कोणी मुख्य सरकारी नोकर, सावकार अगर मुनसिपल आफिसर अगर कारभारी नाहींत अथवा देवस्थान ही नाहीं.

पहिला म्ह. मित्र मंडळी रहात नाहीं काय?

दु. —अं तसें पुष्कळ आहेत. पण त्यांत मुख्य तू कोणतें समजतोस तें मला समजलें पाहिजे.

प. — सदर्हू जे सरकारी नोकर, सावकार, कमेटीचे मुख्य, व निदान सार्वजनिक क्रिया हेच समज.

दु.—ह्या पैकीं तर कोणीच नाहीं.

प.— तर मग आतां.

दु.— उपाय नाहीं.

प.—तेथें व्यवस्थेत सुधारणा करण्यास अतोनात पैसा खर्च होईल काय?

दु.—. तसें नाहीं पण वरील चार प्रसिद्ध गृहस्थांपैकीं चवथा प्राणी तरी वसतीस पाहिजे.

प.— म्हणजे होईल काय?

दु. — वाः होणार कां नाहीं, दरिद्राला कोण भितो. पुष्कळ शिल्लक आहे.

प.— मुख्य अधिकार कोणाला आहे नेटिवाला कीं युरोपियनाला?

दु.— नेटिवाला?

प.— युरोपियन सरदार कधींच व कोणीही येत नाहीं काय?

दुसरा— आणिले तर पाहिजे? मग गांवपर्यंत तसेंच रहाते कां? मी तर प्रति-

ह्मेनें सांगतों कीं ते मुळींच राहिले नसते.

प. ( मोठ्या घड्याळाकडे पाहून )— अरे दहा वाजले. व मला आपले कामीं जावयाचे आहे तर आतां ह्या विषयीं आणखी कधीं बोलूं.मात्र ध्यानांत ठेव हो! जातो गड्या! नमस्कार!

एवढें ऐकून मी ही चालता झालो. कळावें लोभ ठेवा महाराज.

आपला अपरिचित
"सवाई"

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य १९ शके १८०७

## लार्ड रान्डाल्फ चर्चिल-साहेब यांचा हिंदुस्थानांतील प्रवास.

लार्ड रॉन्डाल्फ चर्चिल साहेब आपला हिंदुस्थानांतील प्रवास आटपून स्वदेशीं (लंडन येथें) तारीख ७ एप्रिल रोजीं जाऊन पोचले. तारीख ८ रोजीं पत्रकर्त्यांच्या सभेच्या रिपोर्टरांनीं लार्ड साहेबांची गांठ घेऊन, प्रवासांत घडलेल्या गोष्टींची सर्व हकीकत विचारून घेतली. आणखी दुसऱ्या कांहीं प्रश्नांस जबाब देतांना ते म्हणाले कीं:— " मला इंग्लंड सोडून १९५ दिवस झाले व इतक्या थोड्या दिवसांत मी १,२८,००० मैल फिरलों. ह्यावरून हल्लींच्या दिवसांत थोडक्या काळांत पुष्कळ ठिकाणची माहिती किती लवकर घेतां येते हें दिसून येईल. माझ्या सर्व प्रवासांत मी ज्या ज्या ठिकाणीं गेलों त्या त्या सर्व ठिकाणीं माझा सर्व लोकांनीं मोठ्या आनंदानें बहुमान देऊन सत्कार केला. मला निरनिराळ्या मार्गांनीं पुष्कळ माहिती मिळाली. दुसऱ्या कोणत्याही मार्गानें इतकी माहिती हिंदुस्थानच्या राज्या संबंधीं मला मिळाली नसती; व जी कांहीं खरी माहिती मला साहजिक मिळाली तिजपासून हिंदुस्थानचे कल्याणाविषयीं ज्यास्त काळजी घ्यावी असें मला वाटूं लागले आहे. तथापि धांदलींत केलेल्या प्रवासांतील मिळविलेल्या माहिती वरून हिंदुस्थानची हल्लींची स्थिती कशी आहे व ती पुढें कशी होईल ह्या बद्दल खात्रीनें मी आपलें मत देऊं शकणार नाहीं. परंतु मला असें वाटतें कीं हिंदुस्थानांतील प्रवासा पासून होणारी चमत्कारिक स्थिती व त्या पासून होणारे महत्वाचे फायदे यांची कल्पना इकडील लोकांचे लक्षांत ही येणार नाहीं. आपल्या देशबांधवांपैकीं पुष्कळ जण व मुख्यत्वेंकरून राज्यप्रकरणांत लक्ष देणारे आपले पूर्वे कडील राज्य पाहण्यास जात नाहींत हें पाहून मला फार नवल वाटतें. हिंदुस्थानांत राज्य प्रकरणा सारख्या भानगडीच्या गोष्टींचे निकाल इतक्या त्वरित रीतीनें होत आहेत कीं त्यांचा तेथें जाऊन अभ्यास केल्या शिवाय ह्या विषयाची खरी कल्पना तो देश पाहणाऱ्यांचा मनांत येणार नाहीं. हिंदुस्थान व इंग्लंड ह्या मध्यें मोठें अंतर असल्यामुळें मोठा तोटा आहे असें तेथील लोकांस वाटत आहे. त्यांचे संबंधाच्या जितक्या गोष्टी आहेत त्या सर्व मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या मार्फत व सरकार यंत्रांतून गाळून जात असल्या कारणानें त्यांचे खरे विचार ग्रेटब्रिटन मधील लोकां पुढें योग्य रितीनें ठेविले जात नाहींत व म्हणूनच ज्या राजकार्यधुरंधर पुरुषा पाशीं आपला ज्या पासून तोटा आहे अशा हकीकती सांगतां येतील त्यांचा सत्कार करण्यास त्यांना फार आनंद होतो." प्रवासाच्या वर्णना बदलच्या प्रश्नास जबाब देतांना लार्ड साहेब म्हणाले कीं, "मी पहिल्यानें मुंबईहून पुण्यास गेलों. नंतर तेथून दक्षिण महाराष्ट्र देशांतील जुन्या व पाहण्या लायक अशा प्रख्यात बिजापूर शहरीं गेलों, व परत मुंबईस आलों. मुंबईहून मग इंदुरास जाऊन सर लेपेल ग्रिफीन यांचे येथें राहिलो. महो येथें जी लष्करी लोकांची मोठी छावणी आहे ती त्यांचे बरोबर जाऊन पाहिली. इंदूर येथें महाराज होळकर सरकार यांची भेट घेतली व कोटें वगैरे पाहिलीं. इंदुराहून सर लिपिल यांचे बरोबर ग्वाल्हेर येथें जाऊन सिंदे सरकारची मुलाखत घेतली. सिंदे सरकारच्या सुमारें ७००० सैन्याची मैदानावर कवाईत पाहिली. मला जरी लष्करी खात्याची फारशी माहिती नाहीं तथापि मी इतकें खात्रीनें सांगतों कीं सदहू लोकांची कवाईत वगैरे हुबेहुब ब्रिटिश सैन्या सारखीच होती. बहुत करून संस्थानांतलि तद्देशीय लोकांची फौज पूर्वीचे लष्करी कामाकरितां निःशस्त्र होती असेंच म्हटलें पाहिजे. काजचे टाईम्स पत्रांत सर लिपेल ग्रिफीन यांनीं हिंदुस्थानच्या नेटिव संस्थानांतील सैन्याचें वर्णन दिलें आहे तें खरें व विश्वसनीय आहे. ग्वाल्हेराहून लखनौ येथें गेलों व तेथून आयोध्या व नेपाळ यांच्या सरहद्दीवरील टेराई या गांवीं जाऊन १५ दिवस मुक्काम केला. ह्या ठिकाणीं आम्ही शिकारीमध्यें एक चांगला वाघ व दुसरीं पुष्कळ हिंसक जनावरें मारलीं. ह्या प्रसंगीं आम्ही पुष्कळ प्रदेश व खेडींपाडीं ही फिरलों. ह्या व दुसऱ्या बहुतेक ठिकाणीं शेतकीची व शेतकरी लोकाची खरी स्थिती पाहण्याकडे मी ज्यास्त लक्ष दिलें." साधारण प्रतीच्या लोकांमध्यें कोणच्या ठिकाणी आपण दरिद्रावस्था पाहिली ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना लार्ड साहेब म्हणाले "हिंदुस्थानांतील प्रजा फार गरीब व दरिद्रावस्थेंत आहे अशी जी ओरड आहे ती कितपत खरी आहे हें मला सांगतां येत नाहीं. तथापि दक्षिण महाराष्ट्रांत बरीच वर्षें पाऊस न पडून पीक न आल्या मुळें शेतकरी लोकांची जी स्थिती झाली आहे ती मात्र खरोखर विचार करण्या सारखी आहे. ह्या लोकांस त्या स्थितींतून काढण्यास सरकार खटपट व मदत करीत आहे. मला असें वाटतें कीं गव्हरनर सर जेम्स फरग्युसन साहेब यांचे कारकीर्दींत मुंबई सरकारनें दक्षिणेंत आगगाडीचे मार्ग वाढविण्या बद्दल जी खटपट व मेहनत केली, त्यावरून ह्या प्रदेशांत पुढें दुष्काळा सारखीं संकटें येणार नाहींत. कदाचित धान्याची वगैरे महर्गता होईल परंतु भयंकर दुष्काळ पडणार नाहीं. टेराईहून मी लखनौ येथें आलों. जनरल डिल्म साहेबांच्या कृपेनें नेटिव फौजा पाहण्यास सांपडल्या व हल्लीं सौडनमध्यें असलेली प्रख्यात व शूर १५वी शीख लोकांची पल्टण ती ही या ठिकाणीं पाहण्यास सांपडली.

लखनौहून कलकत्यास गेलों तेथें सुमारें एक आठवडाभर राहून मुख्य मुख्य अधिकाऱ्यांच्या व पुढारी संभावित नेटीव गृहस्थांच्या ओळखी करून घेतल्या बहुतेक नेटिव गृहस्थांचें राज्यप्रकार्णाच्या गोष्टीं कडे ज्यास्त लक्ष असल्याचें दिसून आलें. ह्या ठिकाणीं व दुसऱ्या मोठमोठ्या शहरीं मला असें आढळून आलें कीं जे विद्वान नेटिव गृहस्थ आहेत ते माहितीच्या, वाचनाच्या व देशाभिमानाच्या कामांत पाहिजे त्या युरोपियन गृहस्थाची बरोबरी करतील. कलकत्याहून मी अल्हाबादेस गेलों.तेथें सर आलफ्रेड लायल ले. गव्हरनर यांनीं माझा पाहुणचार केला व जनरल सर फ्रेडरीक राबटर्स मद्रासचे कम्यांडर इन चीफ यांची गांठ पडली. येथून नेटिव संस्थान रेवा येथें गेलों.येथील राजपुत्र अज्ञान असल्यामुळें ह्या संस्थानचा कारभार इंग्रज सरकारकडून होत आहे. रेवाहून पुण्यस्थान बनारस ( काशी ) येथें जाऊन महाराजाचे घरीं राहिलों. बनारसेहून दिल्ली, आग्रा व जैपूर हीं शहरें पाहून बडोद्यास आलों. ज्या कोणांस मासल्या करितां नेटिव राज्यकरणाराच पाहणें असेल त्यांनीं बडोद्यांतील गायकवाड सरकारचा मसला पाहावा. अगदीं तरुण म्हणजे सुमारें २२।२३ वर्षांचे वयाचे असून सर्व राज्यकारभार स्वतः पाहतात. हे फार शहाणे, बुद्धिवान व गंभीर आहेत; व नेहमीं आपल्या प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष देतात. यांनीं स्वतः निवडलेल्या उत्तम गृहस्थांचें एक कौन्सिल असून, त्याची राज्यप्रकरणांत यांना नेहमी मदत असते. ह्या ठिकाणीं राज्यकर्ता जरी हिंदु आहे तथापि मुख्य दिवाण मुसलमान जातीचा आहे. हे दोघेही इंग्रजी चांगलें पूर्णपणें जाणत असून, इंग्रजीचें ज्ञान बहुतेक पुढारी नेटिव गृहस्थांत उत्तम रितीनें वसत आहे. बडोद्याहून हैद्राबादेस गेलों. शिकार करण्या करितां निजामसरकारचे स्वारींत एक आठवडाभर फिरलों. ह्या ठिकाणीं जरी आम्हाला चांगली शिकार साधली नाहीं तरी जंगलांत बाहेर राहणें फार चैनीचें व सुखकारक वाटलें. हैद्राबादेतील सर्व देखावे व पाहण्या सारख्या जागा पाहून दिवाण साहेबांची ओळख करून घेतली. दुसऱ्या नेटीव संस्थानांपेक्षां हैद्राबाद हें संस्थान उत्तम रितीच्या राज्यव्यवस्थेच्या कामांत पुष्कळ पुढें सरसावलेलें दिसलें. या ठिकाणचे हल्लींचे मुख्य प्रधान नबाब सर सालरजंग यांनीं आपल्यास राज्य प्रकरणांत मदत करण्यास म्हणून बहुतेक उत्तम हुशार मुसलमान लोक उत्तर प्रदेशांतून आणविले आहेत. नबाब साहेब हे आपल्या पित्यानें सुरूं केलेल्या सुधारणुकेचीं कामें करण्यांतच नेहमी गुंतले असतात. ह्या कामांत खुद्द निजाम सरकारची ही त्यांना चांगली मदत आहे. ह्यांना जर ब्रिटिश अधिकाऱ्यांची उत्तम मदत मिळाली तर या संस्थानचा राज्यकारभार हिंदुस्थानांतलि इतर संस्थानांपेक्षां अतिउत्तम चालेल यांत संशय नाहीं. सर्व संस्थानांत फक्त हैद्राबाद संस्थानच व्यवस्थेच्या व रचनेच्या कामांत जुन्या चालीचें आहे. उत्तर हिंदुस्थानांतील इतर बहुतेक मोठमोठीं शहरें युरोपियनांचा किल्ला घेत आहेत. अखेरीस आम्ही हैद्राबादेहून मुंबईस आलों व तेथून तारीख ९०मार्च रोजीं स्वदेशीं परत येण्यास निघालों."

हिंदुस्थानांतील कडक उष्णतेचे संबंधानें जरी मला थोडा त्रास झाला होता तरी माझी प्रकृति उत्तम होती.प्रारंभापासून तों अखेरपावेतों माझा प्रवास नीट रितीनें शेवटास गेला. इंग्लंडांतील सर्व राज्यप्रकरणीं गोष्टींची पूर्ण हकीकत मला खानगी पत्रांनीं व वर्तमान पत्रावरून कळत होती असें लार्ड साहेबांनीं बोलून दाखविलें.

सदर्हू लार्ड साहेब पार्लमेंटचें मेंबर आहेत. असेच जर आणखी हिंदुस्थानची आस्था बाळगणारे सद्गृहस्थ इकडे येऊन ह्या देशाची खरी माहिती करून घेतील तर त्यापासून आम्हा हिंदुस्थान वासी लोकांचा बऱ्याच अंशीं फायदा होण्याचा संभव आहे. लार्ड साहेबानीं आपल्या प्रवासाची हकीकत व त्यांत मिळविलेली माहिती इत्थंभूत पुस्तक रुपानें जर प्रसिद्ध केली तर ती ज्यास्त मनोरंजक व फायदेशीर होणार आहे. करितां लार्ड साहेब, वर्तमानपत्रकर्त्यांच्या सभेचे रिपोर्टर, अगर त्या कोणास ह्या बद्दल पुर्ण माहिती मिळाली आहे असे सद्गृहस्थ आमचे विनंतीकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.

---

काकेसस फौजेच्या साह्यानें कास्पियन समुद्रांत पक्की बळकटी करून राशियन लोक दिवसें दिवस आपलें पाऊल अफगाणिस्थानच्या सरहद्दींत ढकलीत आहेत या मुळें काकेसस फौज किती आहे, कवायतींत कशी काय वाकबगार आहे इत्यादि गोष्टीं कडे पुष्कळांचें लक्ष लागिलें आहे. या फौजेच्या संबंधानें नाना तऱ्हेच्या अफवा ऐकूं येतात पण नुकतेंच लाविलेल्या शोधावरून पाहतां राशियन सरकारास हिरात सर करते वेळीं त्या पैकीं अर्धें सैन्य म्हणजे सुमारें एक लक्ष लोक हिरातेकडे लढाईस आणण्याच्या उपयोगीं पडण्यासारखे आहेत. काकेससच्या दोन लक्ष सैन्यापैकीं कांहीं लोक राशियन आहेत, व बाकी बहुतेक भरती कोसाक, सिरकासियन, जार्जियन वगैरे लोकांचीच आहे. या लोकांस परेड, स्क्वामफाईट, वगैरेची फारशी माहिती नाहीं व त्यांची एकत्र गांठ फार थोडे वेळा पडते. हे लोक स्वभावतः घट्टेकट्टे असून लढाऊ आहेत पण त्यांना कवाईत अगदींच येत नसल्यामुळें तळ देऊन लढाई करण्याच्या कामात त्यांचा तादृश उपयोग ही नाहीं. बेशिस्तीच्या मावळ्या प्रमाणें छापे घालणें, गांव लुटून फस्त करणें इत्यादि गोष्टींत अगदीं वाकबगार आहेत. या सैन्यांतलि तोफखाना मात्र फार उत्तम आहे, त्या कडील आफिसर लोक शिकलेले असून हुशार आहेत व ते राशियाला ही मागें टाकतील असें

किस्येक म्हणतात. एकंदरीनें हें अशिक्षित लष्कर हिंदुस्थानच्या सारख्या सुशिक्षित लष्करा पुढें कितपत टिकेल हें जरी आतां सांगणें कठिण आहे तरी हिंदुस्थानच्या लष्करापुढें टिकाव फार वेळ यांच्यानें धरवणार नाहीं असें किस्येक म्हणतात. चौकस रितीनें तुलना करून या सैन्या विषयी खातरीनें सांगण्यास प्रस्तुत आपल्या जवळ मुद्देशीर माहिती नाहीं. कारण आजपर्यंत यांची लढण्याची शैली व कौशल्य दृष्टोत्पत्तीस येण्या सारखा एक ही लढायीचा प्रसंग येऊन घेतला नाहीं.


# The Berar Samachar

MONDAY, May, 11, 1885


## MR. MANDLIK ON MR. MALABARI.

In a recent article in the Hindu Patriot we get the views of Honorable Rao Sahib Vishwanath Narayan Mandlik on Marriage reform. He was requested by the Government of Bombay to give his opinion on the two notes of Mr. Malabari on Infant marriage & enforced widowhood. The Hindu Partiot makes extracts from the letter in reply a copy of which it has obtained. Mr. Mandlik is a man of great experience and learning and is one of those few men who can think for themselves. We regret we had not the pleasure to read his paper in *extenso*. It would have been better if we could have read all his remarks before proceeding to say what we think of them. But there is a distinct indication of the manner in which he appears to have dealt with Mr. Malabari all through in the few extracts presented by the Hindu Patriot. Mr. Mandlik condemns the Parsee editor for sitting in judgment upon the laws and customs of the Hindus. Apparently Mr. Mandlik is quite right. Mr. Malabari is a Parsi and *prima facie* the burden of proof lies upon him to show that he is entitled to express an opinion on the customs of Hindus which he represents blacker than they are. But Mr. Mandlik goes too far when he says "that the writer in the present case (so far as his papers show) appears to have no qualification whatsoever to sit in judgment upon the entire Hindu community of India of whose customs and practices he seems to know nothing and could but know very little." Mr. Mandlik certainly knows that Mr. Malabari is an editor of vast experience, that he has attempted to acquire much knowledge about Hindus, that his position as an editor of a paper which he has conducted with great ability, made it incumbent upon him to study the laws and customs of the Hindu who are the people of this country, & that he is well read and has acquired habits of thinking. The fact that he has been leading an independent life and has been wishing and compelled to mingle in society for the sake of the profession he has followed if for nothing else, favours him. He does not come like a man confined for the best part of his life in a den to say good or bad of customs without even knowing what they are. We are not prepared to assert that he has dealt with the Hindus with justice. We have ourselves pointed out that he has exaggerated matters and has now and then drawn on his imagination. His acquaintance with the subject is not also as deep as it was desirable. But for all that to say that he has no qualification to say one word about Hindu customs which are regarded by the educated Hindus themselves to be anachronisms and vicious to a high degree is only to get angry with the Parsi both for what he has said justly and for what he has not so said. Mr. Mandlik was entitled to say in respect to those points wherein Mr. Malabari went wrong that his conclusions cannot stand, but to carry the argument further is to cast a slur on his good intentioned endeavours. We know he has said things which are offensive to the Hindus. We can take him to task so far. That should not, however, warp the judgment.

## THE RUSSIANS DESIRING PEACE

Matters that reach us through the telegrams are so very uncertain now-a-days as to show that nothing very definite is known of the actual designs of Russia. The other day it was said that the Russian papers advise war; that preparations were being made in Russia and in England and that the Czar is unwilling to make further inquiries into the action of General Komaroff at Pen-Deh. The news was such as might have been expected; but we further learn that there are yet signs of a peaceful settlement between the Russian and British Governments and that the Czar is willing to submit the question to arbitration as he is desirous of peace—the king of Denmark being suggested as the possible arbitrator. When Russia's intentions with regard to Herat and Afghanistan have been now placed beyond doubt, when the Russians are inclined to occupy a territory which the Afghans are least inclined to yield, it will be curious to know in what shape the question is put to the arbitrators and how they are able to deal with it satisfactorily to both parties concerned. Possibly all this desire for peace and readiness to submit to arbitration on the part of Russia, is in as good earnest as all her professions till now. We for one think that this is again a blind and a dodge to get further time for preparations of war and this supposition will, we believe, be amply justified by all Russia's actions up to date if not by its realization at no distant period. Hence we conclude that to all outward appearances England is not desirous of peace on principle but that she is avoiding the war with Russia being afraid of Russia's superior might or at least being doubtful of the issue of the strife, if once begun.

A few days back there was that ridiculous business about the suppression of the little French paper Bosphore Egyptien. It has been said that the paper always contained the most scurrilous libels on the British officials in Egypt and was such as to mislead the subjects of the Egyptian government. If such was the fact there is not the least doubt that ordinary international law would authorize the Egyptian government to suppress any paper within its jurisdiction; and unless there was some special agreement between the two Governments with regard to the matter, France would not at all be justified in demanding any sort of reparation for suppressing a paper —far less for such a mischievous paper as the Bosphore Egyptien. One would be led to believe that the action of France in the matter could be traced to a source quite apart from the anger caused by the suppression of the French paper in Egypt. Considering in what plight England was, bowher hands were full with the Egyptian difficulty and the Russian difficulty, one might easily construe the resentment expressed by the French government as a foreshadowing of the complexities of the European war consequent on the initiative war between England and Russia. The French government would have made this paper affair a very poor excuse indeed to take any part in the quarrel between England and Russia and would have more than justified Germany in the eyes of the civilized world to enter into the quarrel for the sake of preserving the grand principle of the balance of power. That was not however the true interpretation of the action of the French government and the correct explanation was probably that suggested by the Times of India, viz, that France did it in a fit of resentment at the suppression of the paper; on second thoughts French demands would not be so unreasonable. Fortunately no serious complication has happened with regard to the affair.

## पुस्तकांची वगैरे पोंच

'जंबुक' नांवाचें एक छोटेखानी वर्तमानपत्र तारीख ३मे पासून पुणेंयेथें निघूं लागलें आहे त्याचा पाहिला अंक आम्हाकडे आला आहे त्याचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों व आमचे नवीन बंधु दीर्घायु होवोत असें सोत्कंठ इच्छितों.

वऱ्हाडांतील रेलवे ट्राफिकचा तक्ता दिसेंबर १८८४ अखेर पर्यंतचा आम्हाकडे डेपुटीकमिशनर साहेब यांजकडून आला आहे.

'एक दुखित झालेला रिसोडकर,–रिसोड– लिहितात कीं तेथील कै. सुभानजी खंडोजी देशमुख यांचा १७ वर्षाचा होतकरूं मुलगा मरण पावल्या मुळें त्याच्या वृद्ध आईवर व बायकोवर दुखाचा डोंगर कोसळला. हरीच्छ!

## वऱ्हाड.

येथील रजेवर असलेले आमचे लोकप्रिय डेपुटी कमिशनर कर्नल जेम्स फिट् झरल्ड साहेब यांची बदली यवतमाळास कायमची झाली हें ऐकून पुष्काळांस वाईट वाटेल. साहेब बहादूरांनीं या जिल्ह्यांत सतत पांच वर्षेपर्यंत उत्तम रितीनें काम करून येथें व इतर ठिकाणीं पुष्कळ सुधारणा केल्या. रजेवरून परत आल्यानंतर त्यांनीं परभारें जाऊन यवतमाळ येथील आपले कामाचा चार्ज घ्यावा असा हुकूम गेल्याचें समजतें.

कर्नल फिट् झरल्ड साहेब यांच्या जागीं यवतमाळचें कायमचे डेपुटी कमिशनर कर्नल स्पान्सकी यांची नेमणूक केली आहे; परंतु ते रजेवर आहेत तोंपावेतों कर्नल लाटन हे काम पाहतील आणि त्यांच्या रजेंत तूर्त उमरावतीचे असि. कमिशनर मि. निकोलेट यांस अक्टींग डेपुटी कमिशनर नेमिल्यान्वयें ते आज रोजीं आपले कामाचा चार्ज घेतील.

मि. हेअर साहेब हे मि. निकोलेट यांस चार्ज देऊन आपल्या पूर्वींच्या जागीं खामगांवांस परत जातील.

कर्नल बुलक साहेब यांची नेमणूक इलेचपूरचे डेपुटी कमिशनरचे जागीं झाली.

येथील प्रख्यात सायबान व फरशी बद्दलचे खटल्याचा निकाल आलिशान रेसिडेंट साहेब यांनीं एकवेळ लोकांच्या तर्फेचा केलाअसून त्याच प्रकारचा पुन्हा एक खटला पोलिसांनीं तयार करून माजिस्ट्रेट पुढें आणिला होता. परंतु आमचे न्यायी मि. डेव्हिस साहेब यांनीं तो खटला रद्द केला.

हिंदुस्थान सरकारनें असा नवीन ठराव केला आहे कीं ज्या दिवाणी कोर्टांत एखाद्या मोकदम्यांत कोणीही सरकारी नोकर रजा घेऊन आला असल्यास त्या कोर्टानें सदर्हू मोकदम्याचा निकाल होईल तितका करून लवकर करावा. व हा ठराव वऱ्हाडांत रेसिडेंट साहेबांनीं सन १८८५ सालच्या सरक्युलर नंबर ३ प्रमाणें अंमलांत आणिला आहे.

## नोटीस.

पंजाब नादार मुकदमा नंबर ४. ८५.

नमुना (जी)

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं वलीमहमद वल्लद अबदुल रहिमान मुसलमान राहणार आकोलें हा नादार आहे असा आज तारखेस ठराव जाहला आहे आणि तारीख २२माहे जून सन १८८५ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे ष्टाप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिसींत ज्या आधाराबद्दल तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्या बद्दल ज्या साक्षी समन्सें करावयाचीं इच्छा असेल त्या साक्षिदारांचीं नांवें दाखल करावीं. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस पूर्वीं तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे ष्टापकागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरें असले बदलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

२ने सावकार दूरचे राहणार असतील त्यावर आठ ८ आण्याच्या ष्टापावर दाव्याची हकीकत लिहून एखादा जुडिशियल आफीसरापुढें तिच्या खेरपणा विषयीं शपत लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजीष्टर दाखल होतील. ता.२।५।८५ इ०

(signed) Purshotamrao

ज्यडूज.

## वर्तमानसार.

सौंदन येथील इंग्लिश सैन्य परत आल्यामुळें उस्मान डिग्मा हल्ला करील अशी तेथील लोकांस भिती पडली आहे.

वर्तमान पत्रांच्या बातम्या वगैरे हक्का संबंधी गव्हरनर जनरल साहेबांच्या येथ्या कायदे कौन्सिलांत एक बील सुनावणीस येणार आहे. हा कायदा करण्याची ओरड इंग्रजी पत्रकारांनींत्यांतून मुख्यत्वें मुंबईचे टाईम्स पत्रानें विशेष केली आहे त्यावरून हा वरील कायदा करण्याचा विचार झाला आहे. टाईम्स कर्ते यांस विलायतेहून वगैरे ज्या तारा येतात त्या कलकत्ता वगैरे ठिकाणीं टाईम्सपत्र वर्गणीदारांस पोहोंचण्या पूर्वींच तेथील पत्रांत त्या प्रसिद्ध होतात तेणेंकरून त्यास जो खर्च करावा लागतो तो सर्व व्यर्थ जाऊन त्याचा लाभ इतर पत्रकार घेतात.ही ओरड टाईम्साची निरर्थक आहे असें आम्ही ह्मणत नाहीं. जो मेहनत व खर्च करतो त्यांचें फळ त्यासच मिळावें हें रास्त आहे. परंतु कायदा करणें तो सार्वजनिक हिता अनहिताकडे पाहून केल्यास विशेष लाभदायक होईल.

एक चमत्कारीक पुस्तक—एका युरोपांतील डिलायल राजा जवळ एक विचित्र धर्म पुस्तक आहे. तें छापलेलें किंवा लिहिलेलेंही नाहीं. सर्व अक्षरें वळणसूद कातरलेलीं असून तीं रंगीबेरंगी कागदावर चिटकाविलेलीं आहेत. हें पुस्तक लिहिलेल्या किंवा छापलेल्या पुस्तकाप्रमाणें सहज वाचतां येतें.

सर्वांत उंच शहर — पृथ्वीमध्यें समुद्राचे सपाटीपासून सर्वांत उंच शहर दाक्षिण अमेरिका खंडांतील पोटासी आहे. हें हिमालय पर्वतावर असणारे खड्याचे ऊंचीचे आहे. ह्या शहराची उंची समुद्राच्या सपाटीपासून १३, १००फूट आहे. दी.नं.

तंव्याभिल—मध्य प्रांतांतील तंव्या भिलानें ही पुन्हा उचल खाल्या सारखें केलें आहे. तो बेधडक गांतांत शिरून गांव लुटतो, जाळतो किंवा पाहिजे तें करतो. त्याणें कित्येक अधिकाऱ्यांस धमकीची पत्रेंहि पाठविलीं आहेत. पोलिसच्या शिपायांस तर हां हां ह्मणता फसवितो. परवां त्यानें एका शिपायास गोळीनें टिचून ठार केलें. कित्येकांचीं नाकें कापतो. आमचा एक मित्र आह्मांस कळवितो कीं, मागें एका पाटलानें यास रुखसत दिली ह्मणून सरकारांतून त्यास दंड झाला होता, सबब त्या भीतीनें तंव्यास यापेस रुखसत देण्याचें नाकारल्यावरून तंव्यानें तो गांव जाळून पार केला! हा पाटला भोंवतीं दुहेरी सासुरवास नव्हे काय? तंव्या तर चोरच आहे? पण आमचे सरकार तर चोर नाहीं ना; मग त्यांनीं आम्हांस निःशस्त्र करून ठेवावें व आमचे रक्षणही करूं नये ही नीती कोठली?

राजीपुत्र ड्यूक ऑफ कनॉट यांचे परत जाण्याचे या आठवड्यांत जे हाल झाले आहेत ते तर विचारूच नका. रोज दोन तारा निघालेल्या प्रसिद्ध होत असत. एकांत ड्यूक साहेबांस तीकडे येण्यासव दुसऱ्यांत इकडे रहाण्याबद्दल! यावरून आपल्यास एवढेंच कळतें कीं, आपल्या महाराणीसाहेब पुत्र मोहामुळें विव्हळ होऊन त्यांनीं लढाईस जाऊं नये ह्मणून खटपट करीत असून राजकारस्थानी लोकांच्या मनांत स्वतः राजीपुत्रानें सरहद्दीवरील लढाईंत असावें. खरेंच पाहिलें तर ड्यूक साहेबांनीं लढाईवर जावें हें फार उत्तम आहे. कारण त्यापासून हिंदुस्थानच्या लोकांस व गोऱ्या लोकांसही लढाईंत खासे स्वारी असल्यामुळें एक प्रकारचे साहजिक उत्तेजन येणार आहे. असो तें काय होईल याबद्दल आतांच कांहीं अनुमान काढतां येणार नाहीं, पण तुर्त त्यांची धांदल झालेली आहे एवढें मात्र खरें. परवां तर एक दिवस मुंबईस तयारीही होऊन राहिली होती, पण पुनःड्युकसाहेबांस मीरत येथील फौजेचा चार्ज घेण्याचा हुकूम आल्या वरून ही प्रयाणतयारी जागच्याजागींच थिजून गेली. अद्यापही त्यांच्या जाण्या रहाण्याचा निश्चय ठरलेला नाहीं.

उद्धटपणा—वेंगुर्लें माणिकचौकांतील दुकानापुढील जागेवर मुनिसिपालिटीकडून खुणाचे दगड लावण्याकरितां मेहरबान व्हाईस प्रेसिडेंट साहेब बहादुर हे आपण स्वतः जागा पाहण्याकरितां आले असून जागा पाहून दुकानाच्या चौथऱ्यापर्यंत दगड लावण्याचा हुकूम दिल्यावरून व्यापारी लोकांनीं आमचे पावळींचें आंत आमची हक्काची जमीन आहे तरी साहेबांनीं पावळीचे बाहेर खुणा करण्याचा हुकूम द्यावा. खुणांच्या ठिकाणीं मोठे दगड वगैरे लाविले असतां रहदारीची जागा असले कारणानें जाणार येणार मनुष्यास अडथळा होईल अशा बद्दल अती लीनतेनें साहेबांची समजूत केली असतां तिकडे लक्ष न देतां साहेबांनीं लोकांस शद्बांचा बराच वर्षाव केला. लोक आपली योग्य प्रकारें हकीगत कळवीत असतां तिकडे दुर्लक्ष करून त्यांत कांहीं शद्ब बोलून त्यांची मनें दुखाविणें तीही कोणा हलक्या सालक्या पैकीं नसोन चांगले प्रतिष्टित व्यापारी अशा लोकांचीं ह्मणजे आज कालच्या स्थितीस फारच वाईट होय. त्यांकडे तरी काय दोष! हा आमचे सरकारचाच आहे, कारण जर करितां कलेक्टरसारख्या जोखिमाच्या जागांवर सरकार या १९।२० वर्षांच्या तरुण बाडांस नेमीत आहे, तर त्यांस तरी अनुभव कितीसा असणार, आणि त्यांचे तरी अशा रीतीचेंच उद्धट वर्तन कां असूं नये? आपण तरी अशा गोरे कार्यांची कानउघाडणी कराल काय? पु०वे०

विलक्षणपति प्रेम— येथील रा०रा० माधव रावजी हुजूर सबैर यांचे वडील चिरंजिव खानदेशांत फारेस्ट खात्यांत नौकर होते, त्यांची प्रकृति नवज्वरानें अत्यावस्थ झाली ह्मणून त्यांस येथें आणिलें. अखेर त्यांस त्रिदोष झाला हें पाहून त्यांचे थोरले कुटुंबानें पति वियोग आणि वैधव्य ह्या भावी यातना आपणास भोगाव्या लागणार हें पाहून पतीचे प्रणोत्क्रमण होण्याचे पूर्वी ४ तास येथील नवे कारंज्यांत उडी घालून जीव दिला. सुविद्य, धन मिळविणारा मुलगा गेल्यामुळें वृद्धापकाळीं दादासाहेबांस दुःसहपुत्र दुःख झालें.! ईश टेवील तसें राहणें भाग आहे. सरकारांनीं सती जाणें कायद्यानें बंद केलें; परंतु, ज्या साध्वीचा दृढनिश्चयच आहे ती सौभाग्य सभाळून पतिसह गमन करितेच ह्यांचेंच नांव पातिप्रेम.

इंग्रज लोकांचे सैन्य किती आहे हें सांगते वेळीं लार्ड हार्टिंग्टन यांणीं असें कळविलें कीं, १,८०,००० लोक समरांगणांस आहेत, व याशिवाय राखून ठेविलेले शिपायी ७०,००० व २,८०,००० व्हालंटियर आहेत.

हिरातचें संरक्षणा करितां अमिरानें कंदहाराहून पुष्कळ सैन्य पाठविल्याचें कळतें. न्या०सिं०

गोरे लोक पाहिजे तें करूं शकतील, प्राण मात्र एक पैदा करण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य नाहीं, असें लोक ह्मणत असतात. परंतु तो देखील तें करूं लागलेले पाहून त्यांच्या सामर्थ्याचें फार आश्चर्य वाटतें. पंचवीस तारखेच्या बांबे ग्याझीट मध्यें डेनव्हर डेली न्यूज पत्राचा एक उतारा दिला आहे. तेथील एका लोकप्रसिद्ध डाक्टरानें एक कुत्रा धरून आणून त्याचे मानेला सुरी घातली, आणि त्याचे अंगातील सारें रक्त काढून घेतलें. तेव्हां अर्थात तें जनावर गत प्राण होऊन पडलें. पुढें मग एका प्रहरांनीं दुसरा कुत्रा धरून त्याचें रक्त या मेलेल्या कुत्र्याच्या अंगांत घातलें, तेव्हां तो कुत्रा पूर्ववत जीवंत होऊन हल्लीं तो रस्त्यातून भटकत आहे. पंधरा दिवस सुमार या गोष्टीला लोटल्यावर एक कालवड आणून त्याची ही अशीच दशा केली. तें कालवड बारा तासांनीं सजीव झालें. त्या नंतर एक कुत्रा पाण्यांत बुडवून ठार मारल्यावर त्यालाही कांहीं कृतीनें जीवंत केलें!! धन्य आहे डाक्टर साहेबांची!

नाजूक जोडपे- अमेरिकेंत एका नाजूक बाईचें नुस्तें लग्न लागलें. या बाईचें वजन फारसें नाहीं, नुस्तें पांचशें पौंड आहे! नवराही सामान्यच आहे. नवऱ्याची उंची सारी साडे आठ फूट आहे! हे जोडपे लग्नाचे वेळीं असें कांहीं शोभत होतें कीं,हा महोत्सव पाहण्या करितां लाखलोंचे लोक मुद्दाम आले होते.

फलादगी- बादामीचे चीफकान्स्टेबल- रा. रा. नारायण भास्कर यांणीं आरोपीला मारहाण केली ह्मणून त्यांवर खटला झाला होता. त्या खटल्यांत त्यांस दीडवर्षांची सक्त मजूरीची कैद आणि दोनशें रुपये दंड या प्रमाणें शिक्षा झाली हें कळविण्यास आम्हास फार वाईट वाटतें. इकडे इतर चीफ कान्स्टेबल लोकांनीं चांगलें लक्ष पुरवावें.-बेळीकाच्या एका बायकोनें गांवांत चोऱ्या फार होऊं लागल्या ह्मणून घरांतील चीजवस्त सर्व लपवून ठेवून हातांत पितळेच्या पाटल्या अडकविल्या होत्या. हें चोरांना काय माहीत? त्यांनीं त्यावरच नजर ठेवून शेवटीं आपल्या हातावर तुरी दिल्याबद्दल हळहळत गेले.

सातारा—कलेक्टर आफिसांतील रेजिस्ट्रेशन क्लार्क मि. गोविंदराव महाजणी यांणी ७ रुपये खाल्याचे उघडकीस आल्यावरून त्यांस कामावरून दूर केल्याचें कळतें. धा०वृ०

आसाम प्रांतांत दुष्काळाचें स्वरूप फार भयंकर दिसूं लागलें आहे. ३१३,४१४ दिवस अन्न नसल्यामुळें लोक मरत आहेत. इकडे सरकारानें लौकर लक्ष न पोंचविलें तर मोठा अनर्थ होईल अशी कलकत्याच्या स्टेट्समन पत्रांत तार प्रसिद्ध झाली आहे.

सिंधच्या मुसल्मानी कालेजास हैद्राबादच्या निजाम सरकारांनीं ४००० रुपये दिले. व पुढें उत्तरोत्तर त्या कालेजांतून मुसलमान मुलें विद्याशिक्षण मिळवून आपली हुशारी दाखवूं लागलीं ह्मणजे जास्त मदत करण्याची आह्मास उमेद येईल असें तरुण दिवाण सर सालरजंग यांनीं बोलून दाखविलें.

बहुमोल पाचरत्न—कोलंबिया संस्थानापैकीं बोयाका प्रांती असलेल्या "मुझो पाचखाणी" नांवाच्या रत्नखाणींतून नुकताच एक पाच निघाला आहे. त्यांचें वजन अच्छेर आहे. इतकें मोठें पाचरत्न ह्या पूर्वीं पृथ्वीवर कोठें सांपडल्याचें माहित नाहीं. या पूर्वीं ड्यूक ऑफ डेव्हनशायर यांचे रत्नसंग्रहांत एक पाचरत्न ८-९ औंस(पावशेर) वजनाचें फार मोठें वजनदार ह्मणून होतें. परंतु त्याच्या दुप्पट वरील सांपडलेलें पाचरत्न मोठें आहे! ड्यूक आफ डेव्हनशायर यांचे संग्रहांतील पाचरत्न तरी वरील खाणीच्या शेजारच्या खाणींतच सांपडलें होतें. यावरून त्या प्रदेशांत याच रत्नांच्या खाणी चांगल्या आहेत असें दिसतें. ज्ञा०च०

इंग्रजांच्या सल्यानें वागणाऱ्या जुबार पाच्छानें फ्रेंच कौन्सिल जनरलची क्षमा मागितली व बंद केलेलें फ्रेंच वर्तमान पत्र पुनःसुरु करण्यास परवानगी दिली. क.त.

सोलर रे पेन्सील—पुणें हायस्कूलचे लोकप्रिय हेडमास्तर प्रो. माधवराव कुंटे यांनीं स्वतः आपल्या खर्चानें एक "प्राक्टिसिंग स्कूल ऑफ आर्ट" नांवाचा कारखाना काढिला आहे. त्या कारखान्यांत "सोलर रे" नांवाची लांकडी पेन्सील तयार झाली आहे. या पेन्सिलीचे नमुने प्रो. कुंटे यांनीं सर्व वर्तमानपत्रांस पाठविले असतां तिची प्रख्याती होऊन जास्ती खप होण्यास कांहीं अडचण पडावयाची नाहीं. किमतीच्या मानाविषयीं लोकांत पूसतपास होत आहे. परंतु वास्तविक पाहिलें असतां युरोपांत तयार झालेल्या पेन्सिलींपेक्षां जरी कमती किंमत या नवीन पेन्सिलीची नसली तरी निदान तिच्या किंमती इतकीच असल्यास लोकांत तिचा खप होण्यास फार सोयवार होईल असें आह्मांस वाटतें- प्रो. कुंटे यांनीं जो उद्योग चालविला आहे तो फारच स्तुत्य असून तो त्यांनीं अविश्रांतपणें चालविल्यास कालांतरानें त्यांची कीर्ति अधिक होईल यांत संशय नाहीं. असल्या उद्योगाच्या संबंधानें दोन तीन वर्षांपासून प्रो. कुंटे यांनीं व्याख्यानद्वारां आपले विचार लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न चालविला होता, तो त्यांचा प्रयत्न केवळ बोलण्यापुरताच असें पुष्कळांनीं अनुमान काढिलें होतें, परंतु तें आतां प्रो. कुंटे यांच्या बोलण्याप्रमाणें चालण्यानें खोटें झालें. देशसुधारणेविषयीं तोंडच्या बाता करण्यापेक्षां स्वतः एखादी करून दाखविण्याचा आधुनिक विद्वान लोकांचा मोठा प्रचार आहे. परंतु त्यांनीं प्रो. कुंटे यांचे उदाहरण घेऊन जसें बोलावें तसें चालावें. निदान तसें चालण्याचा किंवा तसें करण्याचा प्रयत्न तरी करीत असावें. या "सोलर रे" पेन्सिली आह्मी स्वतः पाहिल्यावांचून आह्मांस त्या चांगल्या किंवा वाईट याविषयीं आमचें मत देतां येत नाहीं. दोन तीन पेन्सिली मिळाल्यास त्या पाहून त्याविषयीं आह्मीही इतर पत्रांप्रमाणें आमचें मत प्रसिद्ध करूं. सु०प

☞ हें पत्र आकोला येथें कै.वा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव लडके यांनीं प्रसिद्ध केलें.

साहामाही ,, ३ ,, ,, ८८
सालअखेर ०-,, ७ ,, ,, १८८
कीरकोळ अंकास ....................८४

नोटिशींबद्दल.
१० ओळींचें आंत रु. १
पुढें दर ओळीस ८।८६
दुसरे खेपेस .... ८१

Perannum in arrears 7 ,, 1 R8as
Six monthly ... ... 3 ,, 8a
Single opy ........................ 4a

Advertisements
Below 10 lines......2Rs
per line over 10 ...4a
Repetition per line 8as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XIX AKOLA MONDAY MAY 18 1885 NO 19

पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख १८ माहे मे सन १८८५ इ० अंक १९

## पक्षकार लोकांसफार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी. ए., एल एल. बी., मुंबई हायकोडताचे वकील हेसध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हापीस "वऱ्हाडसमाचार" छापखान्या शेजारी काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

ता. ९ दिसेंबर १८८४ } पत्रकर्ते.

## डाक्तर गोविंदराव खोत यांनीं विशेष काळजीनें तयार केलेंलीं सरबतें.

१ गुलाबाचें सरबत. २ लिंबांचें सरबत. ३ डाळिंबांचें सरबत. ४ नारिंगांचें सरबत. ५ द्राक्षांचें सरबत.

हीं सर्व सरबतें फक्त फुलांच्या व फळांच्या अर्कांचीं केलेलीं असून उत्तम प्रकारचीं आहेत; आणि उष्ण देशांत थंडाई आणण्याचे जे गुण सरबतांत असावे ते वरील सरबतांत आहेत. बाजारांत मिळणाऱ्या या प्रकारच्या हलक्या जातीच्या सरबतांत वाईट रुचि व गंध असतो, त्या मुळें पुष्कळ लोकांस तीं घेणें आवडत नाहीं, म्हणून आमचीं सरबतें चांगलीं रुचकर व सुगंधीं करण्याची पुष्कळ काळजी व श्रम आम्ही घेतले आहेत असें खात्रीनें कळवितों. हीं सरबतें पाचक, रुचकर, थंडाई आणणारीं, व मधुर आहेत. यास्तव उन्हाळ्यांत हीं फार हितकर आहेत. आणि इतर सरबतांच्या अंगीं दाह उत्पन्न करण्याचा जो दोष आढळतो तो यांच्या अंगीं बिलकूल नसल्यामुळें हीं सर्वांनीं घेण्यास विशेष योग्य आहेत.

घेण्याची कृती २ पासून ३ मोठे चमचे कोणत्याही स० चे पेलाभर पाण्यांत घेणें.

ह्या सरबतांचा मोठा कारखाना उमरावतीस मालकानें घातला आहे. ज्यांस हीं सरबतें हवी असतील अशा व्यापाऱ्यांनीं तीं मागवून घेण्याबद्दल त्यांस विनंती आहे.

### किंमत.

गुलाबाचें सरबत ९ रु० एक ड० मोठ्या बाटल्यांस

लिंबांचे " " ९ " " " "

डाळिंब (अनार) ९ ॥ १२ " " " "

संत्र्याचे १० ॥ ८ " " " "

द्राक्षाचें १२ " " "

दर डझनच्या पेटीला व प्याकिंगला चार आणे शिवाय पडतील.

एकदम घेणारास शेंभर रुपयांस ८ रु० कमिशन दिलें जाईल.

सरबतें उमरावती व अकोलें येथें 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत मिळतील.

पत्ता डा० जी० व्ही० खोत उमरावती.

---

Dr. G. V. KHOT'S SPECIALITIES.

1. Syrup of Roses 2. Syrup of Lemons 3. Syrup of Pomegrates 4. Syrup of Oranges 5. Syrup of Grapes

All the above Syrups, being of the finest quality, and containing only the extracts of the juice of the respective flowers, and fruits may be confidently relied on as possessing all the cooling properties for which these syrups are so justly appreciated in tropical climate. The proprietor, aware of the many objections persons have to inferior specimens of these syrups sold in the market consequent on their bad smell and taste, begs to state that every pain and precaution is taken to make the above syrups as palatable and agreeable as syrups ought to be. These syrups form a light, agreeable, highly cooling, as well as delicious drinks in warm weather whilst the entire absence of any heating or stimulating properties so much complained of in other kinds of drinks renders them for general use very preferable.

Dose —2 to 3 table-spoonfuls of any kind of syrups in a cup full of water makes a delicious cooling draught.

The Proprietor also states that he has opened in this town a manufactory on a large scale for the preparation of these syrups and traders are requested to send in their orders.

Prices.

Syrup of Roses... Rs. 9 per Dozen Quarts.
" Lemons .........Rs. 9 "
" Pomegranates Rs. 9 12 "
" Oranges ...... Rs. 10-8 "
" Grapes......... Rs. 12 "

Commission Rs. 8 per cent for cash remitted with order.

Annas four for box and packing per dozen extra.

Amraoti, March 1st, 1885

Address

To

G. V. Khote, Amraoti

---

## जाहिरात सर्व गरिबा करितां?

फुकट! फुकट! पटकीवर उत्तम दवा. एक रोग्यास पुरें इतकी फुकट पाठविली जाईल. पोष्ट खर्चा करितां २ अर्ध्या आण्याचीं तिकिटें पाठवावीं. मेहेरबानी करून श्रीमंत लोकांनीं तसदी देऊंनये.

पत्ता "म्यानेजर कांदेवाडी मेडीकल हॉल मुंबई."

---

## खबरदारिध्या. फसूंनका.

श्रीमत परमहंस परिव्राजक. श्रीनरसिंव्ह सरस्वति. स्वामी महाराज. हेबरेच दिवसा पासोन. पुण्यानजिक श्रीक्षेत्र अळंदी. येथें राहिलेले आहेत. यात्रेकरूं लोकास फार त्रास सोसावा लागत असे. सबब त्यांचे इछेवरून सदरहु क्षेत्रांत एक टोलेजंग धर्मशाळा व मंदीर बाधलें असोन तें काम बहुतेक आटोपत आलें आहे. परंतु कोणी एक थोतांडी ब्राह्मण आपलें नांव बाळकृष्ण बोवा, असें सांगून सदरहु स्वामी महाराजांचें नांवचें पत्र यादी असें कांहीं दाखवून मंदिराचे कामाकरितां स्वामीनीं पाठविलें आहे असें सांगून लोका जवळून पैसे उपटीत खानदेशांत वगैरे फिरत आहे. करितां अशा संबंधानें लोकांनी द्रव्य देणें तें विचार केल्या वांचून देऊंनये व फसूंनये.

---

## स्त्री पुरुष तुलना

सहासी कोण? पुरुष किंवा स्त्रिया?

हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदे यांनीं रचिला आहे. पुस्तक पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलढाणें येथलि रा. रा. बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क, मी० डे० कमिशनर यांजकडेस, व आकोलें येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे. पुस्तक घेणारांस टपाल हाशील पडणार नाहीं. पैसे पाठविणारानें वर्तांळया सुद्धां पाठवावें.

---

## तयार आहे. हिंदुधर्मशास्त्र भाग १ व २

(दुसरी आवृत्ती)

जमादार रा. सा. वि. ना. मंडलीक सी. एस. आय्. यांचे.

किंमत ८ रुपये व हांशील आठ आणे पत्रें (किंमतीसुद्धां) ग्रंथकार यांस मुंबईस पाठवावीं.

सदरील पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीसाठीं ठेविलीं आहेत. व० स० कर्ते०

---

वऱ्हाडसमाचार.

---

मिती अधिक ज्येष्ट शुद्ध ४ शके १८०७

---

## प्रसंगा शिवाय खरी किंमत कळत नाहीं.

आज तागायत मोठमोठ्या हुद्यावरील साहेब लोकांनीं हिंदुस्थानांत व विलायतेंत हिंदुस्थानांतलि राजे लोक व त्यांचें सैन्य या संबंधानें बरीच आरडा ओरड केली. सदर्हु हकाऱ्या पासून तात्कालिक कांहीं अपाय झाला नाहीं परंतु भावी अपाय होण्याचा पुष्कळ संभव होता. असो. आज रोजीं पाहतां रशियन लोकांच्या गडबडी मुळें म्हणा किंवा आणखी कांहीं कारणामुळें म्हणा इंग्लिश लोकांचा राजेरजवाडे बद्दलचा अभिप्राय अनुकूल असा होत चालला आहे. स्पेक्टेटर वर्तमान पत्रांत आलेला मजकूर प्रसंगास अनुरूप असा आहे. राजे लोक इंग्लिश राज्य चाहतात व त्यांचीं सैन्यें आंग्ल्याच ताब्यांत राहून त्यांचीं सुधारणा व्हावी असें इंग्लिश लोकांचें मत. हळूं हळूं होत चाललें आहे.

जो पर्यंत इंग्लिश लोक आम्हा नेटिवांस व नेटिव राजांस आपलेसे समजून आमच्यावर पूर्ण विश्वास ठेवणार नाहींत तों पर्यंत अनेक कुतर्क निघणें व परस्परांत वैमनस्य उत्पन्न होणें ह्या गोष्टी अगदीं स्वाभाविक आहेत. आमचीं नेटिव राज्यें पुष्कळ अव्यवस्थित आहेत व त्यां मध्यें पुष्कळ सुधारणा होणें जरूर आहे तत्रापि इंग्रज सरकारांनीं ही गोष्ट पक्की लक्षांत ठेवावी कीं त्याच नेटिव राज्यांच्या जोरावर अकबर, पेशवे, वगैरेंनीं आपलीं नांवें गाजविलीं. हीं संस्थानें जर चांगलीं सुधारून उत्तम दशेस आणिलीं व हमेशा लढाईच्या कामांत त्यांना सामिल केलें तर आमची खात्री आहे कीं इंग्लिश सरकारास आफगाणिस्थानच्या अमिरासारख्या सरदाराची खुषामत करण्याची जरूर पडणार नाहीं.

---

हल्लींचे आमचे गव्हरनरजनरल साहेब किती लोकप्रिय आहेत व त्यांची हुशारी व दूरदर्शिपणा कितपत आहे हें आमच्या वांचकांस कळून आलें असेलच. रशियन लोकांशीं बेबनाव होण्याच्या अशा तूर्तच्या विकट प्रसंगीं डफरीन साहेबासारखे राजकारस्थानी गृहस्थ हिंदुस्थानचे गव्हरनरजनरल आहेत ही एक मोठी अभिनंदनी गोष्ट आहे.

तारीख ८ मेच्या तारेवरून असें कळतें कीं डफरिन साहेबांचा इरादा आपलें कामाचा राजीनामा देण्याचा आहे. या चप्रमाणें सर पिटर लम्सडेन हो विलायतेस अशा वेळीं परत जात आहेत या दोन्हीं गोष्टींचें इंगित काय असावें हें निश्चयेंकरून समजत नाहीं. उभयतां राज ‸ गृहस्थांस मि. ग्लाडस्टन साहेबांची ची व्यवस्था आवडत नाहीं

विलायतेस परत जाण्याचें बहुतेक मुख्य कारण असावें.

## इंग्लिश अंमल व खरें स्वातंत्र्य.

रशियन लोक हिरातकडे जाण्याची खटपट करित आहेत, व इंग्लिशांत महार्दीशी तुमुल संग्राम चाललाच आहे अशा प्रसंगीं देखील वर्तमान पत्रकारांनीं जें जें वाटेल तें तें स्पष्टपणें लिहावें, लोक सभेंतून व्यक्तिमात्रास आपापले विचार इंग्रज सरकारास अनुकूल किंवा प्रतिकूल असतील तसे कळविण्याची मोकळीक असावी वगैरे गोष्टींची रशियन राज्यव्यवस्थेशीं तुलना केली असतां आमच्या वाचकांस इसाप नीतींतील 'बेडूक व क्रौंच पक्षी' या गोष्टीचें स्मरण झाल्या यांचून राहणार नाहीं. रशियन प्रजेस आमच्या इतकें काय पण आमच्या शतांश ही स्वातंत्र्य नाहीं. रशियांतील वर्तमानपत्रांनीं राजास रुचेल तेंच लिहिलें पाहिजे, लोकमताप्रमाणें राज्यकारभार चालावा ही गोष्ट तर तेथें स्वप्नीं देखील नाहीं. स्वदेशाभिमाना पासून इतर देशांतून अनेक चांगल्या गोष्टी होतात पण रशियांत तें कांहीं न होऊन 'नाहिलिझम' सारखी व्रात्यपणाचीं कृत्यें हमेशा घडतात. स्वातंत्र्याच्या अभावामुळें तेथील लोक विलक्षण देवभोळे व धर्मभोळे आहेत. सर्व राष्ट्रभर शिपायगिरी काय ती मुख्य, राज्यकारभार चालविणारी मंडळी कारस्थानी असतील व हुषार ही असतील परंतु सर्व हुषारीच्या परिणाम अवरंगजेबाच्या हुषारी सारखा दिसतो. इंग्लिश लोकांची पुष्कळ गोष्टींत त्यांच्यानें बरोबरी करवली जाणार नाहीं. तरवारीच्या जोरावर केवळ राज्य करणें म्हणजे राज्य चिरायु होईल असें कधींही समजूं नये. प्रजेचें मन मोहित करून, तिचे मनोगत हमेषा ऐकून, त्यांतील बऱ्या वाईट गोष्टींचा विचार व्हावा व त्या प्रमाणें राज्यव्यवस्थेंत परिणाम घडावेत. ह्या गोष्टी इंग्लिश अंमलाखालीं जशा आम्ही अनुभवितों व पुढें ही अनुभवूं तशा दुसरी कडे सर्वत्र नाहींत असें आमच्या वाचकांनीं पक्कें समजावें.

## हिंदुस्थान व इंग्लिश-राज्य.

इंग्लिश लोक तरवार बहादर तर खरे, आणि म्हणूनच ते हिंदुस्थानचे राज्यकर्ते बनले. आरंभीं राजपद पराक्रमसाध्य असतें हें उघड आहे पण तें मिळविलेलें राजपद तरवारीच्या धारेवर टिकतें हें मात्र खरें नव्हे. स्वतां इंग्लंडदेश स्वातंत्र्याचें माहेरघर आहे आणि हिंदुस्थानांत ही इंग्लिश लोक आपल्या नांवाजलेल्या राज्यपद्धतीस बेताबातानें अनुसरून राज्य करित आहेत. या त्यांच्या इभ्रतीमुळें हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्था पापाशुद्ध आहे, व दिवसेंदिवस हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेची ही भव्य इमारत अनुपम अशी उभारत आहे हें तावडतोब ध्यानांत येईल. आम्हा प्रजेचा व राज्यकर्त्यांचा संबंध जसजसा सलोख्यानें व एकोप्यानें निकट होत चालला आहे तसतसें आमच्या राष्ट्राच्या सुखाचें पारडें अधिकाधिक झुकत आहे हें सांगणें नको. आम्हीं इंग्लिश लोकांची प्रजा झालों तेव्हां आरंभीं केवळ परतंत्र होतों ते आतां स्वतंत्र होऊं लागलों आहों, दुःखी होतों तें क्रमाक्रमानें सुखी होत आहों पण सधन होतों ते मात्र निर्धन बनत चाललों आहों. असा विलक्षण प्रकार असण्याचें कारण हें आहे कीं प्रजा स्वतंत्र, सुखी व अबादान असण्याला राज्यव्यवस्थेंत जीं मूलतत्वें असणें अगदीं आवश्यक आहे त्या पैकीं कांहीं महत्वांच्या तत्वांचें आमच्या इकडील राज्यपद्धतींत वारें सुद्धां नसतें. हिंदुस्थानांतील राजसत्तेचा लगाम इंग्लिशलोक अगत तंग धरित नाहींत तरी फार जपून व स्वतांच्या ढंगानें सैल सोडतात म्हणून वरील अंतस्थ शोचनीय स्थिती दिसुन येते. या प्रसंगीं आम्हीं हें ही प्रांजलपणानें कबूल करितों कीं वेळोवेळीं आमचे राज्यकर्ते आम्हांस सवडीनुसार नवीन हक्क व अधिकार देऊं लागले आहेत व आम्ही इंग्लिश राज्यव्यवस्थेचें सुख थोडथोडें अनुभवूं लागलों आहों.

हिंदुस्थानचे लोक राजनिष्ठ नाहींत, प्रसंग बेतल्यास ते केव्हां बिथरतील याचा नेम नाहीं, हा राजा काय, दुसरा राजा काय त्यांना सारखाच, ते इंग्लडचें जूं झुगारून रशियाचें आनंदानें पत्करतील, ते इंग्लिशराज्य पाहिजे म्हणतात याचें कारण इंग्लिशलोक त्यांस शेरास सव्वाशेराप्रमाणें पुरून उरले आहेत, बळी तो कानपिळी हे ते पक्कें समजून आहेत. इंग्लिशांच्या कमरेला तरवार लटकत आहे व ती एक सारखी गांजत आहे तोंपर्यंत हिंदुस्थानांतील राजद्रोही लोकांपासून फारशी भिती बाळगण्याचें कारण नाहीं असें व अशाच मासल्याचे विचार 'साटरडे रिव्हयू' व त्या सारख्या दुसऱ्या कांहीं वर्तमानपत्रांतून येऊं लागले आहेत. हे वर्तमानपत्रकार आपल्या वेडगळ लेखांनीं जनद्रोहाचे मिथ्या पाप राज्यकर्त्यांच्या माथीं मात्र आणितात या शिवाय दुसरें कांहीं निष्पन्न झाल्याचें दिसून येत नाहीं. हे मोठ्या शैलीनें आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ १८५७ सालच्या व इंग्लिशराज्य या देशांत स्थापन होण्या पूर्वींच्या वेळच्या गोष्टी पुढें आणितात हें पाहून मोठें सखेदाश्चर्य वाटतें. वरील लेखाचा सगळा रोंख सर लिपेल ग्रिफीन यांजवर आहे व सर लिपेल याचे 'हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व त्यांचीं सैन्यें' यावरील निबंधाचें खंडन करणें हाच काय तो त्या लेखाचा मूलहेतू असावा असें थोड्या इशा विचारांतीं स्पष्ट कळून येतें. आम्ही असें उघड म्हणतों कीं सरलिपेल यांचे विचार थोर व अनुभवशीर असून हिंदुस्थानच्या राज्यसूत्रांच्या चालकांनीं पावलों पावलीं मनांत वागविण्या सारखे आहेत.

सदर्हू पत्रकारांचे विचार किती पोंकळ व घंमेडीचे आहेत हें दाखविण्यास फार लांब जावयाला नको. पन्नास वर्षां पूर्वींचें हिंदुस्थान व आजमितीचें हिंदुस्थान यांमध्यें केवढें जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. लार्ड डलहौसी, वेलस्ली, सारख्या गव्हरनर जनरलांची दगलबाजीनें अथवा सुचेल त्या रितीनें राज्यें बळकाविण्याची पद्धत नाहींशी होऊन लार्ड बेंटिंक, कानिंग रिपन, डफरिन सारखे हुशार उदार व्हाइसराय साहेबांचे कारकिर्दींत गरीब व श्रीमान, उंच व नीच यांस सारखा न्याय मिळत आहे. रशियन लोक इंग्लिशावर येणार असें कळल्या बरोबर सर्व हिंदुस्थानचे राजेरजवाडे आपलीं सैन्यें घेऊन आपल्या राजकर्त्यांच्या साह्यास पुढें सरसावले; पुष्कळ लोकांनीं आपण आपखुशीनें सैन्यांत नोंकरी करण्यास एका पायावर तयार आहों असें लेखी अर्जानें सरकारास कळविलें, आणि या सारख्या अन्य रितीनें यथाशक्ति झटण्यास लोक प्रयत्न करूं लागले. राजनिष्ठेचें सूचक याहून दुसरें तें कोणतें पाहिजे? इंग्लिश लोक व त्यांची हिंदुस्थानांतील प्रजा हीं जशीं एका अंतःकरणानें परस्पराच्या हितास झटत आहेत तशीं उदाहरणें इतिहासांत पाहूं गेलें असतां फार थोडीं आढळतील असें आम्हांस वाटतें.

---

रशियाचा वकील एम. डी. स्टाल व इंग्रजाकडील अर्ल ऑफ ग्रानव्हिल या दोघांनीं तहाबद्दल ठरविलेल्या शर्ती रशियाचे झारास मुळीच कबूल नाहींत असें काल आलेल्या मुंबईच्या डेलीवरून कळतें. तह कायम झाला नसून त्याबद्दल ज्यास्त पत्र व्यवहार चालूं आहेत.

---

# The Berar Samachar

MONDAY, May, 18, 1885

## ARMIES OF NATIVE STATES

Sir Lepel Griffin has writen a letter to the London Times in which he dis-cusses the position of the armies of native states in relation to the British Government. We do not agree with all the opinions he has expressed in that lettar but we don't like to express our dissent with those views before adverting to that part of it which has our full concurrence. Sir Lepel has gone far enough though he could with justice have gone farther. His opinion derives great weight from the fact that he was connected with over 100 native states for a long period in the most intimate manner. He says:—

"I hold that they ( native states ) constitute no danger to British supremacy, and that the embarrassment which a few among them might under exceptional circumstances cause is as nothing as compared with the advantage and strength which a wise policy might derive from them. I do not believe that they are ruinous or even burdensome to the states which maintain them, while they both form a legitimate sourse of pride to the chiefs and gratify the natural and honourable desire of the people for military service. Their maintenance is both obligatory by treaty engagements and by wise policy; while they form cheaply and efficiently important duties which the British Government and the English army would find it most difficult to undertake. "

Here we find stated in a nutshell the principal arguments in favour of the maintenance of Native States. We do not know what opinion Sir Lepel had held before he was placed in a position to have familiar inter-course with about 100 native states. The critic of the Times who had turned the leaf over again should weigh this high opinion expressed by a high man and then say his own say with regard to the matter. Such single well thought opinion founded upon proper materials and epitomising the result of long experience is of more value than 100 off-hand opinions based upon dangers which have existence in their imagination and which designing people have circulated. Instead of taking inspiration from men whose position to be judges is extremely doubtful they should turn their attention to the writings of gentlemen like Sir Lepel Griffin who have not allowed judgment to be warped. It is all very well to say that native states are anachronisms, but such statements conceal a selfish desire and detract from the value of the opinion. If people take the trouble to see below the surface if they prove by facts and figures what they put forward as very serious arguments it would be nice and well. Here also one-sided facts or conclusions would not do. A comprehensive survey of the whole subject must be made and the pros and cons fully stated. When they have done this the public will have materials to judge whether their conclusions are warranted by facts or otherwise. If they mean to do harm to the native states then of course they take a proper way of action; but if they are at all serious and mean what they say as a conclusion arrived at by deep thinking then we request them to be more cautious before hurling such damaging charges against native states. On the efficiency of native armies Sir Lepel is very clear. "I cannot" he says "in this letter, already too long, point out how grievously statistics may mislead uninstructed critics. No doubt it appears formidable enough that feudatory India should maintain armies amounting to 350,000 men and an artillery of 4237 guns. But those who are behind the scenes laugh at these figures. The artillery does not include a single rifled gun and four-fifths of this imposing total are honey-combed survivors of mediæval battle-fields, and would burst if fired. Feudatory India could not from the Himalayas to Ceylon place 30,000 disciplined troops in the field. Even these would be without really qualified officers, with smooth bore artillery and with muzzle loading muskets or rifles. The remainder of this vast force melts on examination into thin air. It is not to be counted by reasonable men as military strength."

---

## TECHNICAL EDUCATION

When the late Viceroy Lord Ripon delivered a speech on the subject of technical education he pointed out the importance of establishing schools for that purpose and said that he was very happy to see the progress made by the people in the encouragement of that sort of instruction. When all the important European countries were devoting special attention to that branch of instruction, England with all her intelligence and industry would not be able to cope with other countries where workmen were grinded into the profession. The competition was every day growing more keen and unless England kept pace with the times, she would be out-beaten by other nations in her own markets. Instead of harping upon the disadvantages of free trade, the people

should try and match foreign nations in the skill and intelligence of her workmen. Protection is like robbing Peter to pay Paul—burdening the nations with high prices for articles which it would get cheaper from foreigners if it were not for the prohibitive duties. The address was very sensible and tried to impress upon the audience the proper value of technical education. His Lordship made allusion to the efforts being made in India towards the advancement of technical instruction which he considered very noble and promising. The desire of the promoters he said was to restore her lost arts to India. Here are his exact words.

"He was glad that the country was awakening to the importance of this question, that during the time he had been absent in India there had been great progress made in regard to it, and that schools like that at Huddersfield were springing up all over the country. During the last few months of his stay in India he was much struck with the fact that technical education was engaging a great deal of attention, for there were in India many men of great intellectual acquirements and largely developed education. The ancient industries and arts of India had to a considerable extent fallen into decay, and the men to whom he had referred were asking themselves what they could do to restore and to give fresh life to them, and just before he left India a committee of private individuals was appointed, without Government support or Government instigation, for the purpose of seeing what they could do to promote technical instruction in that country."

If a country like England where industrial development and commercial enterprise is at its highest, cannot do without technical schools how much more necessary and desirable are they in India?

In our country the old arts and manufactures have nearly perished before the scientific and mechanical resources of European countries. The introduction of Railways, Mills and other industries has given a death-blow to the rough conveyances and hand-manufactured articles in vogue in former times. The cost of production has also diminished & everyday more and more work is being turned out of the machinery thereby diminishing the industry of the artizans. People have scarcely any profession left to follow. We see hundreds of people starving without food because their labour cannot be made use of. In the face of all these circumstances it is very desirable to teach the people in the ways of trade. Government service is nearly blocked and every year hundreds of university students receive certificates or diplomas which are guarantee only for a certain amount of education but which are insufficient to bring them food. If the establishment of technical schools turns out candidates who can be useful in one trade or another, they will be at liberty to open a new firm for themselves or to join one that has been already in existence. Under such circumstances the trading capacities of the country would be increased & we will be able to prepare at home almost all articles for which we have to depend upon foreigners. The under-ground wealth of India remains undeveloped because the people have neither the energy nor the knowledge to utilize it. When the knowledge is obtained the mind, the practical head, will naturally be directed to put that knowledge to use. Various industries will spring up and we hope at no distant date to see India waking up from a heavy slumber. Students now are best adapted to read, write, teach, or do some other office work. From these schools we will have students who can work for themselves independently of the support of others. They will take the headship and employ clerks for themselves, because it is next to impossible that trade will not pay for itself. When such practical experience can set them a-going, more energy will voluntarily manifest its own self. They will form trading companies and other bodies and the great part of the youthful aspirations will be directed in the same channels in which the European countries have achieved such brilliant success. People will not be satisfied only with the University degree but when they see others growing rich, respectable, independent and useful, they will follow the example, imitate their brothers and will prefer the labour of a life-long exertion in trade than the humiliating and perhaps degrading subordination of the government service. Unless the industry is encouraged in this fashion the regeneration of India will be only a dream. The impetus of trade and money will incite them to visit European countries when they can afford to do it and by imitation and invention, by adaptation and improvement they will make an indelible impression upon the country. It will not be such a miserable lot as we have now to face. Mills are now springing up here and there but there are no trained men, no skilled artizans. It will not be as some writers picture that the natives of India will at last be turned into hewers of wood and drawers of water, but they will stand the severest competition with foreign countries. The intelligence of Hindus especially of Brahmins is proverbial. It is only because his religious prejudices, the sway of custom, the novelty of fields he has to enter, cannot yet leave him free to act. Nor has he the consciousness of practical and trade knowledge though he has the theory at the tip of his tongue

ACKNOWLEDGEMENT.

We acknowledge with thanks the receipt of the Athenæum- a periodical published in London.

## पुस्तकांची वगैरे पोच

'पिंपळगांववासी' — पत्र उशीरां आल्यामुळें पुढील अंकीं घेतलें जाईल.

## वऱ्हाड.

येथील डेपुटी कमिशनर कचेरींतील डेपुटी क्लार्कच्या ०० रुपयांच्या जागीं मि. फिलिप थोरिस यांस, त्यांच्या ५० रुपयांच्या जागीं रा. रा. मारुती हरी यांस, त्यांच्या ४०।५०च्या जागीं रा.रा.वामन नारायण यांस, त्यांच्या २५।३०च्या जागीं रा. रा. शंकर तुकाराम यांस, व त्यांच्या २०।३० च्या जागीं रा. रा. वासुदेव सदाशिव यांस नेमिलें. ही बदली बदली फक्त तीन महीन्या पुरती आहे. रा. रा. जोशी आ. डे. क्लार्क ह्यांना एकदम कां कमी केले तें कळत नाहीं.

येथील स्मालकाज कोर्टाचे जज रा.रा. पुरुषोत्तम नारायण भट हे एक महिन्याच्या रजेवर गेल्या आठवड्यांत पुण्यास गेले.

मि. आरदसर दिनसाजी चिनाय ए.अ. कमि.यांस आकोटाहून येथील ट्रेझरी आफिसरचे जागीं तूर्त ३ महिनें पर्यंत बदलले, व रा.रा.देवराव जयकृष्ण ए.अ.कामि.यांची आकोटास पुन्हा नेमणूक केली. पण दिवाणी कोर्ट बंद असल्यामुळें सध्या ते येथेंच रहातील असें कळतें.

पेशाच्या अफरातफरी बद्दल येथील हारवीं आणि सभापतीच्या पार्शी एजंटावर फौजदारी खटला चालला होता परंतु बरोबर पुरावा नसल्यामुळें खटला सोडून दिला.

व्याख्यान—गेल्या आठवड्यांत ता. १६ रोजीं येथील नेटिव जनरल लायब्ररींत रा. रा. सदाशिवपंत दादा भागवत यांनीं "पोषाख', या विषयावर व्याख्यान दिलें. खरोखर हा विषय प्रतिपादन करण्यास फार कठीण होता. रा. रा. भागवत हे चटकदार व हास्यरसोत्पादक भाषण करण्यांत फार हूशार असा बहुतेक लोकांचा समज आहे परंतु सदहू गुणापैकीं एक ही त्यादिवशीं दृष्टोत्पत्तीस आला नाहीं. ह्या विषयाची तयारी ह्यांनीं एक दिवसांत केली होती असें त्यांच्या पोकळ व गप्पाष्टकावरून दिसून आलें. आपले लोकांनीं दुसऱ्याचें अनुकरण केल्यामुळें आपला सर्व पोषाख भडकत चालला आहे असें त्यांनीं बोलून मात्र दाखविलें परंतु पहिल्यानें पोषाख कसे होते, व त्यांत सुधारणा होत होत हल्लीं कसे झाले आहेत हें प्रमाणासह न दाखवितां नुसत्या वर वर गप्पा ठोकल्या व अखेरीस दक्षिणेंतील चक्रीदार मोठाल्या पागोट्यापेक्षां वऱ्हाडी पागोटींच फक्त घालणें किती सुखावह आहे हें सिद्ध करण्याकारितां आमच्या विद्वान व्याख्यानकारांनीं आपले सर्व वाक्पांडित्य खर्च केलें. सदहू भाषणापासून लोकांचे मनावर कांहीं मात्रही ठसा उमटला नाहीं असें मागाहून रा. रा. पऱ्हाळकर व देसाई यांनीं जीं थोडक्यांत पण खरमरीत भाषणें करून सदहू भाषणाचें खंडन केलें त्यावरून दिसून आलें.

सरते शेवटीं रा. रा. भागवत यांनीं असें बोलून दाखविलें कीं कोणीही व्याख्यान दिलें असतां त्यांतील गुण दोष सांगून विषयाचें खंडन करणें बरोबर नाहीं हें त्यांचें सांगणें ह्या वेळेस अगदीं अप्रशस्त झालें असें आम्हांस वाटतें.

आपण जसें बोलतो तसेंच आतां वागणार हें दाखविण्या कारितां व्याख्यानकार त्याच दिवशीं फक्त वऱ्हाडी पागोटें उर्फ बत्ती घालून आले होते. परंतु "बोले तैसा चाले त्याची वंदावीं पावलें" ह्या म्हणी प्रमाणें चालणार फारच विरळा असून "पुराणांतील वांगी पुराणांत" ह्या वाक्या प्रमाणेंच वागणारे सर्व असतात हें व्याख्यानकारांनीं ध्यानांत ठेवावें.

### नोटीस.

नादारी मुकदमा नंबर ९. १८८९.

नमुना. (जी)

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं सूर्यभान वल्लद राणोजी जात कुणबी राहणार चिखलगांव तालुके अकोलें हा नादार आहे असा आज तारेखेस ठराव जाहला आहे आणि तारीख २९ माहे जून सन १८८९चा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्याकारितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकारितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांचीं तक्रार सांगण्याची ईच्छा असेल त्यासर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे छाप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिसींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्याजबद्दल ज्या साक्षी समन्से करावयाची ईच्छा असेल त्या साक्षिदारांचीं नांवें दाखल करावीं: ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस पूर्वीं तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकारितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणीं आठ आण्याचे छापकागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरें असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

२जे सावकार दूरचे राहणार असतील त्यावर आठ८आण्याच्या छापावर दाव्याची हकिकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपत लिहावी. आणि ती यादी टपालतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. ता.१२ मे सन १८८९.इ०

(हुकमावरून.)

Yeshwantrao Mahadev.

नादारी कोर्टाचे क्लार्क जिल्हे अकोला.

### नोटीस.

राजश्री नागोजी वल्लद शिवाजी जात माळी रहाणार लोणी गवळी प्रगणें मेहकर यास. खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुम्ही माझे नवरे असून मी वयातींत सुमारें १५वर्षां पासून झाली आहे: परंतु तुम्ही पुरुषांत नसल्यामुळें तुमचेपासून संसारजन्य सुखाचा उपभोग मिळत नाहीं. याकरितां जाती धर्माप्रमाणें दुसरा नवरा करण्यास बरेंच वेळां परवानगी मागितली परंतु तुम्ही दिली नाहीं. सबब दोन वेळां विद्यमान दिपुटी कमिशनर साहेब बहादूर यांजकडेस अर्ज केला होता त्या वरून जातींत निकाल करून घेण्या बद्दल हुकुम झाला. जातीचे लोकांनीं बरेंच वेळां तुम्हास बोलाविलें परंतु तुम्ही न आल्यामुळें माझा निकाल निघाला नाहीं. या कारितां ही नोटीस देण्यांत येतें कीं, ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आत पंच लोकांत येऊन माझा निकाल लावावा. नाहीं पेक्षां तुमचा मजवर जन्म संबंधी असलेला हक्क नाहींसा होऊन मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर कोणत्या ही प्रकारे दावा वगैरे चालणार नाहीं. कळावें तारीख ११ माहे मे सन १८८९ इसवी.

(सही) शाहू मर्द नागोजी नागरत निशानी खुद हातची असे.

## वर्तमानसार.

चंदासिंग नांवाचा एक गरीब जमीनदाराचा मुलगा जन्मांध असून पंजाबयुनिव्हर्सिटीची प्रवेशपरीक्षा पसार झाला. याची इच्छा युनिव्हर्सिटिच्या सर्व परीक्षा पसार होण्याची आहे. याची स्मरण शक्ति व धारणा शक्ति मोठी विलक्षण आहे. हल्लीं हा अंध विद्यार्थी लाहोर कालेजांत आहे. लाहोर कालेजचे सर्व प्रोफेसर याची मोठी प्रसंशा करितात.

मोंगलाईंतील एका लग्नांत असा चमत्कार घडला कीं, मुसलमान लोकांत जिल्वाच्या दिवसाच्या रात्रीं नवऱ्या जवळ बायकोस पाठवित असतात, त्या प्रमाणें ही मुलगी उपवर चवदा पंधरा वर्षांची इजलाही पाठविले. हिचे आंगवर दोन अडीच हजार रुपयाचे दागिने होते. रात्रीं नवरा पिसापी करितां उठून पाहतो तों बायको खोलींत नाहीं व खोलीचें दार जसें असावें तसें बंद होतें. या मुळें या गोष्टीचा सरकारांतून फार बारिक तपास चालला आहे. परंतु अद्याप काहीं शोध लागला नाहीं. न्या०जि०

वस्तुतः युनिव्हर्सिटीची पायरी जिंकलेले लोक हे आमचे मोहोरके आहेत. देशाचें हित किंवा अनहित करणें सर्वस्वी यांच्या हातीं आहे म्हटलें तरी चालेल. परंतु या मंडळीकडे पाहिलें म्हणजे छातीच फाटते. कोणाचे डोळे अंध झालेले, कोणाचीं हाडें निघालेलीं, कोणाला क्षयाची भावना झालेली, कोणी छातीच्या रोगानें लुळे झालेले असे अनेक आधुनिक विद्वानांत निघतात, तेव्हा यांच्या हांतून देशाचें कल्याण कसें होणार? देश कल्याण करण्याला केवळ काबाडकष्ट करावे लागतात असें आम्ही म्हणत नाहीं. तरी पण कांहीं शरीर झिजविलें पाहिजे त. हीं पाखरांचें पितरें कालेजांतून येऊन कोठें नोकरी लागली न लागली तों गळ्यांत लक्ष्मी बायको आणि डोकीवर अनावर संसारबोजा बसला म्हणजे मग तर त्यांची असली नसलेली शक्ती त्या खालीं खचून त्यांनां स्वतःला सावरतां सावरतां नाकीं नव येतात. तेव्हां ते देशाच्या हिताकडे कोठें पहात बसतील!

पैसा उकळण्याची खाशी तोड—हल्लीं आमच्या सरकाराला पैशाची मोठी अडचण आली आहे. तेव्हां एका बुद्धीमान् गृहस्थानें अशी सूचना केली आहे कीं मुनसीपॉलिटींत जे मेंबर होऊं इच्छितात, व जे चेरमन किंवा प्रसिडेंट होण्याकरितां प्रयत्न करतात, त्यांच्यावर कर आकारावा! चांगली युक्ति योजली. आमच्यामतें आणखी कांहीं लोक यांत दाखल केले पाहिजेत. कोणाला जूरर किंवा आसेसर होण्याची मोठी हौत असते, कोणाला माजिस्त्रेटी गाजविण्याची लहर लागते, तेव्हां अशांचे एक लीस्ट करून त्यांनां विचारावें म्हणजे कैक लोक आत्मसंतोषानें आणि अक्कल हुषारीनें कर भरतील.

फौजदारी खटल्यांत जसे जूरर असतात तसे दिवाणी मोकदम्यांतही असावेत अशी एकानें सूचना केली आहे. सूचना कांहीं वाईट नाहीं.

संस्थान विशाळ गड नजीक कांसारी नदीचे उगमापासून दोनतीन मैल पर्यंत पाणी अगदीं लाल झालें आहे असें समजतें!!! पाणी पहाण्याकरितां इकडे (कोल्हापूर) मागविलें आहे. डाक्टर साहेबांच्या परीक्षेनें तें कशापासून होतें हें समजून येईलच. तों पर्यंत कांहीं अपशकून आहे असें म्हणतां येत नाहीं. धा०वृ०

गडईंग्लज इलाखा कोल्हापूर येथें ता० २९ एप्रिल रोजीं रात्रीचें ८ व ९ चे अमलांत धरणीकंपानें लोकांस हालवून चांगलें जागें केलें. तीच शक्ती भूदरगड पेठ्यांत शिरून ४ गांव हालविले. नंतर आजरें तालुक्यांत घुसून मोठा दंगा उसळून दिला. परंपरा. आलेल्या दंतकथेवरून जुने वृद्ध लोक कळवितात कीं, कोठें युद्धसंग्राम चालूं झाला असतां कोल्हापूर देवीच्या नांवानें हेंगहवनादी विधी होत असतो. तो हल्लीं महादी व इंग्लिश यांच्या तुंबळ युद्धांत धारातीर्थाचे पाट चालूं झाले तरी होत नाहीं. इतक्या साठीं ही प्रकोपदर्शक ज्वाला निघाली आहे.

शामाचरण चंदनलाल व शंकर चरण नांवचीं दोन उमेदवार पोरें कलकत्याचें रहिवाशीं सांगून सातारा एथें रहात होते. त्यांनीं गिरजानंद नांवाचे गृहस्थास फसवून आपल्या रहातें ठिकाणीं नेऊन जबर मार दिला. तो खटला मे. हु. डे. पुढें चालून आरोपीवर गुन्ह्याची शाबुदी करून शामाचरणास २ महिने व शंकर चरणास दीड महिना सक्त मजुरी साठीं तुरुंगांत रवाना केलें. या कामांत गुलाब मोहिदीन व बाळा बोवडा हे शराकत असल्याचे शाबिदीवरून प्रत्येकापासून २० रुपये दंड घेऊन सोडलें.

आपल्या इकडे बारा ब्राह्मण बोलावून त्यांचें जसें पादसेवन करितात त्याप्रमाणें आखिराच्या बादशाहाचे घरीं अशीच एक एक चाल चालूं आहे. ते १२ गुरूस बोलावून त्यांचें तीर्थ घेतात. म.मि.

पेंजडेह येथें जी लडाई झाली त्या लडाईंत काबुली लोकांकडील मुख्य सरदार नायब सालर नांवाचा होता. त्यास जनरल क्यामराफ यानें प्रथम असा निरोप पाठविला कीं, तुम्ही आमच्याशी न लढतां आमचें सख्य जोडावें व आपण उभयतांनीं इग्रजांची छावणी पार करावी. या मसलतीस काबुली सरदारानें अनुमोदन दिलें नाहीं. असें एक प्रत्यक्ष पहाराणा गृहस्थ कळवितो. यावरून रशियन लोक आमच्या सरकारावर दांत ओठ चावीत आहेत. असें नाहीं कां होत? मग आमचे सरकार तह व्हावा म्हणून आर्जव तें कशाला करितें त्या गुलामाचे एक घाव दोन तुकडे कां करीत नाहीं?

तारेच्या बातमींत विलायतेहून अशी खबर आली आहे कीं, रशिया व इंग्लंड यांचा तह झाल्यामुळें नामदार लार्ड डफरिन यांची इकडे असण्याची इतिकर्तव्यता संपली सबब; ते आपल्या जागेचा राजीनामा देत आहेत. ही बातमी कितपत खरी आहे हें समजत नाहीं; परंतु अमीर व लार्ट साहेब यांच्या दरम्यान जो प्रकार झाला तो समग्र मि० ग्लयाडस्टन साहेब यांस कळवून घेण्याची फार इच्छा आहे. यावरून या बाबतींत बराच तथ्यांश असावा असेंही दिसतें.

नेपाळचे माजी दिवाण सरजंगबहादूर यांचे चिरंजीव इकडे पळून आले होते, पण त्यांस पकडून नेपाळी सरकारानें कैदेंत ठेविलें असें आतांच एका बातमीदाराकडून आम्हांस कळलें आहे. खरें असेल तर विपरीत दिसतें.

वमूर्डी नांवाचें उत्तम जातीचें आरोरूट एका कोंकणच्या गृहस्थानें तयार केलें असून त्याचे गुण अमेरिकेंतल्या आरोरूटपेक्षां किंचित् ही कमी नाहींत अशीं पुष्कळ इंग्रजी सरटीफिकेटें आहेत. हे गृहस्थ हल्लीं पुण्यास आले असून त्यांनीं आपला जिन्नस ही बरोबर आणलेला आहे. ही इतकी उत्तम जिन्नस असूनही विलायतेपेक्षां निम्मेनें कमी म्हणजे प्रत्येक अत्तेराच्या डब्यास फक्त ०॥१२ प्रमाणें हे विकतात. हा पदार्थ उपवासास फारच उत्तम आहे हें सर्वत्र प्रसिद्ध असून एका तोळ्यांत उपास भागतो हेंही सर्वांस माहीत आहेच. हा देशी पदार्थ कोणास पाहिजे असल्यास पुणें वैभवकर्ते त्यांस खुषीनें मिळवून देतील.

कोंकणांत मनकापूर नांवाच्या ठिकाणीं कासरी नांवाची नदी आहे. तिच्या पाण्याचे उगमापासून सुमारें ४ कोसपर्यंत रक्त बनत आहे व पुढेंही हळूहळू बनत चाललें आहे असें एक गृहस्थ प्रत्यक्ष पाहून कळवितो! खरें असल्यास चमत्कारच! पु०वै०

आगगाडीच्या एका डब्याचें मोल.—आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या एका डब्याची एकंदर किंमत सुमारें ३००० रुपये असते असें म्हणतात!! डोकीस फाटके पागोटें, आंगावर धनगरी कांबळी व खांद्यावर बालेघाटी पडशी एवढ्या ऐवजनिशी प्रवास करणाऱ्या नांगऱ्यास आपण इतक्या मोल्या मोलाच्या रथांतून प्रवास करीत आहों, हें ठाऊक असेल काय?

टेलिफोन.—चिकागो आणि न्यूयॉर्क या दोन शहरांच्या दरम्यान टेलिफोनची तार पसरली आहे. तिच्या योगें त्या दोन नगरच्या रहिवाशांस एकमेकांशीं खशाल संभाषण करितां येतें! या दोन स्थलांतील अंतर किती म्हणून विचाराल तर—एक हजार मैलाहून अधिक!!!

तारायंत्रें आणि कफक्षय.—तारमास्तरांचें काम करणारांस कफक्षयाची भावना फार लवकर जडते असें कित्येक पाश्चिमात्य वैद्यांचें मत आहे. ते म्हणतात कीं आपल्या लोकांस नेहमीं वांकून तारेचा मजकूर लिहून घ्यावा लागतो यामुळें त्यांचें काळीज बिघडतें, आणि रात्रीं जागावें लागल्या कारणानें त्यांच्या अन्नाचें चांगलेंसें पचन होत नाहीं. सु० ज्ञा०

धंद्याचें दुर्भिक्ष—बिलायतेंत धंदे नसल्यामुळें सुमारें १५,००० मजूर लोक गेल्या मार्च महिन्यांत टेम्स नदीच्याकांठीं जमून त्यांनीं सरकाराजवळ काम मागण्याकरितां डेप्युटेशन पाठविलें होतें. त्यास सरकाराकडून नुस्ते गोड शब्द मात्र मिळाले. मनुष्याच्या निर्वाहाची दिवसेंदिवस कोण दुर्धट स्थिति होत चालली आहे. इं० प्र०

हत्यारांची मोकळिक—तंट्याभिलाच्या अतित्रासा मुळें लोकां जवळ शस्त्र नसल्या कारणानें नेमाड जिल्ह्यांतील लोकांस अतिशय त्रास सोसावा लागतो व तंट्याही धरला जात नाहीं असें समजून सरकारास दीन लोकांची करुणा येऊन त्यांनीं या जिल्ह्यांतील सर्व लोकांस हत्यारें बाळगण्याची परवानगी दिली आहे व सक्त अशी ताकीद केली आहे कीं, हत्यारें नेहमीं उत्तम स्थितींत असलीं पाहिजेत. कदाचित् कोणी आफिसरांनीं त्याचें अवलोकन केलें तर तीं खराब दिसूं नयेत. एकंदरीनें तंट्या भिलानें बरेंच दिवस टिकाव धरिला. हा पण शक्तिचा चांगला उपयोग. सु० ति०

पुणें येथें कृष्णा बिन लक्ष्मण नांवाच्या पोष्टाकडील एका शिपायानें डाकेंतील पत्रें ज्यांची त्यांस पावती न करितां सोमवार पेठेंतील एका बिहिरींत त्या पत्रांचें बंडल टाकून दिलें. त्यावरून सि. म्या. प्लंकेट यांनीं त्यांस ५० रु. दंड केला. व दंड न दिल्यास २महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा दिली. या शिपायास तीं पत्रें विहिरींत टाकून काय फायदा झाला असेल तो असो! इकडे पोष्टाचे शिपायांनीं लक्ष द्यावें. जंतुक.

रशिया व इंग्लंड यांच्यांत युद्ध संग्राम न माजतां आपसांत तंटा मिटेल अशा बातम्या अलिकडे येऊं लागल्या आहेत व त्याच अखेर खऱ्या ठरणार असें दिसतें. डेनमार्कचे राजास रशियन सरकारानें मध्यस्थ नेमलें आहे व इंग्रज सरकाराकडून मध्यस्थ होण्याची जर सूचना आली तर आपण तुमचें म्हणणें कबूल करूं असें त्यानें झारास सांगितलें आहे. आपल्या महाराणीची स्नुषा म्हणजे प्रिंस आफ वेल्सची बायको ही डेनमार्कच्या राजाची कन्या आहे व तिचीच बहीण हल्लींच्या रशियाच्या झारास दिलेली आहे. तेव्हां या तिन्ही राजांत नात्याचें सुताडें, गोताडें आहे, व डेनमार्कचे राजे उभय राष्ट्रांसही श्रेष्ठस्थानी आहेत तेव्हां त्यांच्या मध्यस्थीनें समाधानकारक असा निकाल लागेल अशी आशा आहे.

लार्ड डफरीन साहेबांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला म्हणून मार्निंगपोस्ट कर्त्याचें म्हणणें आहे, व डेलिन्यूज कर्ता ही बातमी खोटी म्हणतो. तेव्हां खरें काय तें समजत नाहीं, परंतु हल्लींचें प्रधानमंडळ लढाईला विरुद्ध आहे ही गोष्ट लार्ड डफरीन साहेबास रुचली नसून त्यांनीं राजीनामा दिला असेल असें मानण्यास आपणास कांहीं आधार नाहीं; कारण इंग्लंड व रशिया यांच्या दरम्यान लढाई होणार नाहीं असें लार्ड साहेबांनीं कित्येक दिवसा पूर्वी भाकीत केलें होतें. या उपर कांहीं अंतस्थ कारण असेल तर सांगवत नाहीं. डेलिन्यून पत्र हें लिबरल पक्षाचें आरगन (मुख) आहे तेव्हां त्यांतील बातमी विश्वासनीय आहे असें मानण्यास जागा आहे. ज्ञा० प्र०

जपान देशांत एका स्त्रीनें ओसाका शहरीं पाहिजे तो रोग नाहींसा करण्याचें ढोंग करून पुष्कळांस फसविल्यावरून तेथील राजानें तीस चांगली शिक्षा दिली.

२ ऱ्या हैद्राबाद कांटिजंट कवायलरीचा एक दफेदार ज्यानें १९,००० रुपयांची चोरी केली होती त्यास ६ महिन्यांची ठेपमिळाली व ४ थ्या कवायलरीचे जे लोक त्या चोरींत सामील होते त्यांस नोकरींतून बर्तर्फ केलें. सु०प०

---

☞ हें पत्र अकोला येथें के.बा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं प्रसिद्ध केलें.

साहामाही ,, ,, ,,
सालअखेर ,, ,, ,, १८
कीरकोळ अंकास ........................ ८२

नोटिशीबद्दल.
१० ओळींचें आंत रु. १
पुढें दर ओळीस ८ । ८६
दुसरे खेपेस .... ८१

Six monthly ........ 3 ,, 8a
Single copy ........................ 1a

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines......2Rs
Per line over 10...4a
Repetition per line 3as

THE BERAR SAMACHAR.

VOL XIX AKOLA MONDAY MAY 25 1885 NO 20
पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख २५ माहे मे सन १८८५ इ० अंक २०


## पक्षकार लोकांसफार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी. ए., एल एल. बी., मुंबई हायकोडताचे वकील हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हापीस "वऱ्हाडसमाचार" छापखान्याशेजारीं काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

ता. ९ दिसेंबर १८८४ } पत्रकर्ते.

## डाक्तर गोविंदराव खोत यांनीं विशेष काळजीनें तयार केलेलीं सरबतें.

१ गुलाबाचें सरबत. २ लिंबांचें सरबत. ३ डाळिंबांचें सरबत. ४ नारिंगांचें सरबत. ५ द्राक्षांचें सरबत.

हीं सर्व सरबतें फक्त फुलांच्या व फळांच्या अर्कांचीं केलेलीं असून उत्तम प्रकारचीं आहेत; आणि उष्ण देशांत थंडाई आणण्याचे जे गुण सरबतांत असावे ते वरील सरबतांत आहेत. बाजारांत मिळणाऱ्या या प्रकारच्या हलक्या जातीच्या सरबतांत वाईट रुचि व गंध असतो, या मुळें पुष्कळ लोकांस तीं घेणें आवडत नाहीं, म्हणून आमचीं सरबतें चांगलीं रुचकर व सुगंधीं करण्याची पुष्कळ काळजी व श्रम आम्ही घेतले आहेत असें खात्रीनें कळवितों. हीं सरबतें पाचक, रुचकर, थंडाई आणणारीं, व मधुर आहेत. यास्तव उन्हाळ्यांत हीं फार हितकर आहेत. आणि इतर सरबतांच्या अंगीं दाह उत्पन्न करण्याचा जो दोष आढळतो तो यांच्या अंगीं बिलकूल नसल्यामुळें हीं सर्वांनीं घेण्यास विशेष योग्य आहेत.

घेण्याची कृती २ पासून ३ मोठे चमचे कोणत्याही स० चे पेलाभर पाण्यांत घेणें.

ह्या सरबतांचा मोठा कारखाना उमरावतीस मालकानें घातला आहे. ज्यांस हीं सरबतें हवी असतील अशा व्यापाऱ्यांनीं तीं मागवून घेण्याबद्दल त्यांस विनंती आहे.

## किंमत.

| | | |
|---|---|---|
| गुलाबाचें सरबत | ९ रु० | एक ड० मोठ्या बाटल्यांस |
| लिंबांचें ,, ,, | ९ | ,, ,, ,, ,, |
| डाळिंब (अनार) | ९ ॥१२ | ,, ,, ,, ,, |
| संत्र्याचें | १० ॥८ | ,, ,, ,, ,, |
| द्राक्षाचें | १२ | ,, ,, ,, ,, |

दर डझनच्या पेटीला व प्याकिंगला चार आणे शिवाय पडतील.

एकदम घेणारास शेंभर रुपयांस ८ रु० कमिशन दिलें जाईल.

सरबतें उमरावतीत व अकोलें येथें 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत मिळतील.

पत्ता डा० जी० व्ही. खोत उमरावती.

## Dr. G. V. KHOT'S SPECIALITIES.

1. Syrup of Roses 2. Syrup of Lemons Syrup of Pomegranates 4. Syrup of Oranges 5. Syrup of Grapes

All the above Syrups, being of the finest quality, and containing only the extracts of the juice of the respective flowers, and fruits may be confidently relied on as possessing all the cooling properties for which these syrups are so justly appreciated in tropical climate. The proprietor, aware of the many objections persons have to inferior specimens of these syrups sold in the market consequent on their bad smell and taste, begs to state that every pain and precaution is taken to make the above syrups as palatable and agreeable as syrups ought to be. These syrups form a light, agreeable, highly cooling, as well as delicious drinks in warm weather whilst the entire absence of any heating or stimulating properties so much complained of in other kinds of drinks renders them for general use very preferable.

Dose—2 to 3 table-spoonfuls of any kind of syrups in a cup full of water makes a delicious cooling draught.

The Proprietor also states that he has opened in this town a manufactory on a large scale for the preparation of these syrups and traders are requested to send in their orders.

Prices.

Syrup of Roses...Rs. 9 per Dozen Quarts.
" Lemons .........Rs. 9 "
" Pomegranates Rs. 9 12 "
" Oranges ...... Rs. 10 8 "
" Grapes......... Rs. 12 "

Commission Rs. 8 per cent for cash remitted with order.

Annas four for box and packing per dozen extra.

Amraoti, March 1st, 1885

Address
To
G. V. Khote, Amraoti

## नोटीस.

संभु वल्लद महादु राहणार वस्ती कसबे नांदुरा यांस खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं माझी व तुमची पंचायत होऊन पंच लोकांनीं ठराव केलेला तो खालीं सर्वांच्या माहिती करितां जाहिर केला आहे. "पंचनामा सर्व गांववाले कुणबी राहणार कसबे नांदुरा तालुके मलकापूर जिल्हे बुलढाणा खालीं सह्या करणार १ तुळशी मर्द संभू रोहणकार कसबे नांदुरकर इनें आम्हां पंचाचे समक्ष येऊन जाहिर केलें कीं माझा नवरा याजला रक्तपितीचा दर्द होऊन फार अशक्त झाला तर माझे प्रपंचाची व्यवस्था कशी होणार तें जाहिर केलें आहे-१ माझे नवऱ्यास आज दहा पंधरा वर्षांपासून रक्तपिती झाली त्याचा संसार कोणते रितीप्रमाणें केला आहे तो आज पावेतों चालत आला आतां फारच फार दर्द झाल्यामुळें आणि त्याचे हातावीं बोटें पळालीं आहेत, मी त्याचे घरात कोणत्या रितिप्रमाणें वागणूक करावी, तुम्ही सर्व पंच आहांत असे तुमचे लक्षांत येईल त्याप्रमाणें माझा सर्व निकाल करणार पंच मायबाप आहात १ आणि माझा नवरा नामें संभू मजला असा बोलतो कीं माझे शरिरास रक्तपितीचा दर्द झाल्यामुळें माझे कडून तुजला वागावेत नाहीं आतां तूं कोणीकडे जाऊन दुसरा घरठाव करावे असें साफ बोलत आहे. १ मागलि गेलेले महिन्यांत मजला माझे नवऱ्यानें माझा हात धरून घराचे बाहेर काढून दिलें. असा बोलला कीं तूं कोणीकडेस जावे. तर मी ते दिवसांपासून दुसऱ्याचे कोठें कोठें राहून माझे भाकरीची सोय नसून मजूरीनें पोट भरीत आहे. १ आणि माझे गरिबाची विनंती पंचांचे पायाजवळ होच आहे कीं संभू याजला बोलावून खरी किंवा खोटी हकीकत आहे ते विचारावें. चौकशी अंतीं तुमचे ध्यानीं येईल आणि कोणते प्रकारें माझी मोकळीक करून देविवणार पंच आहात. सदरहू तुळसाईचे सांगितलेल्याप्रमाणें आम्ही आणि सर्व पंच सह्या करणार वर लिहिले प्रमाणें हकीकत झालेली ही सर्व खरी आहे. संभु रोहणकार याजला खराच रक्तपितीचा दर्द होऊन तुळसाईचा घरसंसार करील हें नाहीं, आणि संभूस ही विचारिलें असतां तुझे बायकोचें संगोपन करवित नाहीं, तर तो बोलला कीं माझे शरिरास रक्तपितीचा आजार होऊन माझेकडून इचें संगोपन होऊ शकत नाहीं. माझे कडून मी माझे बायकोस मोकळीक दिली आतां आमचे सर्व पंचांचें मत आहे कीं संभू रोहणकार दर्दी झाला याचे कडून तुळसाई मशारनिल्हेची बायको इजला वागविण्याचा दर्दामुळें शक्ती नाहीं. आणि आमचे जातीप्रमाणें तुळसाईस गंधर्व करण्यास कांहीं मनाई नाहीं. मात्र संभू रोहणकार याजला कोणते प्रकाची अंगांत शक्ति नाहीं, रक्तपितीनें फारच फार याचे शरीर बिघडलें, रूढीप्रमाणें गंधर्व करण्यास मनाई नाहीं असें आमचे सर्व पंचाचें मत आहे. तारीख २९ माहे मार्च सन १८८५ इसवी.

१ गिलूं वल्लद जैरामजी देशमुख मोकदम पाटील, महादू वल्लद सापुर्डो बोलकी पुरणाजी वल्लद करणाजी एकडे, महादाजी वल्लद राघोजी बिखे, संभु वल्लद यादोजी मिरघे, गणू वल्लद लक्ष्मण डाग, भोनाजी वल्लद निहाजी गावंडे एकोजी वल्लद मगोजी गायगोळ, खंडोजी वल्लद यादोजी अहीर, मनु वल्लद हरबाजी बुरखल, जांगोजी वल्लद पुंनाजी इंगळे, खुशाल वल्लद गुणाजी काळे, रामजी वल्लद गणोजी मिरघे, राघोजी वल्लद गणाजी मिरघे, पुंनाजी वल्लद लक्ष्मण राऊत, एकोजी वल्लद नानजी मेरखडे, गोविंदा वल्लद माहदाजी मेरखडे, मुरारी सखाराम पाटील, गणु वल्लद दानाजी राहणकार, महादु वल्लद रामजी मेरखडे, रूपचंद वल्लद रावजी पाटील, हरी वल्लद कृष्णाजी घाटे

ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांच्या आंत तुम्ही कांहीं जबाब न दिल्यास मी दुसरा घरठाव वर लिहिलेले हकीकतीवरहुकूम. करीन मग कोणती ही जबाबदारी मजवर राहिली नाहीं. कळावें तारीख २० माहे मे सन १८८५ इ.

(सही) तुळसाई मर्द संभू रोहणकार
इचे हातची बांगडी असे.

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

पिंपळगांवराजा ता० १९ मे सन १८८५ ईसवी.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. आपणाकडे पाठविलेल्या चार ओळीं आपल्या सुंदर पत्रीं छापून प्रसिद्ध कराल अशी आशा बाळगून तकलीफ देतों याची क्षमा असावी.

हा गांव मोंगलाई अंमलामध्यें कसा नांदला असेल तो असो, परंतु इंग्रजी सुरू झाल्या पासून तर या गांवास ऊर्जित दशा आली आहे म्हणजे शाळा, पोष्ट आफिस, पोलीस स्टेशन, डिसपेन्सरी इ० अनेक आफिसें आहेत. शाळेचे जागीं तर पुरुषोत्तम गणेश केळकर यांचे सारखी मोठमोठीं धेंडें होऊन गेलीं त्यांचे परिश्रमानें हा गांव बराच सुधारला गेला. आतां असें ऐकतों कीं येथील जें स्वतंत्र पोष्ट आफिस आहे तें शाळा मास्तरकडे देणार व त्यांस त्या कामगिरी बद्दल कांहीं अलावन्स मिळणार. असें झालें तर गांवचे लोकांची मोठी गैरसोय होणार आहे. कारण गांवांत सर्व प्रकारचे लोक असून लायब्ररी ही आहे. अशी व्यवस्था होण्यास पोष्टाचें ऊत्पन्न कमी म्हणावें तर नेहमीं मनीआर्डरी व पत्रें अशीं यावीं तशीं येतातच; कदाचित् सरकारास ऊत्पन्नांतून खर्च भागवितां येत नसेल तर आमचें येथील रा. रा. शिवराम गणपती पाटील हे पोष्ट आफिसाकरितां जागा सरकारास बिन भाड्यानें देण्यास तयार आहेत तरी पोष्ट

खात्याचे अधिकारी इकडे लक्ष देतील अशी आशा आहे. पत्रविस्तार फार झाला सबब पुरें करितों.

आपला एक
पिंपळगांववासी.

वऱ्हाडसमाचार.

मिती अधिक जेष्ठ शुद्ध १२ शके १८०७

## वरातीं पाठीमागून घोडा.

पोलिटिकल खात्यांत बहुत करून लष्करी लोकांच्या नेमणुका होत असतात परंतु अलिकडे कांहीं मोठमोठ्या हुद्यावर सिव्हिल खात्यांतील लोकांच्या नेमणुका होऊं लागल्या आहेत. कित्येकांचा असा समज होता कीं लष्करी खात्यांतील लोकांचे हातून जी सुधारणा होते त्या पेक्षां सिव्हिलियन्स यांचे हातून जास्त होऊन न्यायमुनसफी हीचांगली होईल परंतु ह्या उमेदीच्या गोष्टी अद्याप पर्यंत म्हणण्या सारख्या कांहींच घडून आल्या नाहींत. पोलिटिकल खात्यांत दोन महत्वाच्या जागा म्हणजे हैद्राबाद येथील रेसिडेन्ट व इंदूर येथील रेसिडेंट या जागेवर हल्लीं असलेले सिव्हिलियन स्वतः विद्वान असतील परंतु त्या पैकीं एकांनीं मुग्धत्व स्वीकारिलें आहे व दुसऱ्यांनीं वाक्पांडित्य करणें मनावर घेतलें आहे.

इंदूरचे हल्लींचे रेसिडेंट सर लिपिल ग्रिफीन यांची त्या जागीं नेमणूक झाल्यावर थोडे दिवसांनीं सिम्ला येथें एक त्यांनीं संभाषण केलें त्यांत त्यांनीं अन्योक्तीनें आपली प्रशंसा करून आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस व्यंगोक्तीनें वाक्‌ताडन केलें. त्यानंतर हे राजश्री इंदूर मुक्कामीं आपल्या पदारूढ झाल्यावर बहुतकरून नवाब बनले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं गेल्या खेपेस रजेवर जाण्याचें पूर्वीं संस्थान धार मुक्कामीं जो दरबार झाला त्या दरबारांत आम्ही आतां हिंदुस्थानांत परत येणार नाहीं वगैरे अप्रासंगिक गोष्टी बोलून दाखविल्या. त्यानंतर विलायतेस गेल्यावर नेटिव राजेरजवाडे लोकांवर आपल्या लेखांचा जो भडिमार केला तो सांगतां येत नाहीं. त्यांनीं आमच्या तमाम राजेलोकांस बेवकूब व नालायक ठरवून टाकिलें पण हेच गृहस्थ कामाच्या लालुचीनें म्हणा किंवा दैवगतीनें म्हणा हिंदुस्थानांत परत आल्या नंतर थोड्याच दिवसांत त्यांनीं आमचे राजेलोक व त्यांचीं सैन्यें या विषयीं आपला उमेदीचा अभिप्राय जाहिर केला.

हल्लीं सदर्हू ग्रीफीन साहेब यांनीं अफगाणिस्थानचे बाबतींत जे लेख लिहिले आहेत ते किती महत्वाचे असतील हे साहेब बहादूरांच्या वर लिहिलेल्या असंबद्ध वाक्पांडित्यावरून आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल. त्यांच्या मतें लार्ड रिपन साहेबांनीं १८८३ सालीं अमिर अबदुल रहिमान यांस कोणतांही करार न करितां १२ लाखाची वार्षिक देणगी दिली हें बरोबर केलें नाहीं. ग्रिफीन साहेबांचें असें म्हणणें आहे कीं इंग्रज सरकारांनीं वार्षिक १२ लाखाची देणगी देण्याचे पूर्वीं अमिराजवळून कंदहार, काबूल, हिरात इ० ठिकाणीं इंग्रजी तार आफिसें व पोष्ट आफिसें स्थापन करून द्यावीं व हिरातच्या किल्याची दुरुस्ती व बंदोबस्त इंग्रजी सरकारास करूं द्यावा, फ्रांटिअर रेल्वे करण्यास अमिरानें हरकत करूं नये व रशिया व अफगाणिस्थान या मधील सरहद्द ठरविण्या करितां कमिशनर मुकरर करावे वगैरे करारावर १२ लाखाची वार्षिक देणगी द्यावयाची होती; परंतु तसें न करितां मुफ्त १२ लाख रुपये सालिना देण्याचें कबूल केलें. या योगानें जो कार्यभाग व्हावयाचा तो तर झाला नाहींच परंतु अमिराचे मनावर कदाचित् निराळाच ग्रह झाला असावा.

असो; साहेब बहादुरांच्या या विचारांत किती तथ्य आहे हें आम्ही आजच सांगूं शकत नाहीं परंतु घटकाभर अशा प्रकारचे लेख महत्वाचे आहेत असें जरी मानिलें तरी ते बारा लाखाची देणगी देण्याचें कबूल केल्या नंतर आले यांत संशय नाहीं. आजवर ग्रीफिन साहेब या कामीं कां निद्रिस्थ राहिले याचें कारण त्यांनाच माहीत असले पाहिजे जर करितां पाहिजे त्यावेळेस हवें तसें लिहावें व मन मानेल तसें बोलावें हा साहेब बहादुरांचा क्रम होता तर हे लेख त्यांना १८८३ सालीं छापून प्रसिद्ध करितां येते. पण आतां काय उपयोग! वेळ गेला आणि झोंपा राहिला.

The Berar Samachar

MONDAY, May, 25, 1885

## THE UNIVERSITY CURRICULUM.

An answer from Rao Bahadur M. G. Ranade to Mr. Y. N. Ranade has been published. The Rao Bahadur had been solicited by Mr. Y. N. Ranade to give his opinion on the several suggestions made by him. Due weight must be given to the opinions expressed on the several points, considering the vast experience of that gentleman.

Mr. Y. N. Ranade suggested that the Matriculation Examination should not be a necessary qualification for entrance to the Colleges; and this suggestion has the hearty support of the learned gentleman. He says:—"I do not see the justice of shutting out those who fail at the Examination or do not care to appear there as candidates. What becomes of the hundreds of students who fail every year has always been a puzzle to me. It certainly cannot be right that because a student has not passed in all subjects, his chances of prosecuting his higher studies should be peremptorily closed to him. Many hundreds of students would be all the better for being permitted in early life to spend a few years in higher associations, which at present they are debarred from, and are forced to spend year after year in fruitless knocking at the door. Many sons of the richer classes especially are placed at a disadvantage by this arrangement which nothing can compensate." "The disadvantages of making the Matriculation Examination a necessary qualification for admission in the Colleges, are here clearly put forth. On the other hand Rao Bahadur Ranade himself says further on, that a certificate from a graduate of the University might be required from persons wishing to be admitted to the Colleges, or the College authorities might be left to choose their own students. Thus in other words, it is admitted by the Rao Bahadur that there should be *some* test to prove the capacity of the person wishing to go to the College to receive further culture we believe that the Matriculation Examination. With very little modification in the nature of the questions set would serve as that test. If again it be urged that an easier test than the present Matriculation would do, the objection that raw boys will there by be admitted in the Colleges, retains its full force. Here in India, it must be remembered, all those that join the Colleges do so with a desire to take degrees; it is therefore desirable that in order to be able to reap all the advantages of Collegiate Education, they should undergo the test. Rao Bahadur Ranade tries to remove this objection by saying that in countries where there is no bar to the admission of students to Colleges, those that join have been found not to be below the desired mark. The scotch Universities, however, to which reference is made are on the decline; and admission into the Colleges there without a special test has been found to bring in a mass of students who are required to be taught there what they could have very well learnt at the schools. And here in India there is a further special reason to justify the existence of a test Examination like the Matriculation. All that has to be learnt by our young men is to be learnt through the medium of English; and unless one is able to show at least a moderate competency in that language we do not know how he would be able to receive further culture. As it is, the professors of the Deccan and the Elphinstone Colleges complain that the boys that come to College now are deficient not only in English but generally in all the subjects and can hardly understand the lectures that are given. If this be the case with those that have passed the Matriculation Examination how would it fare with those that would be allowed to come in by passing an easier test. On the one hand it is not desirable to see a swarm of young men at College, who would do no further good to themselves than by being amateur cricket players and amateur theatricals or at most the members of a juvenile College social Club; as also on the other hand to put unnecessary restrictions on the admission into the Colleges. What we maintain is that there should be *some* test for the admission of young men to the Colleges; and whichever it is, it ought to require a tolerable competence in the English language. If the Matriculation Examination is found by experience not to secure the competence required, we do not know how it can be called an unnecessary hindrance to the students.

The second point is with regard to the removal of the restriction of age for a matriculation candidate. We think that the Rao Bahadur is right in thinking the removal of that restriction a step in the right direction. Matriculation being a test for a certain amount of competency it would not matter in the least of what age the man who had it, was. A precocious maturity was supposed to bring with it a precious decay; what was earlier blown was supposed to be earlier blasted; but it has not been found by experience that those who possess the gift of an intelligent brain at an age earliar than the others, have their faculties decayed in afterlife or even stunted. There is one reason which would possibly justify the University in retaining the restriction. Every father of a young man at the Matriculation desires that his son should pass at as early an age as possible in order that he may be able to give a helping hand to the members of his family; and this no doubt must lead in many cases to an unnecessary taxation on the energies of the young man. The restriction of the age to 16 would probably check the avidity of the parents. But as parents are every day becoming more sensible to the need of physicial training for their sons, the reason above given would lose much of its force. It is therefore difficult to say that the removal was not a proper step.

The next point is as regards the two Examinations before the final one for the B. A. degree. We think that the only advantage from there being two intervening Examinations instead of one, is, as pointed out by the RaoBahadur, to divide the studies into two instalments instead of one, but the disadvantages are many and go far to overbalance the single advantage. As the RaoBahadur says, the system deals a severe blow to the spirit of the real College Education, by hardly leaving time for the Examination-worried student to acquire knowledge beyond the sphere of the books set for the Examination. Even when this system was first adopted by the University it had nothing to recommend it except the autocratic impress of the then Governor Sir R. Temple; and we know that many members of the University were unwilling to have the change fastened upon them. We therefore think that a four years' course and only one intervening Examination will be very advantageous as there will be then time enough to acquire an amount of really liberal education which is so peculiarly the aim of Collegiate Education.

The RaoBahadur is right in thinking that Mathematics should not be entirely done away with or reduced in amount and relegated to the place of a voluntary subject.' We believe that many who complain about Mathematics are entirely unaware of the discipline to which the mind is subjected by it; but this is, we are almost certain, not on account of any particular inaptness of the present students, but on account of the defect in the way in which Mathematics is taught in the High Schools. It is a subject which more than any other must be taught by a process of progressive reasoning so as to bring out and gradually develop them; but the actual way in which it is taught is the blunt dry way which renders the subject very unpalatable to the students, so that at College they have very little sympathies for it and in many cases a distinct aversion. Unless this be

remedied, there will always be complaints, about mathematics.

The vernaculars cannot certainly be made a medium of imparting knowledge to our young men. They might be made voluntary subjects under languages as proposed by the Rao Bahadur. The utter disregard with regard to them can be hoped to be remedied by putting them as a voluntary subject for the Examinations.

We reserve the consideration of the proposal to dispense with the necessity of obtaing pass marks in each subject made by the Rao Bahadur for some future issue as also the system of imparting instruction that we propose for adoption in the Schools.

---

It is a very happy circumstance that during the month of May Poona supplies the best amusement of its kind. The Elocution gatherings, the Deccan College gathering, the several other meetings and last but not least the speeches which are made by educated gentlemen, some written and some oral all give a very good intellectual food to the educated section of the community who come to spend the vacation at the capital of the Peishwas. It is a kind of practical development. You see the difficulties of a speaker—you see how much of the vast stock in his possession he is able to put forward *ex tempore*; when you prepare 100 P.C. at home you are not able to place 25 P. C. even of your conclusions before the audience for various reasons. Of course there are honourable exceptions who could speak out all they have thought on to the best advantage. But the generality is not so and you can draw no conclusion from exceptional cases.- When you attend these meetings you are able to compare your own abilities with those of others and to learn what is yet new to you. It is of no use whatever to speak out simply because you should be marked and people should say of you that such & such a man spoke out though I believ many speakers exhaust themselve or this reason alone— A man is at nce confronted with the fact that it , the first thing in a speaker to have vast amount of information and to hink matters out for himself. To gain uch information is not the work of a ay. Many years of patient toil and research must be passed before you are qual to the task. There are other conderations to which also you have to pay much attention: for instance, delivery, umorous language, good simple clear oice, interesting treatment of the subject and so on. But the chief thing to have a great stock of knowledge is the head. Unless you always keep up reading and thinking you are not fit for, a speaker. When you arise to speak people have a right to expect from you because you are educated, well thought, ell digested matter which could speak itself. The audience should go home th the satisfaction that new light has een thrown on this question, an important addition is made to the nowledge we have had of that, an teresting account of some place, trade such other thing sufficient to add to he general stock of information.

---

RaoBahadur Mahadeo Govind Raade has been appointed a member of H. E. the governor's legislative Council Bombay. The appointment will doubtless be hailed with much delight throughout India. Mr. Ranade is a man of great learning and research and has passed the whole life in rigid study. His experience will be invaluable. He is one of those men on whom the choice would have first fallen if the privilege of election were allowed to the community. H. E. the governor has shown great discretion and judgment in appointing the right man in the right place. This being almost the first public act since he took over the administration in his hands, it will be considered as a prelude to his future actions. Mr. Ranade's name has been so often mentioned in the papers for the situation that the public will now be satisfied for having got from Lord Reay what they have been hitherto striving for with great force and judgment. The governor deserves to be congratulated on all sides for making such a worthy appointment. We have now as representatives of the people such able men as Messrs Kashinath Trimbak Telang, Badrudin Tayebji and the latest nomination gives an addition which will be highly valued by the members already sitting. Even if the voice of the majority be overwhelming, there cannot be the least doubt that the wants and wishes of the masses will be forcibly put upon the notice of government by the present members in a manner which will have nothing to be desired. The people don't like and have never liked Mr. Raste's nomination but he too will try to make himself popular by an appreciative study of the questions which will be suggested by his Honorable Colleagues. We wish God gives Mr. Ranade long and excellent health to do well the duties that have now fallen upon him.

## पुस्तकांची वगैरे पोंच.

'आपला एक वेडा'—पत्र पोंचलें. फार उशिरां आल्यामुळें त्याचा विचार पुढील अंकीं केला जाईल.

'मंगळवेढेकर'— मंगळवेढचे प्रसिद्ध देवभक्त दामाजीपंत यांच्या स्मारका करितां शक्यनुसार सर्वांनीं मदत करण्या बद्दलची आपली जाहिरात पुढील अंकीं छापूं.

## वऱ्हाड.

हवामान—आकाशांत ढग वरचेवर येतात आणि वारा ही चांगला सुटत नाहीं यामुळें उकाडा विलक्षण होत आहे. या आठवड्यांत एक दोन पावसाच्या सरी ही आल्या यावरून थोडक्यांतच पावसाळा सुरू होईल असें दिसत आहे. हागवण, ओक वगैरे तुरळक सुरू झाली आहे. हा प्रकार उन्हाळ्यामुळें असून थोरला प्रकार नसो असें आम्ही इच्छितो.

अलिशान रेसिडेंट मि. कारडेरी साहेब हे गेल्या १७ तारखेस हैद्राबादेहून माथेरानास गेले.

येथील डेपुटी कमिशनर मि. निकोलेट साहेब हे गेल्या आठवड्यांत उन्हाळ्या निमित्त नरनाळ्यास गेले.

मि. ग्यादरर येथील ए. इंजिनिअर यांस राजपुताना स्टेट रेलवे कडे सुप. इंजिनिअर नेमल्याचें समजतें.

मि. स्कोबी यवतमाळचे असि. इंजिनिअर यांस तूर्त येथें एक्झी. इंजिनिअर नेमिलें आहे.

मि. जहांदर अल्ली येथील आनररी असिस्टंट (?) ...

मि. जहांदर अल्ली येथील आनररी अस्याची हे कांहीं महत्वाचें कामांत तपास करण्या करितां जळगांव तालुक्यांत गेल्याचें कळतें.

अकोला म्युनिसिपालिटींत रा॰रा॰ वामन गणेश परांजपे, रा॰रा॰ विष्णु मोरेश्वर महाजनी, व मौलवी हकीमुद्दीन या तीन हुशार गृहस्थांची चालुं वर्षा करितां कामिटीच्या सभासदांत निवडणूक झाली हे ऐकून पुष्कळांस आनंद वाटेल.

## नोटीस

अकोला म्युनसिपाल कमेटी याजकडून—म्युनसिपाल आक्ट नंबर ४ सन १८८३ कलम ७ प्रमाणें नोटीस देण्यांत येते कीं अकोलें येथील आठवडे बाजारांत जे लोक माल विक्रीस आणितात व बाजारच्या जागेचा उपयोग करितात त्यांच्या पासून आजपावेतों जो कर (म्हणजे बाजार भाडें) वसूल केला जात आहे तो म्युनसिपालिटीचा कर आहे असें समजून या पुढें त्याची सर्व व्यवस्था देखरेख आणि वसूल करण्याविषयींचे नियमांस सदहू कलमाचे आधारें आलिशान रेसिडेंट साहेब बहादुर मु. म. हैद्राबाद यांची मान्यता घेण्याची आहे. कोण कोणत्या मालावर किती किती कर घेण्यांत येईल याची यादी या नोटिशीच्या खालीं दिली आहे तरी कोणास या बाबतींत तक्रार करावयाची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आंत लेखी अर्जानें म्युनसिपाल कमेटीच्या आफिसांत जाहिर करावी कळावें ता. २१ माहे मे सन १८८५ इसवी.

Deorao Vinayak
Vice President
A. M. C.

| अनुक्रम नंबर. | मालाचें नांव | कराचा आकार रु. | आ. | पै |
|---|---|---|---|---|
| १ | बजाज (देशी व परदेशी कापड विकणारे) | ० | १ | ६ |
| २ | कासार (तांबें व पितळेचीं भांडीं विकणारे) | ० | १ | ६ |
| ३ | मोठे सराफ (सोनें चांदी आणि नाणें विकणारे) | ० | १ | ६ |
| ४ | भुसारी ठोक विक्रीदार (किरकोळ शिवाय करून) | ० | १ | ६ |
| ५ | किराणा विकणारे (ठोक विक्रीदार) | ० | १ | ६ |
| ६ | तूप विकणारे (ठोक विक्रीदार) | ० | १ | ६ |
| ७ | गुळ विकणारे (ठोक विक्रीदार) | ० | १ | ६ |
| ८ | खण विकणारे चाटी लोक | ० | १ | ६ |

* टीप—ज्या धान्याचे व किराण्याचे विक्रीदाराजवळ १० रुपयांहून ज्यास्त किमतीचा माल असेल त्यांस ठोक विक्रीदार समजण्याचें व तूप गुळ विकणाराजवळ ५ रुपयापेक्षां ज्यास्त असल्यास ठोक विक्रीदार समजण्याचें.

वर्ग २

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | तेल व डेप विकणारे. | ० | १ | ० |
| २ | हलवाई | ० | १ | ० |
| ३ | कसाब लहान मोठे | ० | १ | ० |
| ४ | गल जंबुरा वगैरे रंगाचा व्यापार करणारे | ० | १ | ० |
| ५ | सन आणि ताटपडी विकणारे | ० | १ | ० |
| ६ | चामडें विकणारे | ० | १ | ० |
| ७ | लहान सराफ (खुर्दा विकणारे. | ० | १ | ० |
| ८ | कापूस व सरकी विकणारे | ० | १ | ० |
| ९ | रसी विकणारे (कांगर वगैरे) | ० | १ | ० |
| १० | भाज्या व बंगिच्यांतील दुसरे पदार्थ विकणारे सीर बोझे खेरीज करून | ० | १ | ० |
| ११ | गवत कडबा व इमारती लांकडे विकणारे सिर बोझे खेरीज करून | ० | १ | ० |

वर्ग ३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | रोटी विकणारे | ० | ० | ३ |
| २ | मनारी (बांगड्या विकणारे) | ० | ० | ३ |
| ३ | आतारी (जस्त आणि कथलाचे चिल्हर विकणारे) | ० | ० | ३ |
| ४ | भुसारी चिल्हर धान्य वि. | ० | ० | ३ |
| ५ | चांभार | ० | ० | ३ |
| ६ | शिंपी | ० | ० | ३ |
| ७ | गेरू किंवा हुरमुंजी विकणारे | ० | ० | ३ |
| ८ | बारी (विड्यांचीं पानें वि.) | ० | ० | ३ |
| ९ | नस विकणारे. | ० | ० | ३ |
| १० | लोहार आणि पंचाळ | ० | ० | ३ |
| ११ | तंबाखु विकणारे. | ० | ० | ३ |
| १२ | भडभुंजे | ० | ० | ३ |
| १३ | कुंभार | ० | ० | ३ |
| १४ | पटवी | ० | ० | ३ |
| १५ | गांधी | ० | ० | ३ |
| १६ | ढेप विकणारे | ० | ० | ३ |
| १७ | चिल्हर तूप विकणारे | ० | ० | ३ |
| १८ | चिल्हर कापड व पागोटीं विकणारे जसें महार आणि मोमिन. | ० | ० | ३ |
| १९ | चिल्हर किराणा व औषध विकणारे. | ० | ० | ३ |
| २० | बारूदवाले | ० | ० | ३ |
| २१ | जिनगर | ० | ० | ३ |
| २२ | धनगर | ० | ० | ३ |
| २३ | बुरूड | ० | ० | ३ |
| २४ | फुलें आणि फळें विकणारे | ० | ० | ३ |
| २५ | गवत व जळावू लांकडें विकणारे. | ० | ० | ३ |
| २६ | कापसाचे व लोंकरीचे ताणे विकणारे | ० | ० | ३ |

वर्ग ४

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | घोडे व तट्टें विकणारे | ० | १ | ० |
| २ | म्हशी विकणारे. | ० | १ | ० |
| ३ | गाई आणि बैल विकणारे | ० | १ | ० |
| ४ | गाढव वगैरे विकणारे | ० | ० | ३ |
| ५ | शेळ्या व मेंढ्या विकणारे | ० | ० | ३ |

## वर्तमानसार.

आम्हांस लिहिण्यास मोठा आनंद वाटतो कीं राव बहादूर महादेव गोविंद रानडे एम. ए. एल. एल. बी. यांस मुंबईचे गव्हरनर साहेबांचे कायदे कौन्सिलांत मेंबर नेमिलें. राव बहादूर रानडे हे सर्वांस महशूर आहेत तेव्हां ही त्यांची नेमणूक ऐकून सर्वांस आनंद झाल्या वांचून राहणार नाहीं. गव्हरनर लार्ड री साहेब अधिकारारूढ होऊन फार दिवस झाले नाहीं तोंच त्यांनीं आपल्या पोक्त विचारानें सर्व मान्य गृहस्थाची अशा महत्वाच्या जागीं योजना केली हें त्यांस मोठें भूषणास्पद आहे.

खरें शौर्य—मनुष्यें चटाचट कापून टाकणें अगर तोफेच्या गोळ्यांनीं उडविणें फार सोपें आहे. साधारण लोकांचा समज असा असतो कीं राजांचें शौर्य काय तें युद्धांत दृष्टोत्पत्तीस येतें. ह्या प्रांतावर स्वारी करणें, तो देश जाळून फस्त करणें, तिसऱ्या एखाद्या गरीब राष्ट्रावर विनाकारण शस्त्र धरून त्यावर खराठा फिरविणें हीं कामें सोपीं होत. परंतु लोकांचा स्वभाव कसा आहे, त्यांना कशाची जरूर आहे, त्यांचें प्रेम आपणावर कसें जडेल इत्यादि गोष्टी चांगल्या समजून घेऊन त्यांवर एकंदर राज्याची इमारत उभारणें हें काम महामुष्किलीचें आहे. सर्वांस हें साधतें असें नाहीं. प्रजा संतुष्ट ठेवून तिच्या कल्याणासाठीं स्वतः स्वकीयांचा ही अपमान सोसून करवेल तितकी खटपट करणारे लार्ड रिपन सारखे पुरुष ह्या पृथ्वीवर थोडेच निर्माण होतात. अशा पुरुषांसच शूर म्हणावें.

पार्लमेंट सभेंतील खबर—शांपेनच्या ३०० डझन, क्लारेटच्या १५० डझन, ब्रांडीच्या १०० डझन, विस्कीच्या १५० डझन, बीयरच्या ४०० डझन, व दुसऱ्या प्रकारच्या पेयांच्या १०० डझन, बाटल्या इतकी दारू सरपीटर लम्सडेन यांच्या स्वारी बरोबर रवाना करण्यांत आली असें आठवडे डिस्पाचमध्यें आलें होतें. मि. लाबुशरी यांनीं ह्या संबंधानें अंडर सेक्रेटरी पास असा प्रश्न केला आहे कीं इतकी दारू जर लम्सडेन साहेबांच्या स्वारी बरोबर पाठविण्यांत आली, तर ती कशाकरितां? सर पीटर लम्सडेन व त्यांच्या बरोबरची जी मंडळी त्यांच्या कारितां किंवा ती आफगाण व टर्कोमन लोकांनां द्यावयाची होती? मि. लाबुशेरी यांनीं आणखीं असें विचारिलें कीं; नेहमीच्या पगारा शिवाय सर पीटर लम्सडेन यांना ते कमिशन वर आहेत तोंपर्यंत वर्षाचे ५०,००० पौंड तनखा द्यावयाचा कीं काय? ह्या प्रश्नाचे जबाब मि. क्रास यांनीं दिले ते—सर पीटर लम्सडेन यांची सर्व हुद्याबद्दल एकंदर वर्षाची पैदास ३११२ पौंड, १० शिलिंग आहे. शिवाय ते इंडिया कौन्सिलचे मेंबर आहेत त्याबद्दल त्यांस वर्षाचें वेतन १२०० पौंड आहे. त्याच्या बरोबर जे दुसरे अम्मलदार आहेत त्यांना त्यांचा हिंदुस्थानांतील पगार मिळून आणखी त्यांचा एक पंचमांश मिळतो. सन १८८४।८५ सालाच्या बजेटांत एकंदर कमिशनचा खर्च १,२०,००० पौंड आकारलेला आहे. १८८५।८६ सालाच्या बजेटांत आणखी ६१,००० पौंड घातले आहेत. दारूविषयीं ह्मणाल तर आम्हांला एवढीच माहिती आहे कीं शांपेनच्या १५ डझन व ब्रांडीच्या ६ डझन बाटल्या इतकी दारू कमिशनच्या उपयोगासाठीं रवाना करावयाची होती.

शत्रूचा पाडाव कसा करावयाचा?—लंडन येथें सिटिलिबरलक्लबचें एक जेवण नुकतेंच झालें. त्या वेळीं लार्ड रिपन वगैरे मंडळी जमली होती. जमलेल्या सर्व लोकांस रिपन साहेबांनीं असें म्हणून दाखविलें कीं तुम्ही हिंदुस्थानाविषयीं एवढी कळकळ बाळगतां ती हल्लींच्या बिकट प्रसंगा पुरतीच असेल तर कांहीं विशेष नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांच्या कल्याणाची काळजी तुम्हांस सदोदित वाहिली पाहिजे. त्या लोकांची संपत्ति वाढून ते ज्ञानसंपन्न होतील अशा तजविजी तुम्हांस सदोदित केल्या पाहिजेत. सांप्रत जे रशियाचें किटाळ उठलें आहे तें लवकरच विझेल. आतांचें विघ्न टळून पुढें कांहीं दिवसांनीं जर रशिया पुन्हां गुरगुरूं लागला तर त्याची धूमधाम उडविण्यास हिंदुस्थानच्या राजनिष्ठ प्रजेसारखें दुसरें साधन नाहीं. आज स्थितीस चोहोंकडून सर्व संस्थानिक व साधारण लोक सुद्धां इंग्रज सरकारचें साह्य करण्यास कसे तयार आहेत पहा. त्यांना तुम्ही आपलेसें करा. त्यांचें प्रेम संपादा. म्हणजे हिंदुस्थानचें रक्षण त्यांचें तेच करतील. लढाई झाल्यास हल्लीं जसें इकडून सैन्य पाठवावें लागेल तशी तूर्त तह होऊन पुढें कदाचित् कांहीं वर्षांनीं रशियाचें डोकें फिरल्यास त्याला चांगलेंच औषध देण्याचा इकडून तजवीज करावयास लागणार नाहीं. तुम्ही हिंदुस्थानची खरी कळकळ बाळगून त्याच्या कल्याणार्थ मनापासून झटा म्हणजे झालें. हिंदुस्थानचे लोक बेइमानी नाहींत. ते आपल्या राज्यकर्त्यांसाठीं जिवावर उदार होऊन आपल्या देशाचें रक्षण करण्यास कधींही मागें सरणार नाहींत.

इंग्रजी शाळांप्रमाणें मुंबईतील सरकारी मराठी शाळांस मे महिन्याची सुट्टी मिळते हें चांगलें आहे. बाहेर गांवीं जेथें उन्हाळा फार आहे तेथें अशीच तजवीज झाल्यास बरें होईल.

जर्मन वर्तमानपत्रकर्ते म्हणतात कीं रशियनराज्यकारस्थान ठीक चाललें आहे. रशियन धामधुमीचा बंदोबस्त इंग्लंड न करील तर हिंदुस्थानांत व युरोपांत इंग्लंडचें वजन राहणार नाहीं.

पुण्याजवळच एका काछ्यानें लावलेल्या खर्बुजांतून व कलिंगडांतून कांहीं रामोशी लोक खर्बुजें व कलिंगडें चोरून नेऊं लागले. एके दिवशीं रात्रीं काछी जागत बसला. बरीच रात्र झाल्यावर एक रामोशी वाडींत शिरून कलिंगड तोडणार इतक्यांत त्याला काछ्यानें पकडलें. पण त्या रामोशाचे दुसरे तीन चार सोबती काछ्यावर तुटून पडले. त्यांनीं त्यास येथेच्छ मार दिला; तो इतका कीं कांहीं दिवसांनीं त्या मारामुळेंच तो काछी ठार मेला. ने० भा०

बारीककाटकसरीनें ही जर हा हल्लींचा युद्धप्रसंग भागत नसला, तर, इलाख्याचे कमांडर इन चीफ, रेव्हिन्यु खात्यांतले कमिशनर, पोलिस खात्यांतले इन्स्पेक्टर, शाळा खात्यांतले इन्स्पेक्टर, इत्यादि मोठ्या पगाराचे कामदार जर आज गर्जी कमी केले, आणि त्यांचें काम बाकीच्या कामगारांस वांटून दिलें, तर फारशी खोटी होणार नाहीं, व पैसा पुष्कळ वांचेल. हा विचार आम्ही सरकारास कितीएक प्रसंगीं सुचविला आहे त्याचा उपयोग सरकारानें करावा. तितकीं करून निर्वाह न होईल, तर, विलायतेंतील इंडिया हौसच्या कामदारांचे पगार अलिकडे फार वाढविले आहेत तिकडे दृष्टि द्यावी. आणखी त्यांहून हा योग्य सरकारास खर्चाची काटकसर करण्याला उत्तम उपाय म्हटला म्हणजे, ज्या कामावर सध्या युरोपियन लोक मोठमोठे पगार देऊन ठेविले आहेत, त्या कामावर त्यांच्या पाऊण हिस्सा किंवा, निम्मे पगार देऊन, आमच्यांतले चांगले लायख लोक ठेवणें हा होय. ह्या उपायानें अवलंबून केलें. म्हणजे गरीबगुरीबांस त्रास फार न होता, सरकारास लाभ मोठा होईल अशी आमची सूचना आहे.

कंप—कोल्हापुरच्या कांहीं खेड्यांमध्यें बराच धरणीकंप झाला. त्या योगानें कित्येकांच्या घरांचीं बळेंही ढासळलीं म्हणतात.

सार्वभौमत्रय—सर्व जगामध्यें गाजणाऱ्या सार्वभौमत्रयाची आस्ट्रियाच्या प्रदेशांत रशियाचे मर्यादेनजीक येथा सर्तवरमध्यें मुलाकत होणार आहे असें ऐकिवांत येतें. हें जें दरबार भरणार आहे, त्यावरून युरोपामध्यें एक वर्षभर पर्यंत तरी कांहीं शांतता रहावी असा पुष्कळ लोकांचा तर्क आहे.

देणगी—रशियाचे बादशहानें जनरल कोमेराफ यांस एक आभारपत्र पाठविलें आहे व त्याबरोबर एक रत्नखचित तरवार ही त्यांस नजर केली आहे. ही बक्षिसी काय म्हणून बरें पिंजदेह बद्दल तर नसेल ना?

इं० प्र०

ज्या गांवची खानेसुमारी अठरा हजार किंवा अठरा हजारावर आहे तेथील मुनसीपालटीच्या नान आफिशियल प्रेसिडेंटाला "राव बहादूर" अगर "खानबहादर" किताब असावा आणि मेंबरानां 'रावसाहेब' किंवा 'खानसाहेब' किताब असावा. बाकीं अठरा हजारा पेक्षां खानेसुमारी कमी असली तर तेथील मुनसीपालटीच्या नान आफिशियल प्रेसिडेंट किंवा व्हाइसप्रेसिडेंट यांनां रावसाहेब किंवा खानसाहेब किताब आणि मेम्बरांना अज्जम किताब असावा असें सरकारानें ठरविलें आहे. पूर्वी सिटीमुनसीपालटी आणि टाऊन मुनसीपालटी असा भेदाभेद करून त्यावर किताबाचें बस्तान बसविलें होतें, तें आतां खानेसुमारीवर आणलें. याचे योगानें रत्नागिरी मुनसीपालटी मात्र खालीं घसरली. कारण सदर्न डिव्हिजन मध्यें बेळगाव, धारवाड, हुबळी आणि रत्नागिरी या चार मुनसीपालट्या असून त्यांतील रत्नागिरीची खानेसुमारी अठरा हजारापेक्षां कमी असल्या मुळें— ती किताबाच्या बाबतींत टाउन मुनसीपालटीच्या पक्तींत जाऊन बसली. वरील ठरावांत चेरमनला विशेष किताब मुळींच देण्यांत आलेला नाहीं कां?

तोंडानें फार गोड पण हातानें बहुतड--रोणचे माजी मामलेदार रा. रा. बाळाजी व्यंकटेश यांणीं आपण बंडाच्या वेळीं मोठी बाहदरी केली आहे तेव्हां आपणाला पगारा इतके भरपूर पेनशन मिळावें म्हणून सरकाराला अर्ज केला होता, व ते वेळचे गाजलेले सर सूटर साहेब यांणीं ही या अर्जाला टेका देऊन सरकाराला शिफारस केली. परंतु सरकार कसलें वस्ताद! रावसाहेबाची इमानी नौकरी बहाल करून तोंडानें स्तुतिही गाईली, पण हातानें एक छदाम ही फाजील पेनशन देण्याचें कबूल केलें नाहीं! यांणीं पैशाचा संबंध सोडून आपणाला "रावसाहेब" पदवी पाहिजे म्हणून अर्ज केला असता. तर मोठ्या संतोषानें सरकारानें यांनां पदवी दिल्ही असती सगळा कोरडा कारभार.

सोडाभक्त—चिंडोलींत एकइसम सोडा बाटलीचें बूच निघत नाहीं म्हणून दातांनीं ओढून काढूं लागला; कर्मधर्म संयोगानें तें बूच दातांतून सुटून बिचाऱ्याच्या घशाशीं बसलें, तेणेंकरून त्यास फारच इजा झाली आणि त्यांतच त्याणें राम म्हटलें.

पकडले—मद्रासच्या किल्यांत तीन रशियन गुप्त हेर पकडले.

वृंदावन—एथें एक १४ वर्षांच्या मुलीनें पतीबरोबर सहगमन केलें असें पुणे वैभवचा एक बातमीदार कळवितो.

धा० वृ०

लार्ड लोकांच्या सभेंत लार्ड किंबरले यांनीं कळविलें कीं क्वेटा रेलवे आणि पेशावर पासून क्वेटापर्यंत किल्ले बांधण्यासाठीं व रस्ते दुरुस्त करण्याचे कामाकरितां ५ कोट रुपये खर्च करण्याची सरकारानें मंजुरी दिली.

नुकतेंच जनरल गार्डन यांचें चरित्र डच भाषेंत तयार झालें आहे. त्याच्या खपाप्रमाणें हालंद देशांत कोणत्याही पुस्तकाचा खप झाला नाहीं या मोठ्या पुस्तकाची पहिली आवृत्ति तयार झाली नाहीं तोंच ती घेण्यास लोकांच्या उड्या पडल्या व लवकरच दुसरी आवृत्ति तयार करणें भाग पडलें.

काशीस परवांचे मागील शनिवारीं एका मुलाला त्याचे हातांतील रुप्याच्या दागिन्यांकरितां मोठ्या क्रूरपणानें खून करण्याचा प्रयत्न झाला. कित्येक मुलें पतंग उडवीत होतीं, त्यांतून एका मुलास तुला पतंग व त्याकरितां दोरा देतों असें सांगून दरोडखोरांनीं त्यास एकीकडे नेलें व तेथें कोणी नाहीं असें पाहून त्या पोराचा गळा दाबला व तो मेला असें समजून त्याचे हातांतील रुप्याचे दागिने काढून घेतले. पुढें ही बातमी पोलिसास कळल्यावर त्यांनीं त्या खुनी मनुष्यास पकडलें. मुलगा असवस्थ स्थितींत अद्याप जिवंत आहे.

इटली देशच्या राजानें एक मोठी औदार्याचा व दयेची गोष्ट केली, ती अशी. मांझीनी नांवाच्या दुकानदारावर एका मुलीच्या अंगावरून घोडा नेल्याचा खटला पोलीस कोर्टांत चालला असतां स्वतः राजेसाहेबांनीं कोर्टांत हजर होऊन साक्ष दिली कीं त्या दुकानदाराचा कांहीं अपराध नाहीं; त्याचा घोडा बुजूनअनावरच मुलीच्या अंगावरून गेला, यानें जाणून बुजून अंगावर घातला नाहीं. राजे साहेबांच्या या साक्षीवरून त्या बिचाऱ्या दुकानदाराचा बचाव झाला. किती औदार्याची व शहाणपणाची गोष्ट! या राजाचें हें वरील आचरण पाहून इतर राजे लोकांनींही न्याय देण्याचे कामीं आपणांस तसदी पडली तरी पत करावी. राजानें कोर्टांत जाणें व साक्ष देणें हें हलकेपणाची गोष्ट आहे असें जे कोणी राजे किंवा श्रीमंत लोक समजत असतील ते आपल्या कर्तव्यास चुकतात यांत संशय नाहीं. न्याय देण्याकरितां आपणांस तसदी पडली तरी पत करावी परंतु आपण ऐशआरामांत राहून आपलें राज्यांत अन्याय चालू देणें हें फारच निंद्य आहे. सु०

☞ हें पत्र आकोला येथें के.बा. खेर बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव दडके प्रसिद्ध केलें.